# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड बुधवार । दि. १ जुलै २०२६ । अंक २५ । पृष्ठे ८ । किंमत ४ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## कृषी विभागाला वसंतराव नाईकांचा विसर

**रायगड :** जिल्हा परिषद कृषी विभाग, महाराष्ट्र शासन कृषी विभाग व अलिबाग पंचायत समिती कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एक जुलैला कृषी दिन साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची पत्रिकादेखील तयार करण्यात आली. हरित क्रांतीचे जनक माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त हा कार्यक्रम होणार आहे. मात्र, वसंतराव नाईक यांच्या नावाचा विसर कृषी विभागाला पडला. पत्रिकेमध्ये त्यांच्या नावाचा उल्लेखच नसल्याचे दिसून आले. दिवंगत वसंतराव नाईक यांनी मुख्यमंत्री पदाच्या काळात शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी विविध कृषी धोरणे राबविली होती. शेतकरी पान २ वर

## आज शेतकऱ्यांचा होणार सन्मान

**रायगड :** रायगड जिल्हा परिषद कृषी विभाग, महाराष्ट्र शासन व अलिबाग पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यात कृषी दिन साजरा केला जाणार आहे. यानिमित्ताने कृषी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात अलिबाग तालुक्यातील ३० जणांचा विशेष सन्मान केला जाणार आहे. त्यामध्ये प्रगतशील शेतकरी म्हणून साधारणतः २० शेतकरी आणि विविध योजनेंतर्गत आधुनिक अवजारे घेतलेल्या साधारतः दहा शेतकऱ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. हा कार्यक्रम अलिबागमधील चेंढरे येथील भाग्यलक्ष्मी सभागृहात सकाळी अकरा वाजता होणार असल्याची माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली.

# वेधक

## उपसभापतीपदासाठी आज निवडणूक

**मुंबई :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापतीपदासाठी बुधवार, दि. १ जुलै रोजी दुपारी १ वाजता या पदासाठी मतदान होणार आहे. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी या निवडणुकीचा अधिकृत कार्यक्रम सोमवारी विधान परिषदेत जाहीर केला. डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या आमदारकीचा कार्यकाळ संपल्याने हे पद रिक्त झाले आहे. विधान परिषदेत सध्या भाजपची सदस्यसंख्या सर्वाधिक आहे. मात्र, महायुतीमधील सत्तावाटपाच्या ठरलेल्या सूत्रानुसार उपसभापतीपद पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडेच जाण्याची शक्यता आहे. या निवडणुकीत शिंदे गटाकडून ठाकरेंचे आमदार सचिन अहिर यांनी अर्ज दाखल केल्याने सगळ्यांनाच धक्का बसला आहे.

## डिझेलतस्करांना तीन दिवसांची कोठडी

**रायगड :** रेवस जेट्टी येथील समुद्रकिनारी डिझेलची तस्करी करणाऱ्या तिघांविरोधात सोमवारी (दि.२९) सकाळी कारवाई करण्यात आली. मांडवा सागरी पोलिसांच्या या कारवाईने डिझेलमाफियांना दणका मिळाला. या गुन्ह्यातील तिघांना अलिबागमधील न्यायालयात मंगळवारी (दि. ३०) दुपारी हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पुरवठा निरीक्षक हर्षल देशमुख यांच्या फिर्यादीनुसार, मासेमारी करणाऱ्या वाघेश्वरी साई व आई गुरु माऊली या दोन बोटींद्वारे अवैधरित्या डिझेलची तस्करी करणाऱ्यांवर छापा टाकण्यात आला. पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे पान २ वर

## वारकऱ्यांसाठी विशेष रेल्वेगाड्या

**मुंबई :** आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखों वारकरी पंढरीकडे रवाना होतात. यंदाही भाविकांची होणारी अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने वारकऱ्यांसाठी ५४ आषाढी विशेष रेल्वेगाड्या चालविण्याची घोषणा केली आहे. नागपूर, नवी अमरावती, खामगाव, लातूर, भुसावळ, पुणे आणि कोल्हापूर येथून पंढरपूर व मिरजकडे या विशेष गाड्या धावणार आहेत. मध्य रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, नागपूर-मिरजदरम्यान चार आरक्षित विशेष गाड्या चालविण्यात येणार आहेत. ट्रेन क्रमांक ०१२०५ विशेष गाडी २३ व २४ जुलै रोजी सकाळी ८.५० वाजता नागपूरहून सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी ११.५५ वाजता मिरजला पोहोचेल.

# चेंबूरमध्ये स्कूल बसवर झाड कोसळले

## एका विद्यार्थ्याचा मृत्यू, चार विद्यार्थी गंभीर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईतील चेंबूरच्या डायमंड उद्यान परिसरात मंगळवारी दुपारी एका स्कूल बसवर एक भले मोठे झाड कोसळले. या दुर्घटनेत एका ११ वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू झाला आहे. तर यामध्ये चार विद्यार्थी गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर परिसरातील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मंगळवारी दुपारी सव्वा तीनच्या सुमारास ही घटना चेंबूरच्या सेंट अँथनी हायस्कूल परिसरातील ११



वा रस्ता येथे घडली. टिळक नगर परिसरात असलेल्या युनिव्हर्सल विद्यालयाचे विद्यार्थी घेऊन ही व्हॅन परिसरात मुलांना घरी सोडण्यासाठी आली होती.

प्राथमिक माहितीनुसार, ही घटना मंगळवारी दुपारी घडली. शाळा सुटल्यानंतर ही खासगी स्कूल बस नेहमीप्रमाणे विद्यार्थ्यांना घरी सोडण्यासाठी चेंबूरच्या ११ नंबर रोडवरुन जात होती. याच दरम्यान रस्त्याशेजारी असलेले एक जुने आणि अवाढव्य झाड अचानक धावत्या बसवर उन्मळून पडले. झाडाच्या मोठमोठ्या आणि जड फांद्या बसच्या छतावर आदळल्या. यामुळे बसचा समोरी आणि मधला हिस्सा मोठ्या प्रमाणत चेपला गेला. झाड कोसळताच बसच्या आत निष्पाप चिमुरड्यांचा एकच आक्रोश आणि किंचाळ्या ऐकायला आल्या.

अपघातावेळी बसमध्ये एकूण १२ विद्यार्थी प्रवास करत होते. झाड कोसळल्यानंतर बसचे मोठे नुकसान झाले आणि काही विद्यार्थी आत अडकून पडले. मात्र, मदत पथके पोहोचण्यापूर्वीच बसचे चालक, वाहक आणि परिसरातील नागरिकांनी धाव घेत विद्यार्थ्यांना बाहेर काढण्यास सुरुवात केली. त्यानंतर अग्निशमन दल आणि पोलिसांनी संयुक्तपणे पान २ वर

### जेसीबीच्या सहाय्याने बचावकार्य सुरू

स्कूल बसवर कोसळलेले झाड अत्यंत वजनी आणि मोठे असल्यामुळे ते बाजूला करण्यासाठी प्रशासनाकडून तातडीने जेसीबी मशीन पाचारण करण्यात आलं. जेसीबी आणि अत्याधुनिक कटर्सच्या सहाय्याने बसवर कोसळलेला झाडाचा मोठा भाग कापून बाजूला करण्याचे काम युद्धपातळीवर करण्यात आलं. दरम्यान, स्थानिकांनीही या बचावकार्यात मदत केली.

# बोगस मतदारांचा करेक्ट कार्यक्रम

## प्रशासन जाणार मतदारांच्या दारी

## महिनाभर विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम राबवणार

**। रायगड । प्रतिनिधी ।**

मतदार यादीतील बोगस नावे हद्दपार करून प्रत्येक पात्र नागरिकाची अचूक नोंद सुनिश्चित करण्यासाठी निवडणूक आयोगाने विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम हाती घेतली आहे. ३० जून ते २९ जुलैदरम्यान रायगड जिल्ह्यात प्रशासन थेट मतदारांच्या दारी जाऊन माहिती संकलित करणार असून, घरोघरी जाऊन गणना प्रपत्र भरून घेतले जाणार आहे. पात्र मतदारांची अचूक नोंद आणि अपात्र नावांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने ही मोहीम अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासह देशातील १६ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये विशेष सखोल पुनरीक्षण-२०२६) कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यात ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत



विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या माध्यमातून मतदार यादीतील अपात्र आणि बोगस नावे वगळून प्रत्येक पात्र मतदाराची नोंद अचूक व अद्ययावत करण्यावर भर दिला जाणार आहे.

या मोहिमेसाठी रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांमध्ये एकूण ३ हजार १८५ अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून, ते मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून घरोघरी जाऊन मतदारांची माहिती संकलित करणार आहेत. १ ऑक्टोबर २०२६ हा पात्रता दिनांक निश्चित करण्यात आला असून, बीएलओ प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन गणना प्रपत्राच्या दोन प्रती वितरित करतील. मतदारांनी त्यामधील माहिती पडताळून आवश्यक तपशील भरून स्वाक्षरीसह संबंधित बीएलओकडे प्रपत्र जमा करणे आवश्यक राहणार आहे. या गणना प्रपत्राच्या आधारेच नव्या मतदार यादीची तयारी केली जाणार असल्याने नागरिकांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

गणना प्रपत्राच्या आधारे तयार करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार पान २ वर

३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम राबविण्यात येणार. १ ऑक्टोबर २०२६ हा पात्रता दिनांक निश्चित. रायगड जिल्ह्यातील २,७९० मतदान केंद्रांशी संलग्न २५,३३,७३९ मतदारांची पडताळणी. ३,१८५ अधिकारी व कर्मचारी मोहिमेत सहभागी. बीएलओ घरोघरी जाऊन गणना प्रपत्र भरून घेणार. ५ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध. ४ सप्टेंबरपर्यंत दावे व हरकती स्वीकारल्या जाणार. ७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे.

> “मतदार यादी अचूक आणि अद्ययावत ठेवणे ही लोकशाहीची मूलभूत गरज आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरोघरी भेट देणार असल्याने नागरिकांनी त्यांना आवश्यक सहकार्य करून गणना प्रपत्र वेळेत भरून द्यावे. प्रत्येक पात्र मतदाराचे नाव यादीत राहणे हीच या मोहिमेची प्रमुख भूमिका आहे.
> – किशन जावळे, जिल्हाधिकारी, रायगड”

# तासाभरात बदलली खुर्ची





- उरण पोलीस ठाण्यात नियुक्तीचा नाट्यमय उलटफेर
- पदभार स्वीकारताच आदेश बदलल्याने खळबळ

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदाच्या नियुक्तीवरून सोमवारी रात्री घडलेल्या नाट्यमय घडामोडींनी पोलीस वर्तुळासह संपूर्ण उरण तालुक्यात चर्चेला उधाण आले आहे. एका अधिकाऱ्याने अधिकृतपणे पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या काही वेळातच त्यांची नियुक्ती रद्द करून दुसऱ्या अधिकाऱ्याला त्याच पदाची जबाबदारी देण्यात आल्याने हा प्रकार पोलीस प्रशासनात अत्यंत दुर्मिळ मानला जात आहे.

उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनिफ मुलाणी यांची सहाय्यक पोलीस आयुक्तपदी बढती झाल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. त्यानंतर पृथ्वीराज घोरपडे यांची उरणच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांनी पोलीस ठाण्यात हजर होत अधिकृतपणे पदभारही स्वीकारला. मात्र, अवघ्या काही वेळातच संपूर्ण घडामोडींना अनपेक्षित कलाटणी मिळाली.

पोलीस मुख्यालयातून नव्याने आदेश प्राप्त झाल्यानंतर घोरपडे यांच्या नियुक्तीत बदल करण्यात आला आणि त्यांच्या जागी जगदीश शेलकर यांची वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर रात्री उशिरा शेलकर पान २ वर

# पाऊस पडूनही गावे तहानलेलीच

## पावणे दोन लाख नागरिकांना ८५ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

जिल्ह्यामध्ये पावसाने सोमवारपासून पुन्हा जोरदार सुरुवात केली आहे. मंगळवारीदेखील जिल्ह्यात अनेक भागात मध्यम व हलक्या स्वरुपाचा पाऊस पडला. या पावसामुळे नदी, विहिरींसह शेतही पाण्याने भरली. शेतकऱ्यांना पावसाने दिलासा मिळाला आहे. पाऊस पडूनही जिल्ह्यातील पावणे दोन लाख नागरिक मात्र तहानललेच असल्याचे चित्र समोर आले आहे. जिल्ह्यातील ३४६ वाड्या आणि ११५ गावांमध्ये ८५ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा सुरुच असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून प्राप्त झाली आहे.

प्रदीर्घ कालावधीनंतर पावसाने

### चार दिवस अतिवृष्टीचा इशारा

रायगड जिल्ह्यामध्ये दोन दिवसांपासून पावसाने पुन्हा सुरुवात केली आहे. हा पाऊस पुढील चार दिवस असाच सुरु राहणार आहे. मात्र, आगामी या कालावधीत अतिवृष्टी होणार असल्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. दोन जुलैला रेड अलर्ट इशारा आहे. अन्य दिवशी अनेक भागात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस कोसळणार असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी या कालावधीत विनाकारण घराबाहेर पडू नये, स्वतः ची काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



सोमवारी २२ जूनपासून हजेरी लावली. त्यानंतर भातपेरणीची कामे वेगात सुरु झाली. मात्र, २५ नंतर पावसाने दोन दिवस विश्रांती घेतली. दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर पावसाने पुन्हा सोमवारपासून सुरुवात केली. हलक्या मध्यम स्वरुपाचा पाऊस सोमवारी दिवसभर सुरुच राहिला. मंगळवारीदेखील पावसाच्या सरी कोसळल्या. जिल्ह्यामध्ये एकूण ९९६ मि.मी. इतका पाऊस पडला असून, सरासरी पान २ वर

# जनसंघटना वाढविण्यावर भर द्या

## शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचे आवाहन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

राज्यात शेतकऱ्यांसह बेरोजगारांचे प्रश्न गंभीर आहेत. मागासवर्गीय घटकांचे अधिकार काढण्याचा डाव आखला जात आहे. महागाईच्या झळा प्रचंड वाढल्या आहेत. मात्र, सत्ताधारी आमदार-खासदार फोडण्यामध्ये मग्न आहेत. सर्वसामान्यांकडे लक्ष द्यायला त्यांच्याकडे वेळ नाही. ही मोठी चिंताजनक बाब आहे. त्यामुळे पक्षसंघटना वाढवून जनतेच्या प्रश्नांचा आवाज बनण्यासाठी कामाला लागा, असे आवाहन शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले.

शेतकरी कामगार पक्षाच्या




### खोपोलीत होणार वर्धापन दिन

२ ऑगस्ट रोजी होणारा शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापन दिन रायगड जिल्ह्यातील खोपोली येथे घेण्यात येणार आहे. वर्धापन दिनाच्या तयारीसाठी जिल्हा, तालुका स्तरावर बैठका घेतल्या जाणार आहे. पदाधिकाऱ्यांचे दौरे जिल्ह्यात काढण्यात येणार असल्याचेही यावेळी जयंत पाटील यांनी सांगितले.

मध्यवर्ती समितीची बैठक मंगळवारी (दि. ३०) मुंबई येथील कार्यालयात झाली. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक घेण्यात आली. यावेळी जयंत पाटील बोलत होते. पान २ वर

रायगडच्या शिरपेचात मानाचा तुरा | मानसी वाळंज-मोकल यांची मानाच्या मुकुटावर मोहोर

# नागोठण्याची लेक ठरली ‘मिसेस महाराष्ट्र’

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील नागोठण्याच्या मानसी वाळंज-मोकल यांनी राज्यस्तरीय सौंदर्य स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत ‘मिसेस महाराष्ट्र २०२६’ हा मानाचा किताब पटकावला आहे. त्यांच्या या यशामुळे नागोठणे गावासह संपूर्ण रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून, सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

स्मृती एंटरप्रायझेस प्रस्तुत “The Jewel One Pageant – Mrs Maharashtra 2026” या राज्यस्तरीय सौंदर्य स्पर्धेचा भव्य ग्रँड फिनाले नुकताच पुणे येथे उत्साहात पार पडला. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील सहा प्रमुख शहरांमध्ये प्राथमिक फेऱ्या घेण्यात आल्या होत्या. राज्यभरातून ५०० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. त्यातून कठोर निवड प्रक्रियेनंतर अवघ्या ५० स्पर्धकांना अंतिम फेरीत स्थान मिळाले.

ग्रँड फिनालेमध्ये आत्मविश्वासपूर्ण व्यक्तिमत्त्व, प्रभावी संवादकौशल्य, रंगमंचावरील वावर आणि आकर्षक सादरीकरणाच्या जोरावर मानसी वाळंज-मोकल यांनी परीक्षकांची मने जिंकत प्रथम क्रमांक पटकावला आणि ‘मिसेस महाराष्ट्र २०२६’ या प्रतिष्ठेच्या किताबावर आपले नाव कोरले. विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत रंगलेल्या या सोहळ्यात मानसी यांच्या विजेतेपदाची घोषणा होताच उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले.

मानसी वाळंज-मोकल यांच्या या यशामुळे केवळ त्यांच्या कुटुंबाचाच नव्हे, तर नागोठणे आणि रायगड जिल्ह्याचाही गौरव वाढला आहे. मेहनत, आत्मविश्वास आणि जिद्दीच्या बळावर राज्याचा मानाचा मुकुट आपल्या नावावर करणाऱ्या मानसी आज अनेक महिलांसाठी प्रेरणादायी ठरल्या आहेत. त्यांच्या या यशाबद्दल सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. महिलांनी फक्त चूल आणि मूल याच्यापलीकडे विचार करत आपल्या स्वप्नांना साकार करण्यासाठी मेहनत आणि जिद्द कायम ठेवली तर यश नक्कीच मिळते, असा विश्वास मिसेस महाराष्ट्र पुरस्कार विजेच्या मानसी वाळंज-मोकल यांनी व्यक्त केला.




(छायाचित्र : महेश पवार)

## वाहनाच्या धडकेत दोघांचा मृत्यू

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल-जेएनपीटी मार्गावरील जांभुळपाडा येथे अज्ञात वाहनाच्या धडकेत दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या अपघातानंतर त्यांना धडक देणाऱ्या वाहनचालकाने पलायन केले असून, पनवेल शहर पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे. या अपघातातील दोन्ही मृत व्यक्तींची ओळख पटली नसल्याने पोलिसांनी त्यांची ओळख पटविण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. या अपघातात मरण पावलेले दोन्ही व्यक्ती पनवेल-जेएनपीटी मार्गावरील जांभुळपाडा येथून जात असताना अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली. दोघेही गंभीर जखमी झाल्याने पोलिसांनी त्यांना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयामध्ये दाखल केले.

# कर्करोगाचे निदान दारी

## मोबाईल व्हॅनद्वारे जिल्ह्यात २५ ठिकाणी होणार शिबिरे



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

नागरिकांच्या राहणीमानात दिवसेंदिवस बदल होत आहे. त्याचा आरोग्यावर परिणाम होत आहे. कर्करोगाचे निदान करण्यासाठी आरोग्य विभागाने पाऊल उचलले आहे. रायगड जिल्ह्यात विशेष कर्करोग तपासणी व्हॅन सुरु करण्यात आली आहे. या व्हॅनच्या माध्यमातून दारीच कर्करोगाचे निदान होणार आहे. २ ते ३० जुलै या कालावधीत विविध तालुक्यांतील २५ ठिकाणी मोफत तपासणी शिबिरांचे आयोजन या व्हॅनद्वारे करण्यात आले आहे.

रायगडजिल्ह्यातीलनागरिकांना कर्करोगाचे लवकर निदान व वेळेत उपचार मिळावेत या उद्देशाने जुलै महिन्यात जिल्हाभर विशेष कर्करोग तपासणी व्हॅन फिरणार आहे. या विशेष मोहिमेंतर्गत पनवेल, कर्जत, खालापूर, सुधागड, तळा, माणगाव, पोलादपूर, महाड, रोहा, अलिबाग, पेण पान २ वर

पान १ वरून

## चेंबूरमध्ये स्कूल बसवर झाड कोसळले

बचावकार्य पूर्ण करुन सर्व १२ विद्यार्थ्यांना बाहेर काढले.

अपघातानंतर जखमी झालेल्या पाच विद्यार्थ्यांना तातडीने चेंबूरमधील झेन रुग्णालयात दाखल करण्यात आले. यापैकी चार विद्यार्थ्यांना किरकोळ दुखापत झाली असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. मात्र, विहान श्रीवास्तव (११) या विद्यार्थ्याला गंभीर दुखापत झाली होती. डॉक्टरांनी त्याच्यावर उपचार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, सायंकाळी ४.२३ वाजता त्याला मृत घोषित करण्यात आले. विहानच्या अचानक जाण्याने श्रीवास्तव कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## तासाभरात बदलली खुर्ची

यांनी उरण पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारला. पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत करत नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या.

या अभूतपूर्व घडामोडीमुळे विविध चर्चांना उधाण आले आहे. पदभार स्वीकारल्यानंतर इतक्या कमी वेळात आदेशात बदल का करण्यात आला? प्रशासकीय स्तरावर नेमके काय घडले? पूर्वीचा आदेश मागे घेण्यामागे कोणते कारण होते? या प्रश्नांची अधिकृत उत्तरे अद्याप समोर आलेली नसल्याने तर्क-वितर्कांना अधिकच खतपाणी मिळत आहे.

दरम्यान, जगदीश शेलकर यांच्यासाठी उरण हा नवीन कार्यक्षेत्र नाही. यापूर्वी त्यांनी येथे सेवा बजावल्याने स्थानिक परिस्थिती, सामाजिक प्रश्न आणि गुन्हेगारीचे स्वरूप त्यांना परिचित आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत उरणचा चेहरामोहरा झपाट्याने बदलला आहे. वाढता औद्योगिक विकास, जेएनपीए परिसरातील वाढती वर्दळ, जमिनींचे कोट्यवधी रुपयांचे व्यवहार, संघटित गुन्हेगारी, अवैध धंदे आणि कायदा-सुव्यवस्थेची वाढती आव्हाने लक्षात घेता त्यांच्या खांद्यावर मोठी जबाबदारी असणार आहे.

उरणकरांच्या अपेक्षा आता नव्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांकडून वाढल्या आहेत. अवैध धंद्यांवर प्रभावी कारवाई, संघटित गुन्हेगारीवर अंकुश, नागरिकांचा पोलीस प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ करणे, वाहतूक व कायदा-सुव्यवस्था सुरळीत राखणे आणि वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर प्रभावी पोलीसिंग उभारणे, या सर्व आघाड्यांवर जगदीश शेलकर यांची खरी कसोटी लागणार आहे.

दरम्यान, तासाभरात बदललेले नियुक्ती आदेश हे उरणच्या पोलीस इतिहासातील चर्चेचा विषय ठरले असून, या निर्णयामागील कारणांचा उलगडा होणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जनसंघटना वाढविण्यावर भर द्या



या बैठकीत शेकापचे नेते माजी आ. बाळाराम पाटील, ॲड. राजेंद्र कोरडे, आ. बाबासाहेब देशमुख, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, महिला आघाडीच्या प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, प्रदीप नाईक, डॉ. अनिकेत देशमुख, रामदास जराते, मोहन गुंड, बीडचे जिल्हा चिटणीस नारायण गोले पाटील, रायगड जिल्हा चिटणीस सुरेश खैरे आदींसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीमध्ये शेतकरी कामगार पक्षाची ध्येय धोरणे स्पष्ट करण्यात आली. पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये युवक, विद्यार्थी, महिला व वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळींची संघटना उभारण्याचे धोरण आखण्यात आले. वेगवेगळ्या संघटनाचे जाळे राज्यभर निर्माण करून तळागाळातील घटकांसह वंचित, अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. राज्यात बेरोजगारीचा प्रश्न गंभीर असताना, शेतकरी कर्जमाफीच्या प्रतीक्षेत आहेत. महागाई गगनाला भिडली आहे. सर्वसामान्य या महागाईमुळे त्रस्त झाले आहेत. तसेच मागासवर्गीय घटकांचे अधिकार हिसकावण्याचा डाव आखण्यासाठी उपवर्गीकरणचा प्रश्नदेखील निर्माण झाला आहे. राज्यात वेगवेगळे प्रश्न असतानाही त्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. त्यामुळे सर्वसामान्य जनता मेटाकुटीला आली आहे. सर्वसामान्यांचा आवाज बनण्याचे काम कायमच शेतकरी कामगार पक्षाने केले आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जनतेमध्ये जाऊन त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. जनसंघटना वाढवून जनतेच्या प्रश्नांचे राजकारण रस्त्यावर उतरून करण्यासाठी तयार व्हा. आगामी काळात होणाऱ्या निवडणुकांमध्ये शेतकरी कामगार पक्षाचे प्राबल्य निर्माण झाले पाहिजे. त्या जिद्दीने सर्वांनी कामाला लागला, असे आवाहन शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले.

## पाऊस पडूनही गावे तहानलेलीच

६२.२५ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. नदी, विहिरी पाण्याने भरल्या. नद्या पाण्याने ओसंडून वाहू लागल्या. कोरड्या पडलेल्या धरणांमध्ये पाणी साचू लागले. जिल्ह्यातील २८ धरणांमध्ये आता २२.२० टक्क्यांहून अधिक जलसाठा आहे. पाऊस पडूनही जिल्ह्यात पाणीटंचाईचे संकट कायम असल्याची माहिती समोर आली आहे. अजूनही एक ते तीन दिवस आड पाणीकपात केली जात आहे. त्यामुळे पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. जिल्ह्यातील अलिबाग, उरण, पनवेल, कर्जत, खालापूर, पेण, सुधागड, रोहा, माणगाव, महाड, पोलादपूर, म्हसळा, श्रीवर्धन, मूरूड तळा या तालुक्यातील ४६१ ठिकाणी पाण्याचा दुष्काळ आहे. त्यामध्ये ११५ गावे आणि ३४६ वाड्यांचा समावेश आहे. या टंचाईग्रस्त गावांमध्ये ८५ टँकरद्वारे पाणीपुरवठा प्रशासनाकडून केला आहे. जिल्ह्यातील एक लाख ८१ हजार ७३२ नागरिकांना पाण्याचा दुष्काळ भर, पावसात निर्माण झाला असल्याचे आकडेवारीनुसार दिसून येत आहे.

**नऊ धरणे कोरडीच**

पाटबंधारे विभागाच्या अखत्यारित येणारी रायगड जिल्ह्यातील २८ धरणे आहेत. या धरणांद्वारे जिल्ह्यातील लाखो नागरिकांना पाणीपुरवठा केला जातो. पावसाने उशीर केल्याने धरणांनी तळ गाठला होता. पाणीटंचाईची समस्या तीव्र झाली होती. मात्र, गेल्या आठ दिवसांपासून सुरु झालेल्या पावसामुळे नागरिकांना दिलासा मिळाला. परंतु, जिल्ह्यातील मुरूड तालुक्यातील फणसाड, सुधागडमधील ढोकशेत या धरणांमध्ये शून्य टक्के जलसाठा आहे. सुधागडमधील घोटवडे धरणात सहा टक्के, उन्हेरेमध्ये नऊ टक्के, महाडमधील कोथुर्डेमध्ये दहा टक्के, पनवेलमधील बामणोलीमध्ये दोन टक्के, खालापूरमधील डोणवतमध्ये अकरा टक्के आणि उरणमधील पुनाडेमध्ये फक्त सातच टक्के जलसाठा आहे. त्यामुळे ही नऊ धरणे कोरडी अशी परिस्थिती भरपावसात असल्याची माहिती समोर येत आहे.

## कर्करोगाचे निदान दारी

आणि उरण या तालुक्यांतील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे व ग्रामीण रुग्णालयांमध्ये कर्करोग तपासणी शिबिरे भरविण्यात येणार आहेत. या शिबिरांमध्ये तज्ज्ञ वैद्यकीय पथक नागरिकांची तपासणी करणार आहेत. आवश्यकतेनुसार पुढील उपचारांसाठी मार्गदर्शनही केले जाणार आहे. दोन जूलैपासून या मोहिमेला सुरुवात होणार आहे.

माणगाव महाड, तालुक्यात तीन, अलिबाग, पनवेल, कर्जत, खालापूर, तळा, पोलादपूर, रोहा, पेण या तालुक्यात दोन आणि सुधागड, उरणमध्ये एक वेळा व्हॅन फिरणार आहे. तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणारे, दीर्घकाळ तोंडातील जखमा, गाठी, स्तनांमध्ये बदल, असामान्य रक्तस्राव किंवा इतर संशयास्पद लक्षणे असलेल्या व्यक्तींनी तपासणीस प्राधान्य द्यावे, असे आरोग्य विभागाने आवाहन केले आहे. कर्करोगाचे सुरुवातीच्या टप्प्यात निदान झाल्यास उपचार अधिक प्रभावी ठरतात. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही भीती न बाळगता या शिबिरात सहभाग घ्यावा. जिल्ह्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी ही फिरती तपासणी व्हॅन महत्त्वाची ठरणार असून, ३० जुलैपर्यंत विविध गावांमध्ये नियोजित वेळापत्रकानुसार शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. नागरिकांनी आपल्या परिसरातील शिबिराच्या तारखेची माहिती स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा आशा सेविकांकडून घेऊन या मोफत तपासणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य विभागाने केले आहे.

या ठिकाणी असणार व्हॅन : तालुकानिहाय गावे :- अलिबाग- रेवदंडा, खंडाळे., पनवेल- वावेघर, वाजे., कर्जत - खांडस, पिंगळ, खालापूर - चौक, खोपोली, सुधागड - नाडसूर, तळा - पन्हेली, मनदांड तळा - पन्हेली, माणगाव - मोर्बा, मांजरवाणे, येलवडे, पोलादपूर - पिलटवाडी, सवद, महाड - भावे, करंजाडी, बीरवाडी, रोहा - मेढा, संभेपेण - शिर्की, पेण, उरण - आवरे,

## डिझेलतस्करांना तीन दिवसांची कोठडी

यांच्यासह त्यांच्या पथकाने ही कारवाई केली. वाघेश्वर बोटीमध्ये साडेतीन हजार लीटर, आई गुरु माऊली बोटीमध्ये एक हजार ३० लिटर डिझेलचा सापडला. या कारवाई १४ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. उरण तालुक्यातील करंजा येथील गजानन कोळी, अनिल कोळी आणि योगेश पाटील या तिघांना अटक केली आहे. त्यांना मंगळवारी (दि. ३०) दुपारी अलिबागमधील न्यायालयात हजर केले. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप भोपळे करीत आहेत.

## बोगस मतदारांचा करेक्ट कार्यक्रम

आहे. त्यानंतर ४ सप्टेंबरपर्यंत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. प्राप्त दावे व हरकतींवर सुनावणी पूर्ण झाल्यानंतर ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यातील २ हजार ७९० मतदान केंद्रांशी संलग्न २५ लाख ३३ हजार ७३९ मतदारांची या मोहिमेद्वारे पडताळणी होणार आहे. पनवेल विधानसभा मतदारसंघात ५७४ मतदान केंद्रांवरील ६ लाख ८४ हजार ९५ मतदार, कर्जतमध्ये ३६२ केंद्रांवरील ३ लाख ५७ हजार २५५, उरणमध्ये १९० केंद्रांवरील ३ लाख १९ हजार ३३७, पेणमध्ये ३८० केंद्रांवरील ३ लाख ९ हजार ५८०, अलिबागमध्ये ३७५ केंद्रांवरील २ लाख ९५ हजार ४४९, श्रीवर्धनमध्ये ३५१ केंद्रांवरील ३ लाख ५ हजार ३४३ आणि महाडमध्ये ३९३ केंद्रांवरील २ लाख ६२ हजार ६८० मतदारांच्या नोंदींची पडताळणी करण्यात येणार आहे.

सन २००२ च्या मतदार यादीशी सध्याच्या मतदारांची जोडणी करण्याचे कामही या मोहिमेत होणार आहे. त्यामध्ये पनवेल मतदारसंघात ३५.११ टक्के, कर्जतमध्ये ५८.६८ टक्के, उरणमध्ये ७६.८५ टक्के, पेणमध्ये ७७.०४ टक्के, अलिबागमध्ये ८२.५७ टक्के, श्रीवर्धनमध्ये ८५.८५ टक्के आणि महाडमध्ये ८८.०५ टक्के मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.

मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी संबंधित व्यक्ती भारतीय नागरिक असणे आणि १ ऑक्टोबर २०२६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण झालेली असणे आवश्यक आहे. त्यामुळे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरी आल्यानंतर नागरिकांनी आवश्यक माहिती आणि कागदपत्रे उपलब्ध करून देऊन सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## कृषी विभागाला वसंतराव नाईकांचा विसर




आणि शेतीच्या प्रगतीसाठी त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. त्यामुळे एक जुलै हा दिवस हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त पाळला जातो. यानिमित्त राज्यात कृषी दिन साजरा केला जातो. बुधवारी (दि.१) जुलैला कृषी दिन आहे. माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस रायगड जिल्ह्यात कृषी विभागामार्फत राबविला जाणार आहे.

रायगड जिल्हा परिषद कृषी विभाग, महाराष्ट्र शासन व अलिबाग पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यात कृषी दिन साजरा करण्यात येणार आहे. त्याची तयारीदेखील करण्यात आली आहे. त्यासाठी आमंत्रण पत्रिका छापण्यात आली आहेत. मात्र, या पत्रिकेत नाईक यांच्या नावाचा साधा उल्लेखही नसल्याचे दिसून आले आहे. कृषी विभागाला वसंतराव नाईक यांच्या नावाचा विसर पडल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.-आर.-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) दिपरत्ना पंकज गायकवाड<br>२) साधना राजु मोरे | ८ | ११ | ०-०९-० | ० | ०६ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- ०१/०७/२०२६

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की खालील वर्णन केलेली जमीन मिळकत. सदर जमीनीचे मालक १) श्रीमती गुलाब उर्फ अनुसया बारकू हजारे, २) श्रीमती तारामती हरिचंद्र टोकरे, ३) श्री. संतोष पदु शिनारे, ४) श्रीमती. शोभा दशरथ शिनारे ५) श्रीमती सुशीला कृष्णा भोळ रा - आंबिवली बुद्रुक. पो. माणगाव त. वरेडी, जिल्हा - रायगड. यांचे मालकीची व त्यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटीची ७/१२ सदरी त्यांचे नावे असलेली भोगवटादार वर्ग २ श्री मिळकत जमिन मौजे आंबिवली बुद्रुक, पो. माणगाव त. वरेडी जिल्हा - रायगड या गावी आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे-

**मौजे-आंबिवली बुद्रुक, पो. माणगाव त. वरेडी, जिल्हा - रायगड येथील मिळकतींचे वर्णन**

| सर्व्हे/गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र - हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ५९ | १० | ०-३४-०० | ०-५० |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत झाडझाडोऱ्या सुद्धा सर्व हक्कहितसंबधासह सदर जमीनीचे मालक यांचे कडुन खालील सही करणार यांनी विकत घेण्यांचे ठरले असून त्याबाबत साठेकरार झालेला आहे. सदर जमीन मालक यांनी सदर वर वर्णन केलेली जमीन दुसरे कोणास कोणत्याही हक्काने म्हणजे साठेकरार, बयाणा पावती, हक्कसोड पत्र, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, गहाण दान बक्षिस खरेदी वगैरे दिलेली नाही. अगर दुसरे कोणास कोणत्याही हक्कांने दिलेली नाही. अगर तोंडी अगर लेखी करार केलेला नाही. जर करता सदर मिळकतीबाबत कोणाचीही कुठल्याही प्रकारची तक्रार हरकत असल्यांस त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनी लेखी पुरावे सादर करावेत. जर करीता सदर मुदतीस कोणाचीही कुठल्याही प्रकारची तक्रार हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहित अशी समजुन सदर मिळकतीचे रजिस्टर खरेदी खत केले जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस व हरकतीस खालील सही करणार हे जबाबदार राहणार नाही.

करीता सदर जाहिर नोटीसीने कळवित आहे.

तारीख : ३०/०६/२०२६

सही/-
**श्री. ज्ञानेश्वर बालासाहेब डाके**
रा. पिंपरी खुर्द, ता. माजलगाव,
जिल्हा बीड ४३११३१
९३२३२७२७६२/९६८९८२६३८३

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा/वाटपपत्र करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा/भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी वाटपाशी संबंधित न्यायालयी दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ता.पनवेल, जि.रायगड | | | | |
| १ | खारघर २४७ | ६४ | ३४३/३ | ०-२३-३ | ५५.३८ चौ.मी. | भुखंड क्र.११५A, सेक्टर-१०, क्षेत्र-५५.३८ चौ.मी. | **कै. काळ्या रामा कामोठकर (मयत) यांचे वारस**<br>**१)श्री. धर्मा काळ्या कामोठकर**<br>**२) कै. बाळाराम काळ्या कामोठकर (मयत)**<br>२.१) अनुसया बाळाराम पाटील<br>२.२) प्रमोद बाळाराम पाटील<br>२.३) विनोद बाळाराम पाटील<br>२.४) राकेश बाळाराम पाटील | निरंक |
| | | ६५ब | १६०/२ | ०-२३-६ | | | | |
| | | २२ | १४३अ/१ | ०-३८-५ | | | | |
| | | २४ई | १४४/४ | ०-४३-५ | | | | |
| | | ६४ | ११८/३<br>१५१/१<br>१५२/२५<br>१४३/३ब | ०-२१-८<br>०-२३-३<br>०-०१-५<br>०-४६-८ | | | | |
| | | ६६ड | १९४/२ | ०-२६-५ | | | | |
| २ | भेंडखळ ३३८ | १०१ | १५९/४<br>१६२/९<br>१९१/१<br>१९२/५<br>१९५/११<br>१९६/८ | ०-०६-३<br>०-१४-९<br>०-०४-०<br>०-०१-३<br>०-०२-३<br>०-०७-८ | २७०० चौ.मी. पैकी ११०० चौ.मी. | नोड- द्रोणागिरी, सेक्टर-५७. भूखंड क्र. ४. क्षेत्र- ११०० चौ.मी. प्रस्तावित | मूळ भूधारक कै. श्री. पांडुरंग बाळू ठाकूर हे मयत असून त्यांचे मा. न्यायालय, उरण यांच्याकडील CIVIL MISC. APPLN. NO. ५४/२००६ नुसार वारस म्हणून१. श्री. ज्ञानप्रकाश पांडुरंग ठाकूर २. श्रीमती. काशीबाई शांताराम म्हात्रे ३. सौ. सुमती धर्माजी पाटील यांच्या नावे घोषित केलेले आहे. तसेच भूधारक कै. श्री. ज्ञानप्रकाश पांडूरंग ठाकूर हे मयत असून त्यांचे मा. न्यायालय, उरण यांच्याकडील CIVIL MISC. APPLN. NO.२१२/२०१७ नुसार वारस म्हणून श्रीमती वस्तला ज्ञानप्रकाश ठाकुर यांच्या नावे घोषित केलेले आहे. तसेच<br>दावा क्र. SCS-२५/२००७ मधील आदेशानुसार हिस्सेवाटणी<br>वादी : श्री. ज्ञानप्रकाश पांडुरंग ठाकुर यांना ११०० चौ.मी. यांचे वारस श्रीमती वस्तला ज्ञानप्रकाश ठाकुर यांची पात्रता वाटप करणेसंबंधी<br>प्रतिवादी: श्रीमती सुमती धर्माजी पाटील यांना ८०० चौ.मी. व श्रीमती काशीबाई शांताराम म्हात्रे यांना ८०० चौ.मी. | दावा क्र. SCS-२५/२००७ मधील हिस्सेवाटणी आदेशा नुसार श्री. ज्ञानप्रकाश पांडुरंग ठाकूर यांना ११०० चौ.मी. यांचे वारस श्रीमती वस्तला ज्ञानप्रकाश ठाकूर यांची पात्रता वाटप करणेकरीता |
| | भेंडखळ ३३८ | २३७/८१ | ४६/३ | ०-०९-१ | | | | |
| | भेंडखळ ३३८ | ८७अ/८१ | ५०/१<br>१०२/३<br>१०५/६<br>११६/७<br>६६/४ | ०-२८-६<br>०-०६-०<br>०-०१-८<br>०-१५-५<br>०-२४-५ | | | | |
| | भेंडखळ ३३८ | १६३/८३-८४ | ५/१<br>८/२<br>१७/२<br>१९/१<br>२४/१ | ०-१४-४<br>०-०७-२<br>०-०८-०<br>०-१४-५<br>०-०६-६ | | | | |
| | भेंडखळ ३३८ | १००/८३-८४ | २२/६ | ०-०७-६ | | | | |
| | भेंडखळ ३३८ | ३८अ/८३ | ५७/१<br>९८/३<br>७२/५ | ०-१५-४<br>०-०५-०<br>०-१४-९ | | | | |
| | भेंडखळ ३३८ | ३८ब/८२ | ९१/५ | ०-०६-० | | | | |
| | भेंडखळ ३३८ | ३८क/८३ | १००/५ | ०-०७-७ | | | | |
| | भेंडखळ ३३८ | ३०० | २४३/८<br>२४४/१<br>२४८/६<br>२४८/९<br>२४८/१३<br>२४९/१४<br>२४९/१०<br>२५०/५<br>२५२/३<br>२५७/७ | ०-०७-३<br>०-०९-६<br>०-०१-०<br>०-१७-३<br>०-११-९<br>०-०१-८<br>०-०१-८<br>०-१०-९<br>०-१३-०<br>०-०७-३ | | | | |
| | **एकुण क्षेत्र** | | | **३-११-६** | | | | |
| ३ | उलवे १२३३ | गव्हाण ३२८ | ४८/७<br>४५/२ | ०-१०-०<br>०-३६-० | ४०० | उलवे नोड येथील भुखंड क्र. १२, ब्लॉक क्र.A, सेक्टर-८, क्षेत्र-३९८.९८ चौ.मी. | मुळ भूधारक कै. धोंडू नारायण म्हात्रे (मयत) यांचे वारस १) श्री. नामदेव धोंडू म्हात्रे, २) श्री. जगन्नाथ धोंडू म्हात्रे, ३) श्रीमती चंद्रभागा नारायण भोईर, ४) श्रीमती रंजना तुकाराम कडू, ५) श्रीमती रसिता नामदेव घरत, ६) श्रीमती रुपा वसंत पाटील व ७) श्रीमती लडकूबाई धोंडू म्हात्रे | उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र.३, पनवेल यांच्या कार्यालयाकडील दिनांक ०९.०७.२०१० रोजीचा अहवाल विचारात घेता मौजे गव्हाण निवाडा क्र.३२८, सर्व्हे क्र./ हि.क्र. १२०/२+३+ ४/अ व इतर, एकुण क्षेत्र ०-२८-६ हे.आर. या जमिनीचा २५० चौ.मी. पात्रता कमी करण्यात आली आहे. त्यानुसार उलवे नोड येथील भूखंड क्र. १२, सेक्टर-८, क्षेत्र-६५० चौ.मी. या भुखंडाचे विभाजन करण्यात आले असून उर्वरित ४०० चौ.मी. पात्रतेकरिता बाजूस नमूद भुखंडाचे वाटप प्रस्तावित आहे. |
| ३ | रोडपाली | ८५ | ४५/० | ०-६४-० | दिवाणी दावा क्र. ३१९/२०१७ मधील मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार वादी श्री. मोहन कचेर पवार यांचे १/४ हिस्सा असल्याने वादी ५३७.५ चौ.मी. पात्रता मंजुर | भुखंड क्र. ४२, सेक्टर-१०ई, क्षेत्र ५३७.५० चौ.मी. रोडपाली नोड | कै. बायमाबाई कचेर पवार (मयत) यांचे वारस श्री. मोहन कचेर पवार | निरंक |
| | रोडपाली | ८५(२) | ४१२/१ | ०-५१-९ | | | | |
| | रोडपाली | २६ | १६९/० | ०-३१-१ | | | | |
| | रोडपाली | ११४ | ४३७/४४ | ०-२६-३ | | | | |
| | रोडपाली | १४४ | ४३८/३६<br>४३८/६०<br>४३८/६९पै | ०-१४-२<br>०-१६-२<br>०-६०-० | | | | |
| | रोडपाली | १६१(२) | ३३५/२(१) | ०-०१-३ | | | | |
| | द्रोणागिरी १९४ | जसखार १९ | २९६/१अ | २-४२-० | २४४४ चौ.मी. | नोड जे.एन.पी.टी. ब्लॉक - १० सेक्टर-०७, भुखंड क्र. ०५, क्षेत्र-२४४४ चौ.मी. | **कै. मैनुददीन मलिक युसूफ ठाकूर (मयत) यांचे वारस**<br>१. मरयम अजम तुंगेकर<br>२. आयशाबी अब्दुल मजीद करते<br>३. नुजहत अविद् बक्षी<br>४. फातीम एस गोडेकर<br>५. तसलिम इब्राहिम जितेकर<br>वारस दाखला क्र. १२२/२००७<br>**कै.आयशाबी अब्दुल मजीद करते (मयत) यांचे वारस**<br>१. अब्दुल हन्नान अब्दुल मजीद कर्ते<br>२. अब्दुल लतीफ अब्दुल मजीद कर्ते<br>वारस दाखला क्र.२१८/२०२२<br>**कै. नुजहत अविद बक्षी (मयत) यांचे वारस**<br>श्री. मोहम्मद आबिद मोहम्मद हुसैन बक्षी<br>श्री. मोतसीम आबीद बक्षी<br>सौ. सना नबील रोघे<br>सौ. सिनिन मुईन हैदांडे<br>वारस दाखला क्र.२१९/२०२२<br>**कै. चंद्राबाई वामन म्हात्रे (मयत) यांचे वारस**<br>कृष्णा सहदेव म्हात्रे<br>वारस दाखला क्र.२३१/२००७ | सक्षम न्यायालयाने घोषित केलेले वारस आणि हक्कसोडपत्रानंतर पात्र भूधारक<br>**१. फातीम शहनवाज गोडेकर**<br>**२. तसलिम इब्राहिम जितेकर**<br>**३. मोतसीम आबीद बक्षी**<br>**४. सौ. सना नबील रोघे**<br>**५. सिनिन मुईन हैदांडे**<br>**६. कृष्णा सहदेव म्हात्रे**<br>यांच्या नावे भूखंड वाटपाचे प्रस्तावित आहे. |
| | | फुंडे २१५/५९० | ३८/७ | ०-२-० | | | | |
| | | फुंडे २४/३७ | ५०/६अ | ०-१-६ | | | | |
| | | फुंडे ४६/७४<br>४६/७४ अ | २६/८<br>२७/१<br>२९/४<br>३१/१<br>३४ /८<br>३८ /१७<br>४० /७<br>४९ /१९<br>४९ /३१<br>११९ /१०<br>१२० /१४ | ०-८-८<br>०-१२-६<br>०-११-१<br>०-११-०<br>०-४-३<br>०-२-३<br>०-३-०<br>०-३-०<br>०-०-५<br>०-२-०<br>०-१-५ | | | | |
| | | फुंडे ४६ ४६अ | १३०/१० | ०-५-९ | | | | |
| | | फुंडे ४६+१६५ /२५० | ७/८<br>१९/११<br>११८ /९<br>१२२ /३१<br>१२२ /३८<br>१२६ /५<br>१३७ /१<br>१५६ /७<br>१५/१३सी | ०-५-१<br>०-५-१<br>०-३-०<br>०-०-८<br>०-०-८<br>०-७-०<br>०-७-७<br>०-५-२<br>०-२-५ | | | | |
| | | फुंडे ४०/४८ | ५६/५<br>६६/६ | ०-२-५<br>०-३-८ | | | | |
| | | फुंडे १८/२१अ | १३ /१६<br>१४/४<br>२०/७<br>११४ /१०<br>१३३ /६<br>१४२ /२<br>१५२ /४ | ०-३-५<br>०-३-३<br>०-१-०<br>०-३-६<br>०-३-०<br>०-५-१<br>०-३-० | | | | |
| | | **एकुण संपादित क्षेत्र** | | **३-७६-६** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, १२.५% भूमि विभाग,
सिडको भवन, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी(पनवेल/उरण)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**सिडको/जनसंपर्क/१२८/२०२६-२७**

# डिझेलविना शेतकऱ्यांची परवड




**| खोपोली | प्रतिनिधी |**

**आखाती देशातील युद्ध आणि केंद्र सरकारने काळाबाजार रोखण्यासाठी कॅन किंवा बॅरलमध्ये डिझेल देण्यावर कडक निर्बंध घातले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना ट्रॅक्टरसाठी व शेतीपंपासाठी डिझेल मिळण्यास अडचणी येत आहेत. पेट्रोल पंपावर डिझेल आणण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यांना खाली हात परतावे लागत आहे. ''आधी तहसीलदार कार्यालयाची परवानगी आणा मगच डिझेल घेऊन जा'' असे पेट्रोप पंप मालकाकडून सांगण्यात येत आहे. आधीच पेट्रोल, डिझेलचा तुटवडा त्यानंतर दरांमध्ये मोठ्या प्रमाणात झालेली वाढ आणि त्यातच हे नवे संकट शेतकऱ्यांसमोर निर्माण झाले आहे. यंदा पावसाने देखील उशीरा हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांची कामे देखील खोळंबली आहेत. भविष्यातही अशीच संकटे उद्भवत राहिली तर शेतीच नामषेश होईल, असे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमधून बोलले जात आहे.**

**■ पुन्हा शेतीची कामे खोळंबली**

**■ शासनाकडून उपाययोजना करण्याची गरज**

आखाती देशातील युद्धामुळे सध्या देशावर इंधन तुटवड्याचे सावट आहे. त्याचबरोबर काळाबाजार रोखण्यासाठी शासनाने अनेक ठिकाणी पेट्रोल व्यवसायात निर्बंध आणले आहेत. त्यातच पेट्रोल, डिझेलच्या दरांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्याचा मोठा परिणाम शेतकऱ्यांवर होत आहे. आजकाल बहुतांश शेतकरी शेतीच्या मशागतीसाठी ट्रॅक्टरचा आणि इंधनावर चालणाऱ्या शेतीपंपाचा सर्रास उपयोग करतात. ते चालविण्यासाठी डिझेलची गरज असते. परंतु, आखाती देशातील युद्धामुळे इंधनांचा तुटवडा पडला. त्यामुळे काळाबाजार रोखण्यासाठी शासनाने कॅन किंवा बॅरलमध्ये डिझेल देण्यावर कडक निर्बंध घातले आहेत. त्यातच यंदा पावसाने देखील उशीरा हजेरी लावल्याने जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांची कामे खोळंबली आहेत. त्यातच इंधनाच्या संकटामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. पेट्रोल पंपावर शेतकरी डिझेल आणण्यासाठी गेला असता, ''आधी तहसीलदार कार्यालयाची परवानगी आणा मगच डिझेल घेऊन जा'' असे पेट्रोप पंप मालकाकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना खाली हात परतावे लागत आहे. परिणामी जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांना आपले ट्रॅक्टर शेताच्या बांधासह घराच्या कडेला उभे करून ठेवण्यावची वेळ आली आहे.

दरम्यान, खालापूर तालुक्यातील होराळे ग्रामपंचायतीच्यावतीने शेतकऱ्यांची डिझेल अभावी होणारी गैरसोय लक्षात घेता तहसीलदार कार्यालयाला निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात, आमच्या परिसरातील अनेक पेट्रोल पंपांवर शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक असलेले डिझेल दिले जात नाही. सध्या शेतीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू असून पंपसेट, पॉवर टिलर, ट्रॅक्टर व इतर शेती अवजारांसाठी डिझेलची तातडीने आवश्यकता आहे. पेट्रोल पंप चालकांकडून डिझेल न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांची शेतीची कामे खोळंबत आहेत व आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे आपल्या स्तरावर संबंधित पेट्रोल पंप चालकांना योग्य सूचना देऊन प्रत्येक शेतकऱ्यास शेतीच्या गरजेसाठी किमान ५ लिटर डिझेल उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी करण्यात आली आहे.

### शासनाने सहकार्य करण्याची गरज

सध्या पावसाचा देखील जोर वाढला आहे. त्यातच रायगड जिल्ह्यातील प्रत्येक शेतकरी शेतीच्या कामांत गुंतला आहे. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याला डिझेल मिळविण्यासाठी तहसील कार्यालयात जाऊन परवानगी घेणे शक्य होत नाही. त्यामुळे जर शेती आणि शेतकरी वाचवायचा असेल, तर शासनाने एक पाऊल पुढे टाकणे गरजेचे आहे. तहसीलदार कार्यालयामार्फत यावर ठोस उपाय योजना राबवून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना डिझेल मिळण्याच्या कामात सहकार्य करावे, अशी मागणी सध्या शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

> "शेती व्यवसाय करताना अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. असे असतानाही भातशेती टिकवून ठेवली आहे. त्यातच यावर्षी पावसाने दांडी मारल्याने शेतीची कामे अनेक दिवस खोळंबली होती. त्यानंतर पावसाने काही दिवसानंतर सुरुवात केल्यानंतर आम्ही शेतकऱ्यांनी भात शेतीच्या कामाला सुरुवात केली. शेत उकळण्यासाठी ट्रॅक्टरची गरज असून, त्यासाठी लागणारे डिझेल आता पेट्रोल पंपात मिळत नसल्याने नवे संकट उभे राहिले आहे. पेट्रोल पंप मालकांकडून तहसीलदार कार्यालयाची परवानगी आणा, नंतरच डिझेल मिळेल, असे सांगण्यात येत आहे. त्यामुळे पुन्हा शेतीची कामे खोळंबली आहेत. तहसीलदार कार्यालयाने यावर ठोस उपाययोजना राबवून आम्हा शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.
> – दत्तात्रेय दिसले, शेतकरी, केळवली"



## भुयारी मोरी ठरतेय डोकेदुखी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील भिवपुरी रोड रेल्वे स्थानकासमोरील बाजूला असलेल्या डायमंड सोसायटीच्या आवारातील रेल्वेचा भुयारी मार्ग परिसरातील स्थानिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. पावसाळ्यात या मोरीमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचत असल्याने, स्थानिक नागरिक गणेश कडव यांच्या घरात पाणी शिरून त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या गंभीर समस्येकडे भिवपुरी रोड रेल्वे स्टेशन व्यवस्थापक जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे त्यांच्याकडून बोलले जात आहे.

या भुयारी मोरींची अद्याप साफसफाई देखील करण्यात आलेली नाही. त्यामुळे पुढे मुसळधार पडणाऱ्या पावसामुळे पाण्यासह या मोरीतील घाण गणेश कडव यांच्या घरात शिरणार हे त्रिवार सत्य आहे. रेल्वे प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे कडव कुटुंबाला मानसिक आणि आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. काही दिवसांपूर्वी रेल्वेने येथे नवीन मोरी टाकण्याचे काम हाती घेतले होते. त्यासाठी लागणाऱ्या सिमेंटच्या मोठ्या मोऱ्या आणून टाकण्यात आल्या आहेत. मात्र, त्या मोऱ्या जागेवर बसवण्याचे काम अद्याप सुरू करण्यात आलेले नाही. ''रेल्वेने सिमेंट मोऱ्या आणून टाकल्या खऱ्या, पण त्या बसवणार कधी?'' असा संतप्त प्रश्न स्थानिक नागरिक गणेश कडव यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, पावसाळा तोंडावर आलेला असताना रेल्वे प्रशासनाचा हा संथ कारभार स्थानिक रहिवाशांच्या जीवावर उठणारा ठरत आहे. एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी किंवा लोकांच्या घरात पाणी शिरून नुकसान होण्यापूर्वी रेल्वे प्रशासनाने तात्काळ या मोऱ्या बसवून पाण्याचा निचरा करावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

## निवडक

### पनवेल रेल्वे पोलिसांची जनजागृती

**खांदा कॉलनी :** नुकत्याच लोकल रेल्वे प्रवासादरम्यान घडलेल्या हल्ल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर पनवेल रेल्वे पोलीसांच्यावतीने रेल्वे प्रवाशांमध्ये जनजागृती मोहीम राबविण्यात आली. यावेळी रेल्वे स्थानक परिसरात प्रवाशांना धारदार शस्त्रे, अग्निशस्त्रे तसेच इतर घातक वस्तू घेऊन प्रवास करणे कायद्याने गुन्हा असून, अशा वस्तूंसह प्रवास करण्यास मनाई आहे, याबाबत माहिती देणारे फलक व बॅनर प्रदर्शित करण्यात आले. या मोहिमेद्वारे प्रवाशांना सुरक्षित प्रवासाचे महत्त्व पटवून देत संशयास्पद व्यक्ती अथवा वस्तू आढळल्यास तात्काळ रेल्वे पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले. रेल्वे प्रवास अधिक सुरक्षित करण्यासाठी प्रवाशांनी रेल्वे पोलिसांना सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले. ही जनजागृती मोहीम पनवेल रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. प्रवाशांनीही या उपक्रमाचे स्वागत करत सुरक्षित रेल्वे प्रवासासाठी अशा मोहिमा नियमितपणे राबविण्याची अपेक्षा व्यक्त केली.



### गव्हर्मेंट लॉटरीच्या नावाखाली फसवणूक

**श्रीवर्धन :** सध्या इंस्टाग्राम या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर अनेक प्रकारचे रिल्स त्याचप्रमाणे विविध जाहिराती दाखवल्या जातात. त्यामध्येच एक केरला गव्हर्मेंट नावाची लॉटरी, प्रति दिवस २५ कोटी रुपये बक्षीस, सोडत दुपारी ३.०० वाजता व सायंकाळी ७.०० वाजता अशाप्रकारे जाहिरात करण्यात येत आहे. या लॉटरीचे एक ऑनलाईन तिकीट घेतल्यानंतर ड्रॉची वेळ होऊन गेल्यानंतर ऑनलाइन रिझल्ट पाठवला जातो. जेवढ्या ग्राहकांनी ऑनलाइन तिकिटे खरेदी केलेली आहेत, त्याच नंबरचे रिझल्ट या ऑनलाईन रिझल्टमध्ये दाखविले जातात. या लॉटरीचा रिझल्ट पाहिल्यानंतर २५ लाखाचे, २५ कोटीचे, १२ कोटीचे किंवा १२ बारा लाखाचे बक्षीस लागले आहे ते समजते. त्यानंर व्हाट्सअप कॉलिंगद्वारे संपर्क करणाऱ्या व्यक्तीला बक्षीस लागल्याचे कळवल्यानंतर त्या व्यक्तीकडून बँक पासबुकचा फोटो व पासपोर्ट साईज फोटो मागवण्यात येतो. त्यानंतर मेसेज येतो की, एक तासामध्ये अ‍ॅप्रूव्हल पाठवले जाईल आणि त्यानंतर खात्यामध्ये संबंधित रक्कम जमा होईल. साधारण तासाभरानंतर व्हॉटस्‌अप कॉलिंगद्वारे मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्तीचा पुन्हा कॉल येतो. त्याच्याकडून सांगण्यात येते की, खात्यात लवकरच पैसे जमा होतील; परंतु, त्याचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी ५ हजार ५०० रूपये दिलेल्या स्कॅनर वर पाठवावे लागतील. मात्र, ही रक्कम पाठवल्यानंतर समोरून कोणत्याही प्रकारचा रिस्पॉन्स मिळत नाही. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येते. अशाच प्रकारच्या जाहिराती इन्स्टाग्रामवरती श्री स्वामी समर्थ फायनान्स नावाने देखील दाखविल्या जात आहेत.



### खांदा वसाहत पुन्हा जलमय

**खांदा कॉलनी :** सध्या सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे खांदा वसाहत सेक्टर १३ मधील खांदेश्वर रेल्वे स्थानकाकडे पनवेलच्या दिशेने जाणारा मुख्य रस्ता पुन्हा एकदा पाण्याखाली गेला आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने सकाळच्या गर्दीच्या वेळी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आणि वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. रेल्वे प्रवासी, रिक्षाचालक, दुचाकीस्वार तसेच स्थानिक नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला. दरम्यान, पावसाचे पाणी रस्त्यावर साचत असल्याने वाहनचालकांना मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या परिसरात पावसाळ्यात पाणी साचण्याची समस्या कायम असून अद्यापही त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना झालेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

## मुसळधार पावसात जनआक्रोश मोर्चा



**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

मुसळधार पावसाची तमा न बाळगता ठाणा नाका येथील कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीपासून पनवेल महानगरपालिकेवर जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. कळंबोली व तळोजा परिसरातील वीज, पाणी, रस्ते तसेच इतर मूलभूत नागरी समस्यांकडे तसेच कळंबोलीतील डम्पिंग ग्राउंडच्या संदर्भात प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा मोर्चा आयोजित करण्यात आला होता. या मोर्चात मोठ्या संख्येने नागरिकांसह महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. पावसातही घोषणाबाजी करत मोर्चेकरी महापालिकेपर्यंत पोहोचले. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी ठिकठिकाणी कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या मोर्चात माजी उपमहापौर जगदीश गायकवाड, काँग्रेस नेते सुदाम पाटील, नगरसेवक लतीफ शेख, हरीश केणी तसेच काँग्रेस महिला नेत्या निर्मला म्हात्रे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले. नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांवर तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.



• अलिबाग एसटी स्थानकात असलेल्या केंद्राद्वारे पोलिओचा डोस पाजताना आरोग्य कर्मचारी (छायाचित्रः प्रमोद जाधव)

## छत गळतीमुळे प्रवाशांचे हाल

**खांदा कॉलनी :** मुसळधार पावसामुळे पनवेल रेल्वे स्थानकातील विविध समस्या ऐरणीवर आल्या असून, स्थानकाच्या छताला गळती लागल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. छतामधून थेट प्लॅटफॉर्मवर पाणी पडत असल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. पाणी चुकवत धावपळ करताना एखादा प्रवासी घसरून अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. रेल्वे प्रशासनाच्या देखभालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## तिसऱ्या मुंबईविरोधातील आंदोलन स्थगित

**| उरण | प्रतिनिधी |**

राज्य सरकारच्या प्रस्तावित तिसरी मुंबई प्रकल्पाविरोधात रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आरपारच्या लढाईची घोषणा केली होती. यावेळी १ जुलै रोजी कोकण आयुक्तालयावर निदर्शने आंदोलन करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला होता. दरम्यान, या पार्श्वभूमीवर नवी मुंबईचे सहाय्यक पोलीस आयुक्त व सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्याच्या मध्यस्थीने सोमवारी कोकण विभाग अपर आयुक्त फिरोद मुकादम व कोकण विभाग आयुक्त रुबेल अग्रवाल यांच्या दालनात स्वतंत्रपणे दोन बैठका घेण्यात आल्या. या बैठकीत एमएमआरडीए तिसरी मुंबई विरोधी १२४ गाव संघर्ष समिती, रायगडचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. या बैठकीत समितीकडून १ जुलैच्या निदर्शने आंदोलन व शेतकऱ्यांच्या भूमिकेसंदर्भात सविस्तर चर्चा झाली. कोकण आयुक्तांनी तातडीने एमएमआरडीएचे प्रधान सचिव व आयुक्त यांच्यासमवेत बैठक लावण्याचे विनंतीपत्र देत येत्या १० ते १५ दिवसांत बैठक घेण्याबाबत आश्वासीत केले. याबाबतचे दोन्ही लेखी पत्र एमएमआरडीए तिसरी मुंबई विरोधी १२४ गाव संघर्ष समिती व रायगड समितीकडे दिले असून, १ जुलैचे निदर्शने आंदोलन स्थगित करण्याची विनंती प्रशासनातर्फे समितीकडे करण्यात आली. त्या अनुषंगाने हे आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. मात्र, बैठक न झाल्यास स्थगित केलेले आंदोलन भविष्यात अधिक तीव्रपणे करण्याचा इशारा समितीकडून देण्यात आला आहे.

## सनाधरा रिसॉर्टमध्ये मृत्यूचा सापळा

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जतमधून एक अत्यंत थरारक आणि धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सांगवी येथील सनाधरा रिसॉर्टमध्ये बांधकाम सुरू असलेल्या इमारतीचा स्लॅब कोसळला असून, एक कामगार गंभीर जखमी झाला आहे. या कामासाठी कोणतीही अधिकृत परवानगी घेण्यात आली नव्हती. मालकाच्या बेजबाबदारपणामुळे अवघ्या एक महिन्यापूर्वी टाकलेला स्लॅब कोसळला आहे. ही घटना रविवारी (दि.२८) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घडली.

सांगवी येथील सनाधरा रिसॉर्ट मध्ये सुरू असलेल्या बांधकामाची कोणतीही अधिकृत परवानगी घेण्यात आली नव्हती. तसेच हे बांधकाम कोणत्याही आर्किटेक्ट आणि इंजिनिअरच्या देखरेखीखाली करण्यात येत नव्हते. अशा स्थितीत मालकाचा बेजबाबदारपणा आणि त्याच्या हलगर्जीपणामुळे महिनाभरापूर्वी टाकलेला अख्खा स्लॅब पत्त्यासारखा कोसळला. रविवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास जेव्हा हा ढिगारा कोसळला, तेव्हा वेल्डिंगचे काम करणारा मनोज नावाचा उत्तर भारतीय कामगार थेट तिसऱ्या मजल्यावरून खाली कोसळला. लोखंडी अवजड बीममध्ये त्याचा पाय अडकला म्हणून तो थोडक्यात बचावला. या घटनेची माहिती मिळताच खोपोलीच्या हेल्प फाऊंडेशनचे गुरुनाथ साठेलकर आणि त्यांची टीम घटनास्थळी पोहोचली. या रेस्क्यू टीमने वरून कधीही कोसळेल अशा अत्यंत धोकादायक स्ट्रक्चरच्या खाली उभे राहून, तब्बल पाच तास शर्थीचे प्रयत्न केले आणि अखेर मृत्यूच्या जबड्यातून मनोजला सुखरूप बाहेर काढले. या भीषण अपघातात फक्त मनोजच नाही, तर तिथे काम करणारे तीन स्थानिक आदिवासी बांधवही जखमी झाले आहेत. त्यांच्यावर सध्या कर्जत उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



**• कामगार गंभीर जखमी**

## नगरपंचायतीच्या कारभारवर विरोधक आक्रमक

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

पोलादपूर नगरपंचायतीच्या वेगवेगळ्या विषयावरील भोंगळ कारभाराचे वाभाडे निघत असतानाच सोमवारी (दि.२९) नगरपंचायतीच्या कार्यालयाकडे जाणारा रस्ताच नगरपंचायतीने बंद होऊ दिल्याने विरोधक पुन्हा आक्रमक झाले आहेत.



(छायाचित्रः शैलेश पालकर)

पोलादपूर ग्रामपंचायतीच्या काळापासून सध्याच्या नगरपंचायत कार्यालयाकडे जाणारा मुख्य रस्ता वहिवाटीचा रस्ता आहे. दरम्यान, नगरपंचायत कंपाऊंड व प्रवेशद्वारासमोर सुरू असलेल्या सैनिक इमारतीच्या बांधकामाचा एक खांब या रस्त्यावर उभारण्यासाठी मोठा खड्डा खणण्यात आला आहे. परिणामी, नगरपंचायत कार्यालयाकडे जाण्यासाठी अनेक वर्षांपासून वापरात असलेला रस्ता बंद झाला आहे. मात्र, याकडे पोलादपूर नगरपंचायत प्रशासन आणि सत्ताधारी पक्षाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे बोलले जात आहे. तसेच, नगररचनाकार आणि नगररचनेची महत्त्वाची पदे भूषविणाऱ्या अधिकाऱ्यांना याची जरादेखील कल्पना आली नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

## मुरुडमध्ये ५१७ मि.मी. पावसाची नोंद

**कोर्लई :** राज्यात दि.२९ जूनपासून मान्सूनने पुन्हा वेग घेतला आहे. हवामान विभागाने राज्यातील २३ जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट, तर ५ जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे पुढील काही दिवस अनेक भागांत मुसळधार पावसाची शक्यता आहे. दरम्यान, रायगड जिल्ह्यात पुन्हा एकदा मान्सून सक्रिय झाला असून, मुरुडमध्ये मंगळवारी (दि.३०) सकाळी १०८ मि.मी. पावसाची नोंद झाली असून, दुपारपर्यंत ५१७ मि.मी.पावसाची नोंद करण्यात आली.

**जमिनीमधील कर्ब वाढवण्यासाठी प्रयत्न | उत्पादन खर्चात बचत करण्यास मदत**

## पदवीधर तरुणाकडून शेतकऱ्यांना वरदान

**| नेरळ | प्रतिनिधी |**

**कर्जत तालुक्यातील कृषी पदवीधर शेतकरी हेमंत कोंडिलकर यांनी शेतकऱ्यांना वरदान ठरेल असे कल्चर विकसित केले आहे. हे कल्चर शेतकऱ्यांच्या शेत जमिनीमधील कर्ब वाढवण्यासाठी उपयुक्त ठरणारे आहे. त्याचा वापर करून आपली आर्थिक स्थिती सुधारून शेती मधील उत्पादन खर्चात बचत करण्यास शेतकऱ्यांना मोठी मदत होऊ शकते.**



सध्या खताच्या वाढलेल्या किंमती, बियाण्यांमधील भेसळ आणि प्रामुख्याने मजुरांची भेडसावणारी समस्या, तसेच मजुरीचे वाढते दर ही भीषण समस्या शेतकऱ्यांसमोर उभी राहिली आहे. त्याशिवाय ग्लोबल वॉर्मिगमुळे निसर्गाच्या बदलत्या वातावरणामुळे शेतकरी दिवसेंदिवस संकटात सापडत आहे. तसेच, रासायनिक खते व किटकनाशकांच्या अधिक वापर केल्याने शेत जमिनीचा सेंद्रिय कर्ब देखील कमी झाले आहे. यावर कर्जत तालुक्यातील बार्डी गावातील कृषी पदवीधर तरुण हेमंत कोंडिलकर यांनी गेल्या सहा वर्षांपासुन शेतीमध्ये अनेक विविध प्रकारचे यशस्वी प्रयोग केले आहेत. त्यात त्यांनी आपल्या शेतातील मोकळ्या जागेत कमीत कमी खर्चात तयार होणारी जैविक शेतीसाठी लागणारे मदर कल्चर तयार करण्याचा प्रकल्प साकारला आहे. या मदर कल्चरमुळे शेतपिकाचे उत्पादन खर्चामध्ये बचत होते. तसेच, सध्या बाजारातील खताच्या वाढलेल्या किमतीचा कोणताही परिणाम होत नाही.

हे नवीन तंत्र डॉ. के. चंद्रा यांनी प्रगत केले होते. तसेच, त्यातून शेतकऱ्याला आपल्या शेतीसाठी लागणारी सर्व जैविक खते घरच्या घरी कशी बनवता येतील, असा निष्कर्ष काढला होता. त्यासाठी त्यांनी अनेक वर्षे संशोधन केले. आज डॉ. के. चंद्रा हे हयात नाहीत. मात्र, त्यांनी शेतकऱ्यांना सुचवलेले मदर कल्चरचे तंत्र शेतकऱ्यांना मदतगार व्हावे यासाठी कोंडिलकर यांनी पुन्हा विकसित केले आहे. त्यामुळे शेत जमिनीमधील सेंद्रिय कर्ब वाढवण्यासाठी मदर कल्चर चांगले मदतगार ठरू शकते, असा विश्वास हेमंत कोंडिलकर यांना आहे. तसेच, मागील काही वर्षे कोंडिलकर यांनी जनावरांना होणाऱ्या लॅम्पी आजारावरील तयार केलेले फूड ग्रेड औषध शेतकऱ्यांना मदतगार ठरत आहे. त्याचे चांगले अनुभव इतर तालुक्यातील शेतकरी मिळवत आहेत.

# न्यायाचे स्वागत, पण...

पुण्याजवळील नसरापूर इथे तीन वर्षांच्या मुलीवर बलात्कार करणाऱ्या अधम भीमराव याला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली हे स्वागतार्ह आहे. या ६५ वर्षांच्या इसमाने केलेला गुन्हा इतका घृणास्पद होता की जनतेने तो हाती सापडला तेव्हा त्याला ठेचून मारला नव्हता हेच आश्चर्य वाटावे. अर्थात, तेव्हा तिथल्या गावकऱ्यांनी जो सूज्ञपणा दाखवून त्याला पोलिसांच्या हवाली केले त्याचे चीज आता सरकारने व न्याययंत्रणेने केले असे म्हणायला हवे. एक मे रोजी बलात्काराची घटना घडली. त्यानंतर दोन महिन्यांच्या आत हा निकाल लागला आहे. खुद्द न्यायालयानेही याबाबत काहीसे आश्चर्य व समाधान व्यक्त केले व इतर घटनांमध्ये असे होत नाही याबाबत खेद व्यक्त केला. या झटपट निकालाबद्दल राज्य सरकारने स्वतःची पाठ थोपटून घेतली आहे. पण हे का शक्य झाले व इतर प्रकरणांमध्ये हे का होऊ शकत नाही याचा नीट अभ्यास करायला हवा. पोलिसांनी तपासाचा वेग जो इथे दाखवला तो इतरत्र का दिसत नाही, त्यांचे पुरावे एरवी मातीच्या ढिगाऱ्यासारखे का कोसळून पडतात हेही या निमित्ताने पाहायला हवे. नसरापूर घटनेमध्ये लोकभावना हा मोठा घटक होता. घटना घडल्या दिवसापासून भीमराव हाच आरोपी आहे व त्यानेच कृत्य केले आहे यावर सगळ्यांचा ठाम विश्वास होता. त्याचे कुटुंबिय देखील त्याच्या विरोधात होते. त्याच्या अत्याचारी प्रवृत्तीमुळे त्याची बायको व मुलेही त्याच्यापासून दूर गेली आहेत व त्याला फाशी द्यावी असेच त्यांनीही म्हटले होते. आश्चर्य म्हणजे इतके असूनही भीमरावने स्वतःचा बचाव स्वतः करण्याचा प्रयत्न केला. आपण हे कृत्य केलेच नाही असे त्याचे म्हणणे होते. पण परिस्थितीजन्य पुरावा त्याच्या विरोधात जाणारा होता. शिवाय बलात्कार केल्यावर त्याने ज्या क्रूरपणे मुलीला संपवले तेही भीषण होते. त्यामुळे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार उपलब्ध नसूनही प्रकरण न्यायाच्या दिशेने गेले. पोलिस, न्यायालय, जनता सर्व जण एकाच दिशेने विचार करीत असल्याने हे घडू शकले.

### त्याचा खालचा स्तर

यामध्ये काही कटू गोष्टींचा उल्लेख करायला हवा. भीमरावाची जात, एक फाटका इसम म्हणून गावातले त्याचे कनिष्ठ स्थान हे या प्रकरणात त्याच्या विरोधात गेले. याच जागी एखादा कथित उच्चवर्णीय, जमीनदार किंवा मोठा नोकरदार प्रकारचा इसम असता तर कदाचित गोष्टी इतक्या वेगाने पुढे सरकल्या नसत्या. या प्रकरणाला फाटे फोडण्याचा प्रयत्न झाला असता. आरोपीविरुद्ध थेट पुरावा नसल्याचे भांडवल केले गेले असते. कदाचित न्याययंत्रणाही इतकी निःशंक नसती. मग प्रकरणाच्या तारखा पडल्या असत्या. आणखी पुरावे आणण्याच्या दबावाखाली पोलिसांची केस भरकटली असती. हे सर्व इतर प्रकरणांमध्ये आजवर झालेले आहे. त्यामुळेच आम्ही इथे या शक्यतांचा उल्लेख करीत आहोत. गेल्या वर्षी म्हणजे मे २०२५ मध्ये पुण्याजवळ वैष्णवी हगवणे या २४ वर्षीय मुलीने आत्महत्या केली. हुंड्यापायी छळ व त्यातून आत्महत्या असा हा प्रकार घडल्याचे पुरेसे स्पष्ट झाले. पण त्यातील आरोपी राष्ट्रवादी काँग्रेसशी संबंधित बडी मंडळी होती. त्यामुळे असेल किंवा अन्य कारणाने हे प्रकरण पुढे सरकलेले नाही. सध्या आरोपी मंडळी न्यायालयीन कोठडीत आहेत. आरोपपत्र दाखल होऊन खटला सुरू होण्याची वाट पाहत आहे. त्याच्या निकालाला किती दिवस लागतील हे कोणीच सांगू शकत नाही. याखेरीज महाराष्ट्रभरात अनेक बलात्काराच्या घटना घडतात. त्या प्रकरणांचा निकाल तर सोडाच, पण इतक्या झटपट तपासही होत नाही. अनेकदा पोलिस मंडळी गुन्हे करणाऱ्यांना पाठीशी घालताना दिसतात. उत्तर प्रदेशात उन्नाव बलात्कार प्रकरणातला आरोपी भाजपचा नेता होता. त्याला वाचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले गेले. त्यासाठी मुलीला बदनाम करण्याचेही मार्ग अवलंबले गेले. ती मुलगी स्वतःहूनच नेत्याकडे गेली होती वगैरे सांगण्याचा प्रयत्न झाला. मुलीच्या कुटुंबियांना धमकावण्याचा प्रयत्न झाला. विनेश फोगाट वगैरे ऑलिम्पिक खेळलेल्या महिला कुस्तीपटूंनी तर जंतरमंतरवर धरणे धरून कुस्ती महासंघाचे पदाधिकारी लैंगिक शोषण करीत असल्याचा आरोप केला. पण हे पदाधिकारी भाजपचे नेते व खासदार असल्याने त्याकडे अजिबात लक्ष दिले गेले नाही. मिडियानेही ही बातमी दाबण्याचा प्रयत्न केला. हे प्रकरण वाऱ्यावर विरून गेले.

### बदलापूरची आठवण

महाराष्ट्रात बदलापूरच्या शाळेत घडलेला अत्याचाराचा प्रकार गाजला. त्यावेळी तक्रार करायला आलेल्या मुलीच्या पालकांना दरडावून परत पाठवण्याचा पराक्रम महिला सीनियर पोलिसाने केला होता. शेवटी बदलापूरच्या लोकांना एक दिवस रेल रोको करावे लागले. तेव्हा कुठे सरकारला जाग आली. तरीही या शाळेच्या पदाधिकाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न झाला. आपटे नावाचे हे इसम भाजपशी संबंधित होते. बराच काळ त्यांना फरार राहू दिले गेले. मग नाइलाजाने ते पोलिसांकडे हजर झाले. त्यांनी व पोलिसांनी मिळून हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला हे त्यावरच्या बातम्यांमधून दिसत होते. पण त्या महिला सीनियर पोलिसाची केवळ बदली झाली. तिच्यावर अन्य कोणतीही कारवाई झाली नाही. आणि आपटे संचालकाला तर अलिकडे बदलापूर पालिकेत स्वीकृत सदस्यत्व देण्याचा प्रयत्न झाला. त्यावरून ओरडा झाल्याने तो प्रकार टळला. बदलापूरचा प्रकार घडला तेव्हा निवडणुका जवळ होत्या. त्यामुळे संबंधित आरोपी पोलिस चकमकीत मारला गेला असे दाखवले गेले. देवाभाऊ आणि एकनाथ शिंदे यांच्या अभिनंदनाची पोस्टर्स लागली. वास्तविक बलात्कार प्रकरणातील आरोपी मारला जाणे यात कौतुक करण्यासारखे काही नाही. दुसरे म्हणजे नंतर ही चकमक बनावट होती असे सरकारच्याच तपासात उघड झाले. त्याबद्दल देवाभाऊ आणि एकनाथ शिंदे यांनी माफी वगैरे मागितली नाही. बदलापूर प्रकरणातील आरोपी हादेखील गरीब वर्गातला व आगापिछा नसणारा होता. त्यामुळे पोलिस चकमकीत त्याला मारणे सहज शक्य झाले. पण बदलापूरच्या शाळेच्या संचालकांना वाचवण्यासाठी मात्र वरच्या स्तरावरून प्रयत्न झाले व ते शेवटी यशस्वीही ठरले. आज तो आपटे सुखात आयुष्य जगत आहे. ज्या मुलीवर अत्याचार झाला व जिच्या पालकांना पुढे येऊन तक्रार करण्याचे धाडस दाखवले तिला सरकार व समाजाने शून्य मदत केली. तिच्या शिक्षणाचा सर्व खर्च सरकार करील असे तेव्हा शिंदे सरकारातले मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले होते. प्रत्यक्षात परवा परवापर्यंत याबाबतचा सरकारी आदेशच निघालेला नव्हता. याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर लाजेकाजेस्तव सरकारने पुन्हा तसा निर्णय जाहीर केला. पण त्याची पूर्तता होईल याची कोणीही खात्री देऊ शकत नाही. सारांश, नसरापूर प्रकरणातील आरोपीला फाशी झाली हे स्वागतार्हच आहे. पण म्हणून आपले सरकार व पोलिस यंत्रणा सुधारली असे काही घडलेले नाही. नसरापूर घटनेमुळे लोकांमध्ये प्रचंड संताप होता. पुण्यातही नवले पुलावरील वाहतूक रोखण्याचा प्रयत्न झाला होता. भाजपच्या मतदारांमध्येही चीड निर्माण झाली होती. त्यांना शांत करण्यासाठी सरकारने झटपट फाशी घडवून आणली आहे असे कोणाला वाटल्यास ते गैर नाही. नसरापूरचा वेगाने मिळालेला न्याय हा अपवाद आहे व तो तसाच राहील अशीच शक्यता आहे.

---

**| विचार**

# विश्वासार्हता पणाला

***पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांड प्रकरणी निकाल देताना 'सीबीआय' विशेष न्यायालयाने संशयाचा फायदा देत आठ आरोपींची निर्दोष मुक्तता केली. न्यायालयाने हा निकाल देताना 'सीबीआय'च्या तपास पद्धतीवर अत्यंत कठोर शब्दांमध्ये ताशेरे ओढले. न्यायालयाने नमूद केलेल्या त्रुटी केवळ एका खटल्यापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर देशातील सर्वोच्च तपास यंत्रणेच्या विश्वासार्हतेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करतात.***



**शिवाजी कराळे**

'सीबीआय'सारख्या संस्थेची विश्वासार्हता संपुष्टात येणे किंवा तिचे 'पिंजऱ्यातील पोपटा'त रूपांतर होणे, ही केवळ एका संस्थेची घसरण नाही, तर भारतीय लोकशाहीच्या आणि न्यायव्यवस्थेच्या भविष्यासाठी एक अत्यंत धोक्याची घंटा आहे. लोकशाहीचा कणा हा देशातील संस्थांच्या स्वायत्ततेवर आणि निष्पक्षतेवर टिकून असतो. जनतेचा देशातील सर्वोच्च तपास यंत्रणेवरूनच विश्वास उडाला, तर लोक न्यायासाठी कोणाकडे पाहतील? राज्या-राज्यांमधील सरकारे 'सीबीआय'ला आपल्या राज्यात तपास करण्याची दिलेली सर्वसाधारण संमती काढून घेतात, तेव्हा ते केवळ संघराज्यात्मक रचनेचे उल्लंघन नसते, तर 'सीबीआय'च्या निष्पक्षतेवर राज्यांनी व्यक्त केलेला तीव्र अविश्वास असतो. आज अनेक राज्यांमध्ये 'सीबीआय'ला पाऊल ठेवण्यासाठी स्थानिक न्यायालयाची किंवा राज्य सरकारची परवानगी घ्यावी लागते, कारण केंद्र सरकार 'सीबीआय'च्या माध्यमातून आपल्यावर राजकीय सूड उगवेल, अशी भीती या राज्यांना असते. देशांतर्गत शांतता आणि सुरक्षेच्या दृष्टीने ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. आता प्रश्न असा निर्माण होतो, की या दलदलीतून 'सीबीआय'ला बाहेर काढणे शक्य आहे का? आणि शक्य असेल तर त्यासाठी काय करावे लागेल? सर्वात पहिली आणि महत्त्वाची गरज म्हणजे 'सीबीआय'ला राजकीय नियंत्रणातून पूर्णपणे मुक्त करणे. 'सीबीआय' केंद्र सरकारच्या कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाच्या (डीओपीटी) अंतर्गत काम करेल आणि आर्थिक-प्रशासकीय गरजांसाठी सरकारवर अवलंबून राहील, तोपर्यंत कधीही स्वतंत्रपणे काम करू शकणार नाही.

'सीबीआय'ला निवडणूक आयोग किंवा नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) यांच्या धर्तीवर एक पूर्णपणे स्वायत्त आणि संवैधानिक संस्था बनवले पाहिजे. त्यासाठी संसदेत एक विशेष कायदा संमत केला जाणे आवश्यक आहे. 'सीबीआय'च्या प्रमुखांची नियुक्ती आणि कार्यकाळ हा कोणत्याही राजकीय प्रभावापासून मुक्त असणाऱ्या एका उच्चस्तरीय आणि निष्पक्ष समितीद्वारे निश्चित केला गेला पाहिजे. त्यात सत्ताधाऱ्यांसोबतच विरोधी पक्षनेते आणि सरन्यायाधीशांची भूमिका निर्णायक असावी. यासोबतच 'सीबीआय'च्या अंतर्गत कार्यपद्धतीतही आमूलाग्र सुधारणा करण्याची गरज आहे. तपासातील त्रुटी दूर करण्यासाठी अधिकाऱ्यांना आधुनिक न्यायवैद्यक विज्ञान, सायबर सुरक्षा आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक गुन्ह्यांच्या तपासाचे प्रगत प्रशिक्षण दिले पाहिजे. प्रत्येक अयशस्वी खटल्याचे अंतर्गत ऑडिट झाले पाहिजे आणि पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांड खटल्यासारख्या प्रकरणात ज्या अधिकाऱ्यांच्या ढिसाळपणामुळे किंवा त्रुटींमुळे तपास भरकटला आणि खटला न्यायालयात टिकू शकला नाही, त्यांच्यावर कठोर दंडात्मक कारवाई झाली पाहिजे. अधिकाऱ्यांचे उत्तरदायित्व निश्चित केले जात नाही, तोपर्यंत न्यायालयांच्या ताशेऱ्यांचा त्यांच्यावर काहीही परिणाम होणार नाही.

महाराष्ट्राच्या राजकारणाला दोन दशकांहून अधिक काळ अस्वस्थ ठेवणाऱ्या पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांड प्रकरणाचा निकाल 'सीबीआय' विशेष न्यायालयाने दिल्यानंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. या निकालात पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व आठ आरोपींची संशयाचा फायदा देत निर्दोष मुक्तता करण्यात आली. न्यायालयाने हा निकाल देताना केवळ आरोपींना निर्दोष मुक्त केले नाही, तर तपास यंत्रणांच्या विशेषतः सीबीआयच्या तपास पद्धतीवर अत्यंत कठोर शब्दांमध्ये ताशेरे ओढले. न्यायालयाने नमूद केलेल्या त्रुटी इतक्या मूलभूत आहेत, की त्या केवळ एका खटल्यापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर देशातील सर्वोच्च तपास यंत्रणेच्या विश्वासार्हतेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करतात. 'सीबीआय' म्हणजे देशातील सर्वात विश्वासार्ह तपास यंत्रणा, अशी सर्वसामान्यांची धारणा आहे. राज्य पोलिसांवर राजकीय दबावाचा संशय निर्माण झाला, की विरोधक, सामाजिक संस्था, पीडित कुटुंबे आणि अनेकदा न्यायालयेसुद्धा तपास 'सीबीआय'कडे सोपवण्याचा आग्रह धरतात. कारण 'सीबीआय'कडे अधिक प्रशिक्षित अधिकारी, व्यापक अधिकार आणि निष्पक्ष तपासाची अपेक्षा असते; पण गेल्या काही वर्षांमध्ये अनेक गाजलेल्या प्रकरणांमध्ये न्यायालयांनी 'सीबीआय'च्या तपासातील त्रुटींवर वारंवार बोट ठेवले आहे. प्रश्न असा आहे, की देशातील सर्वोच्च तपास यंत्रणेकडूनच अशा चुका होत असतील, तर नागरिकांनी न्यायव्यवस्थेवर विश्वास कसा ठेवायचा?

पवनराजे निंबाळकर हत्याकांडातील न्यायालयीन निरीक्षणे धक्कादायक आहेत. मोबाईल फोन जप्त न करणे, कॉल डिटेल रेकॉर्ड न मिळवणे, माफीच्या साक्षीदाराच्या कथनातील गंभीर विसंगतींची पडताळणी न करणे, महत्त्वाच्या दाव्यांची चौकशी न करणे, मूळ कागदपत्रांचा उगम शोधण्याची तसदी न घेणे आणि कथित बेकायदेशीर कोठडीसारख्या बाबींकडे दुर्लक्ष करणे या चुका साध्यासुध्या नाहीत. या त्रुटींमुळे न्यायालयाने संपूर्ण तपासच संशयाच्या भोवऱ्यात असल्याचे नमूद केले. परिणामी, आरोपी दोषी आहेत की नाहीत, हा प्रश्न मागे पडला आणि तपास विश्वसनीय आहे की नाही, हा प्रश्न पुढे आला. फौजदारी न्यायव्यवस्थेचे एक मूलभूत तत्त्व आहे, 'शंभर दोषी सुटले तरी चालतील; पण एका निरपराध व्यक्तीला शिक्षा होता कामा नये.' त्यामुळे संशयाचा फायदा हा आरोपीचा कायदेशीर अधिकार आहे. न्यायालयाने तोच मान्य केला. त्यामुळे या निकालावर टीका करण्यापेक्षा तपासात उणिवा का राहिल्या, याचा शोध घेणे अधिक महत्त्वाचे आहे. याच संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने २०१३ मध्ये केलेले निरीक्षण पुन्हा आठवते. कोळसा वाटप प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने 'सीबीआय'ला 'सरकारच्या पिंजऱ्यातील पोपट' अशी उपमा दिली होती. या एका वाक्याने देशातील तपास यंत्रणांच्या स्वायत्ततेपुढे मोठा प्रश्नचिन्ह उभे केले होते. न्यायालयाचा आशय स्पष्ट होता, 'सीबीआय'ने सत्ताधाऱ्यांच्या इच्छेनुसार नव्हे, तर कायद्याच्या चौकटीत राहून स्वतंत्रपणे काम केले पाहिजे. दुर्दैवाने, हे निरीक्षण आजही तितकेच लागू पडते, असे अनेक प्रसंग पहायला मिळतात.

राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या प्रत्येक प्रकरणात 'सीबीआय'वर पक्षपातीपणाचे आरोप होतात. सत्तेत असलेले पक्ष 'सीबीआय'वर विश्वास दाखवतात; विरोधक त्याच यंत्रणेवर सूडबुद्धीने कारवाई केल्याचा आरोप करतात. सत्ता बदलली, की आरोपांची दिशाही बदलते; मात्र 'सीबीआय'वरील संशय कायम राहतो. ही परिस्थिती कोणत्याही लोकशाहीसाठी धोकादायक आहे. याहून गंभीर बाब म्हणजे न्यायालये वेळोवेळी 'सीबीआय'च्या तपासावर कठोर टीका करतात; पण त्या टीकेचे संस्थात्मक परिणाम फारसे दिसत नाहीत. न्यायालयाने एखाद्या तपासातील गंभीर त्रुटी निदर्शनास आणल्या, तरी संबंधित अधिकाऱ्यांवर किती वेळा शिस्तभंगाची कारवाई होते? दोषपूर्ण तपासाची जबाबदारी निश्चित केली जाते का? तपासाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी कोणती सुधारणा अमलात आणली जाते? या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे क्वचितच मिळतात. 'सीबीआय'च्या तपासातील त्रुटींचे परिणाम केवळ एका खटल्यापुरते मर्यादित नसतात. दोषी सुटण्याची शक्यता वाढते, निरपराध व्यक्तींवर संशयाची सावली वर्षानुवर्षे राहते, पीडित कुटुंबांचा न्यायावरील विश्वास ढासळतो. न्याय मिळाला नाही, अशी भावना निर्माण होणे हे न्याय न मिळण्याइतकेच धोकादायक असते. आज तंत्रज्ञानाच्या युगात तपासासाठी अत्याधुनिक साधने उपलब्ध आहेत. मोबाईल लोकेशन, कॉल डिटेल्स, सीसीटीव्ही फुटेज, डिजिटल पुरावे, फॉरेन्सिक विश्लेषण आणि इलेक्ट्रॉनिक डेटा यामुळे तपास अधिक वैज्ञानिक झाला आहे.

या पार्श्वभूमीवर आजच्या काळात मूलभूत पुरावेच गोळा न होणे किंवा त्यांची साखळी नीट राखली न जाणे अधिक चिंताजनक ठरते. यासाठी केवळ अधिकाऱ्यांवर टीका करून भागणार नाही. 'सीबीआय'ची रचना, तिचे प्रशासकीय नियंत्रण आणि कामकाजाची पद्धत याचा व्यापक पुनर्विचार करण्याची गरज आहे. तपास अधिकाऱ्यांना निश्चित कार्यकाळ, राजकीय हस्तक्षेपापासून संरक्षण, आधुनिक फॉरेन्सिक प्रशिक्षण, स्वतंत्र उत्तरदायित्व यंत्रणा आणि दोषपूर्ण तपासासाठी वैयक्तिक जबाबदारी निश्चित करणे या सुधारणा अत्यावश्यक आहेत. 'सीबीआय' ही भारताची अस्मिता आणि देशातील न्यायव्यवस्थेचा एक अत्यंत महत्त्वाचा स्तंभ आहे. तिला 'पिंजऱ्यातील पोपट' म्हणून राहू देणे देशाच्या हिताचे नाही. 'सीबीआय'च्या अधिकाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे, की त्यांची निष्ठा कोणत्याही तात्पुरत्या राजकीय सत्तेशी नसून भारताच्या संविधानाशी आणि कायद्याच्या राज्याशी आहे. केवळ संविधानाला उत्तरदायी राहून, कोणत्याही भीतीशिवाय आणि पक्षपातीपणाशिवाय 'सीबीआय' काम करू लागेल, तेव्हाच तिची हरवलेली विश्वासार्हता पुन्हा प्रस्थापित होईल. अन्यथा, ही संस्था केवळ राजकीय सुडाचे एक साधन ठरेल.

---

**| चर्चा आजची**

# बलात्काऱ्यांना फाशीच हवी!


**राकेश लोहार**

नरसापूर येथील निष्पाप बालिकेवरील बलात्कार आणि निर्घृण हत्येने केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण देशाचे अंतःकरण हेलावून टाकले. एका चिमुकलीच्या आयुष्याचा निर्दयी अंत करणाऱ्या या अमानुष कृत्याने प्रत्येक आई-वडिलांच्या मनात भीती निर्माण केली आणि प्रत्येक संवेदनशील नागरिकाच्या मनात संतापाची ज्वाला पेटवली. संतापाची भावना पेटून उठली. अशा घटना घडतात तेव्हा प्रश्न फक्त एका कुटुंबाचा राहात नाही; संपूर्ण समाज स्वतःला असुरक्षित समजू लागतो. समाजाचे मनोबल वाढवण्यासाठी गुन्हेगारीची कीड वेळीच ठेचणे गरजेचे होते. आणि, ते काम नरसापूर प्रकरणात न्याय व्यवस्था आणि पोलीस यंत्रणेने केले. आणि, म्हणून आज आरोपीला फासावर चढवण्याचा निकाल देण्यात आला.

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात आणि देशभरात अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचार, बलात्कार आणि हत्यांच्या अनेक हृदयद्रावक घटना घडल्या आहेत. कोपर्डी बलात्कार आणि हत्या प्रकरण, दिल्ली निर्भया सामूहिक बलात्कार प्रकरण, हैदराबाद पशुवैद्यकीय डॉक्टर बलात्कार आणि हत्या प्रकरण यांसारख्या घटनांनी देशाच्या विवेकाला हादरा दिला. प्रत्येक वेळी लाखो लोक रस्त्यावर उतरले, मेणबत्त्या पेटल्या, मोर्चे निघाले, कठोर शिक्षेच्या घोषणा झाल्या आणि महिलांच्या सुरक्षेवर मोठमोठ्या चर्चा झाल्या. पण, काही दिवसांनी सर्व काही पूर्ववत झाले आणि पुन्हा एखादी निष्पाप मुलगी विकृत मानसिकतेची बळी ठरली.

प्रश्न असा आहे की, अशा घटना पुन्हा पुन्हा का घडतात? कायद्याची भीती कमी झाली आहे का? समाजातील नैतिक मूल्यांचा ऱ्हास झाला आहे का? की गुन्हेगारांना वाटते की वर्षानुवर्षे खटले चालतील आणि शिक्षा टळेल? हे प्रश्न प्रत्येक जबाबदार नागरिकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.

नरसापूर प्रकरणात पोलीस यंत्रणेने वेळेत तपास करून वैज्ञानिक पुरावे गोळा केले, आरोपीविरुद्ध भक्कम पुरावे न्यायालयात सादर केले आणि न्यायालयाने दोष सिद्ध झाल्यानंतर कठोर शिक्षा सुनावली असेल, तर ही संपूर्ण न्यायप्रक्रियेची मोठी ताकद आहे. अशा प्रकरणांत तपासातील प्रत्येक पुरावा, प्रत्येक साक्ष आणि प्रत्येक कायदेशीर प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असते. म्हणूनच पोलीस अधिकारी, तपास यंत्रणा, सरकारी वकील आणि न्यायव्यवस्था यांचे कौतुक केले पाहिजे. त्यांच्या कार्यक्षमतेमुळेच पीडित कुटुंबाला न्याय मिळू शकतो आणि समाजाचा कायद्यावरील विश्वास टिकून राहतो.



कायद्याची खरी ताकद ही शिक्षेच्या कठोरतेइतकीच तिच्या निश्चिततेत आणि वेळेवर अंमलबजावणीत असते. गुन्हा करणाऱ्याला हे स्पष्टपणे जाणवले पाहिजे की, पुराव्यांच्या आधारे दोष सिद्ध झाल्यास कठोर शिक्षा अटळ आहे. अशा संदेशामुळेच गुन्हेगारांच्या मनात कायद्याची भीती निर्माण होण्यास मदत होते. महिला सुरक्षित असतील तरच समाज सुरक्षित राहील. मुलींच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या सन्मानाचे रक्षण करणे ही प्रत्येक कुटुंबाची, शाळेची, समाजाची आणि शासनाची सामूहिक जबाबदारी आहे. मुलांना लहानपणापासून स्त्रीचा आदर, संवेदनशीलता आणि कायद्याचा सन्मान शिकवला गेला पाहिजे. फक्त कठोर कायदे करून चालणार नाही; त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि सामाजिक परिवर्तनही आवश्यक आहे. आज समाजाची अपेक्षा स्पष्ट आहे अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये निष्पक्ष, वेगवान आणि पुराव्यावर आधारित तपास व्हावा, न्यायालयीन प्रक्रिया शक्य तितक्या लवकर पूर्ण व्हावी आणि दोष सिद्ध झाल्यानंतर कायद्यानुसार कठोर शिक्षा व्हावी. तेव्हाच पीडित कुटुंबाला न्याय मिळाल्याची भावना निर्माण होईल आणि कायद्यावरील लोकांचा विश्वास अधिक दृढ होईल.

आज प्रत्येक आई-वडिलांच्या मनात एकच प्रश्न आहे; तो म्हणजे, आपली मुलगी खरंच सुरक्षित आहे का? हा प्रश्न केवळ सरकारला विचारण्याचा नाही; तो संपूर्ण समाजाने स्वतःला विचारण्याचा आहे. शेजारी, शिक्षक, पालक, सामाजिक संस्था, पोलीस, न्यायव्यवस्था आणि शासन यांनी पुढाकार घेऊन सर्वांनी मिळून महिलांसाठी आणि बालिकांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. नरसापूर प्रकरणातील न्याय हा एका गुन्ह्याचा शेवट नसून, समाजाला दिलेला एक स्पष्ट संदेश आहे. महिलांवरील आणि बालिकांवरील अत्याचार कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत. दोष सिद्ध झाल्यानंतर कायद्याच्या चौकटीत राहून कठोर शिक्षा दिली जाईल आणि न्यायव्यवस्था अशा गुन्ह्यांविरुद्ध ठाम उभी राहील.

महिलेचा सन्मान हा संस्कृतीचा पाया आहे. लहान मुलींचे रक्षण ही सभ्य समाजाची ओळख आहे. आणि कायद्याचा धाक हा सुरक्षित समाजाचा सर्वात मोठा आधार आहे. अशा प्रत्येक प्रकरणातून आपण केवळ संताप व्यक्त न करता, न्याय, सुरक्षितता आणि सामाजिक जबाबदारी यांची भक्कम बाजू उभी केली, तरच अशा घटना कमी करण्याच्या दिशेने आपण खऱ्या अर्थाने पुढे जाऊ शकू. बलात्काऱ्यांना यापुढेसुद्धा फाशीचीच शिक्षा व्हायला हवी, तर नराधमांची विकृती ठेचली जाईल.

---

**लोकसंसद**

## पावसाळी पर्यटन करताना काळजी घ्यायलाच हवी !

मार्च महिन्यापासूनच सुरु झालेला तीव्र उन्हाळा कधी एकदा संपून वर्षाऋतू सुरु होतोय याची प्रतीक्षा सर्वांनाच होती. यापूर्वी कधीही न अनुभवलेला उकाडा यंदा अनेकांनी सहन केला. त्यामुळे पावसाळा लवकरात लवकर सुरु व्हावा अशी सर्वांचीच अगदी मनापासून इच्छा होती. मात्र यंदा पावसाळा लवकर येण्याऐवजी पावसाने आपले येणे १५ दिवसातून अधिक काळ लांबवले. परिणामी मृग नक्षत्र कोरडेच गेले. यंदाचा जीवघेणा उकाडा सहन केल्यानंतर मिळालेल्या पावसाच्या गारव्याने राज्यातील सामान्य माणूस मात्र सुखावला आहे. वर्षाऋतूच्या आगमनाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी तरुणवर्ग दरवर्षी पावसाच्या आरंभी पावसाळी सहलीचे आयोजन करत असतो. राज्यातील अशी काही पर्यटनस्थळे आहेत ज्या ठिकाणी पावसाळ्यात आनंद लुटण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक येतात. धबधबे, नद्या, तळी किंवा समुद्रकिनारे लाभलेली ही स्थळे पावसाळ्यात ओसंडून वाहू लागतात. ही ठिकाणे जशी पर्यटकांना मनमुराद आनंद देतात तशीच याठिकाणी योग्य ती काळजी न घेतल्यास ती पर्यटकांचा जीव घेण्यासही कारणीभूत ठरू ठरतात. अशा पावसाळी पर्यटनस्थळांच्या ठिकाणी दरवर्षी कुठेनाकुठे अपघात होऊन पर्यटक पाण्यात बुडाल्याच्या किंवा वाहून गेल्याच्या बातम्या वाचनात येतात. पाण्याच्या ठिकाणी उत्साहाच्या भरात पर्यटक स्वतःला झोकून देतात. बऱ्याचदा पाण्याच्या खोलीचा आणि वेगाचा अंदाज न आल्यामुळे अपघात घडतात. तर काही अतिउत्साही तरुण तरुणी सेल्फीच्या नादात अपघातांना बळी पडतात. मद्यपान करून पाण्यात उतरल्याने पट्टीचे पोहणारे सुद्धा पाण्याच्या वेगासमोर असमर्थ ठरतात. पाण्याच्या ठिकाणी जिथे पर्यटकांची ये जा असते अशा ठिकाणी जीवन रक्षकांची सुद्धा व्यवस्था असते; मात्र पावसाळ्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या पुष्कळ असल्यामुळे हे जीवन रक्षक त्या तुलनेत खूपच कमी पडतात. मौजमजेसाठी पाण्यात डुंबायला अवश्य जावे; मात्र ही मौज आपल्या जीवावर उलटणार नाही याची काळजी पर्यटकांनीच घेणे आवश्यक आहे. पाण्याच्या वेगाशी आणि खोलीशी उगाचच स्पर्धा करू नये, आपल्यासोबतच्या नातेवाईकांना आणि मित्रमैत्रिणींनाही याविषयी सक्त ताकीद द्यावी. लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी. मद्यपान करून पाण्यात मुळीच जाऊ नये. आपण सहलीसाठी जातो तेव्हा घरी आपली कुणीतरी वाट पाहत असते. आपण केलेली मौजमजा त्यांना ऐकून अनुभवायची असते. अशा आपल्या जिव्हाळ्याच्या व्यक्तीला धक्का बसणारी बातमी मिळणार नाही याची काळजी घेणे आपले कर्तव्यच नव्हे का ?

**- जगन घाणेकर, घाटकोपर**

---

**| दिनविशेष**

# इडा पिडा टळो आणि बळीचे राज्य येवो

१ जुलै हा हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा जन्मदिन. त्यांच्या जन्मदिनानिमित्त १ जुलै हा दिवस संपूर्ण राज्यात कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षीही तो कृषी दीन म्हणून संपूर्ण राज्यात उत्साहात साजरा केला गेला. स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्यामुळेच देशात हरितक्रांती होऊ शकली. स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या याच योगदानाची आठवण म्हणून महाराष्ट्र सरकारने १ जुलै हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला.राज्यभर हा दिवस वेगवेगळ्या उपक्रमांनी साजरा केला गेला. शेती ही फार पुरातन काळापासून चालत आली आहे. शेती हाच आपला मुख्य व्यवसाय आहे. देशातील सत्तर टक्के लोक शेतीच करतात. राज्यात शिवाजी महाराजांच्या काळात शेतकऱ्याला खूप महत्वाचे स्थान होते. दिवाळीच्या सणाला प्रत्येक घरात शेतकऱ्यांसाठी प्रार्थना केली जायची. ईडा पीडा टळो आणि बळीचे राज्य येवो असा आवाज घराघरांतून ऐकू यायचा. हा आवाज आता कुठे तरी लुप्त होऊ लागला आहे. अनेक सामस्यांनी ग्रासलेल्या शेती आणि शेतकऱ्यांसाठीचा हा आवाज पुन्हा कसा घुमेल यासाठी आजच्या कृषीदिनापासूनच प्रयत्न करायला हवेत. आज शेतीची आणि शेतकऱ्यांची अवस्था दयनीय आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांनी बळीराजा पिचला आहे. शेतकरी हा शब्द बोलायला जेवढा सोप्पा आहे तेवढा सोप्पा नाही. शेती करताना अचानक येणाऱ्या संकटांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. त्यात बेमोसमी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, गारपीट, बाजारपेठेतील बाजारभावात होणारी घसरण, शेतीसाठी सावकाराकडून किंवा बँक, पतसंस्था इत्यादींकडून घेतलेले कर्ज परतफेडीची मुदत, निर्यातीत होणारे शासकीय बदल या व अशा सर्व संकटाला शेतकरी सामोरे जात असतो. हवामानात अचानक होणाऱ्या बदलांमुळे शेतीतील पिकांचे नुकसान होते. हजारो-लाखो रुपये खर्च करून शेतकरी आपला शेतीमाल तयार करतो. त्याची काळजी घेतो. पण त्याला त्याच्या कष्टाचे फळ मिळतेच असे नाही. कधी आस्मानी तर कधी सुलतानी संकटांनी बळीराजाचा हातचा घास हिरावला जातो. शासन दरबारीही त्याची दखल घेतली जात नाही. कर्जाच्या बोझ्याखाली अडकून बळीराजा आत्महत्या करतो. महाराष्ट्रासारख्या कृषीप्रधान राज्यात सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यांना कोणी वाली नाही अशी भावना शेतकऱ्यांची झाली आहे. हे चित्र बदलायला हवे. पुन्हा एकदा इडा पीडा टळो बळीचे राज्य येवो हा आवाज घराघरातून घुमायला हवा यासाठी आजच्या कृषीदिनापासून प्रयत्न करायला हवेत. आजच्या कृषी दिवसाच्या निमित्ताने तमाम शेतकरी बांधवांना कृषीदिनाच्या शुभेच्छा!

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१ जुलै

१) श्री.वसंत नानू राउळ
मारूती-नाका, अलिबाग,
दि.१-७-१९४२

२)श्री.मााणिकराव तुकारामजी वानखेडे
रोहिदासनगर, अलिबाग
दि.१-७-१९४७

३)श्री.सीताराम मोरेश्वर नाईक
विद्यानगर, अलिबाग
दि.१-७-१९४९

४)श्री.पंढरीनाथ शंकर पाटील
मु.नेहुली, अलिबाग
दि.१-७-१९५१

५)श्रीम.प्रभावती गंगाराम सावंत
अलिबाग, दि.१-७-१९४१

६)श्री.मारोती बकाराम चोपडे
अलिबाग दि.१-७-१९५७

७)श्री.सुधाकर आत्माराम पाटील
मु.वरसोली,अलिबाग
दि.१-७-१९४३

८)श्री.मनोहर गोविंद चितळे
मु.नागाव, अलिबाग
दि.१-७-१९३७

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**कै. कृष्णाजी नारायण पराडकर, स्मरणार्थ अलिबाग**

## ‘सूर्य घर सोलर’ मेळाव्याचे आयोजन

**पोयनाड :** भारतीय स्टेट बँक व ल्युमिनेक्सा सोलर सोल्युशन्स यांच्या वतीने बुधवार (दि.१)जुलै रोजी पेझारी येथील हॉटेल साई वाटिका येथे सकाळी १० ते १२ वा. एसबीआय बँक दिवसाच्या निमित्ताने, सूर्य घर सोलर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या पीएम सूर्य घर: मोफत वीज योजनेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि ग्राहकांना सौर ऊर्जेबाबत मार्गदर्शन करण्यासाठी एसबीआय सूर्य घर सोलर मेळावेफ देशभरातील विविध शाखांमध्ये आयोजित केले जात आहेत. या मेळाव्यात ग्राहकांना सोलर पॅनेल बसवण्याच्या संपूर्ण प्रक्रियेची माहिती आणि सुलभ वित्तपुरवठ्या विषयी मार्गदर्शन केले जाणार आहे. पोयनाड विभागातील नागरिकांना सूर्य ऊर्जेचा स्मार्ट वापर सुरक्षित भविष्याचा आधार या संकल्पने विषयी संपूर्ण माहिती देण्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.त्याच बरोबर या योजनेला स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वतीने आकर्षक कर्ज सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. या मेळाव्यासाठी विश्वसनीय सोलर प्रदात्यांची उपस्थिती असणार आहे.

# लवादाचा निर्णय धोक्याची घंटा?

**●समस्त माथेरानकरांना भोगावा लागणार परिणाम ● ई-टेम्पो सुरु करण्याबाबत चर्चा**



**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरानमध्ये मागील काही दिवसांपासून अश्व-चालक व ई-रिक्षा चालकांच्या एकमेकांविरोधात केलेल्या तक्रारीनंतर आता लवकरच अंतिम सुनावणी होणार असून हा निर्णय झाल्यानंतर समस्त माथेरानकरांना त्याचा परिणाम भोगावा लागणार असून ई-रिक्षाबाबत व अश्व संख्या मर्यादित असणे व येथील अनधिकृत बांधकामांना प्रामुख्याने त्याचा फटका बसणार आहे.

माथेरान नगरपालिकेने एक विशेष सभा घेतली असून राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशावर माथेरान नगरपरिषदेच्या सभेत महत्वपूर्ण निर्णय घेताना. घोड्यांची संख्या कमी करणे, घोड्यांचे मार्ग निश्‍चित करणे व ई टेम्पो सुरु करणे आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते सुनिल शिंदे व केतन रामाणे यांनी दाखल केलेल्या राष्ट्रीय हरित लवादातील याचिकेवर ९ जून रोजी सुनावणी झाली. अश्वपाल संघटना, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व माथेरान नगरपरिषद यांचा युक्तीवाद पूर्ण झाल्यावर राष्ट्रीय हरित लवादाने माथेरान पालिकेस आदेश जारी केले आहेत.

लोणेरे माणगाव येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर तांत्रिक विद्यापीठाच्या तज्ञ् प्राध्यापकांनी घोड्याच्या लिदीचे पावसाळ्या पूर्वी व पावसाळ्या नंतर शास्त्रोक्तरीत्या निरीक्षण केले यामध्ये घोड्याच्या विष्टे मुले पाणी, हवा व माती सर्वच प्रदूषित झाल्याचा अहवाल कोर्टाला सादर केला आहे. सदर अहवालामध्ये सुचविण्यात आलेल्या तात्काळ उपाययोजनाची अंमलबजावणी नगरपरिषद कशा प्रकारे करणार आहे, याचे प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले आहे. २५ जून रोजी नगराध्यक्ष्य चंद्रकांत चौधरी यांनी विशेष सभा आयोजित केली होती. या सभेमध्ये मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी लवादाच्या आदेशाची माहिती दिली. मनोज खेडकर, शिवाजी शिंदे, सीताराम कुंभार, किशोर मोरे, लता ढेबे, सोहेल महापुळे, आदीने विविध उपाययोजना सांगितल्या. अश्वपाल संघटने सोबत चर्चा करण्यात येणार असल्याची माहितीही मिळाली. त्याच प्रमाणे रोजची सात ते आठ टन लीद संकलित करण्यासाठी ई-टेम्पो सारख्या वाहनाची आवश्यकता लागणार आहे.

### पुढील सुनावणी लवकरच

मालवाहतूकेच्या घोड्याना दिल्यास हा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होऊ शकते या पर्यायावर ही चर्चा करण्यात आली. हरित लवदाची पुढील सुनावणी१६ जुलै रोजी आहे माथेरान हे पर्यावरण दृष्टया संवेदनशील क्षेत्र असल्यामुळे या केसला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

## श्रीकांत जाधव, पूजा खेडेकर यांना एमएसएमई स्टार पुरस्कार प्रदान

**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**

नेक्स्टजेन डिजिटलचे संस्थापक श्रीकांत एल. जाधव व अलोरवेदाच्या संस्थापक-भागीदार पूजा त्रियुग खेडेकर यांना प्रतिष्ठेचा एमएसएमई स्टार पुरस्कार २०२६ खा. ज्योती वाघमारे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. उल्लेखनीय व्यावसायिक योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे.




नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन लिमिटेड आणि झेप उद्योगिनी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने बीएसई इंटरनॅशनल कन्व्हेन्शन हॉलमध्ये मंगळवारी (दि. २३) आंतरराष्ट्रीय एसएमई दिनानिमित्त हा समारंभ आयोजित करण्यात आला होता. संपूर्ण जिल्ह्यातून केवळ या दोनच उद्योजकांनी राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारावर आपले नाव कोरले आहे.

जाधव हे नेक्स्टजेन डिजिटल या कल्पक, एआय-पॉवर्ड डिजिटल मार्केटिंग एजन्सीचे संस्थापक आणि डिजिटल स्ट्रॅटेजिस्ट आहेत. त्यांनी एआय-आधारित जाहिरात व्हिडिओ, सोशल मीडिया व्यवस्थापन आणि आधुनिक ब्रँडिंगच्या माध्यमातून ई-कॉमर्स, रिअल इस्टेट व स्टार्टअप्स अशा विविध क्षेत्रांतील व्यवसायांना प्रगतीचे नवे मार्ग दाखवले आहेत.



## उपजिल्हा रुग्णालय विरोधात उपोषण सुरू

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत उपजिल्हा रुग्णालयाच्या मनमानी कारभारा विरुद्ध पोलीस मित्र संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षांनी सुरु करण्यात आलेले उपोषण शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या कार्यक्रमाला वैद्यकीय अधिकारी जाणार असल्याने हे उपोषण सोमवारपर्यंत स्थगित करण्यात आले होते. मात्र, सोमवारपासून रमेश कदम यांनी पुन्हा आपल्या उपोषणाला टिळक चौकात उपोषणाला सुरुवात केली.

पोलीस मित्र संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष कदम यांनी कर्जतच्या लोकमान्य टिळक चौकात कर्जत उपजिल्हा रुग्णालयाच्या मनमानी कारभारा विरुद्ध उपोषण सुरु केले होते. या उपोषणात शिबीरात किती औषधे वापरली त्याची बिले, सर्जरी करण्यात आली त्यांचे नाव पत्ते, बालकांच्या पालकांसाठी आरोग्य शिबिरासाठी वापरण्यात आलेल्या. वाहन मालकांची नावे, बील कोटेशन, वाहनांची सर्व कागदपत्रे, सर्व पेमेंटची बँक स्टेटमेंटसह त्याची चौकशी करण्यात यावे. कमी वजन असणाऱ्या किती बालकांवर उपचार करण्यात आले व कोण कोणते उपचार करण्यात आले त्यांची नावे व पत्त्यासह चौकशी करण्यात यावी. स्तनपान घेण्यास अडचणी येणाऱ्या किती पालकांवर उपचार करण्यात आले. कोणते उपचार करण्यात आले. त्यांची नाव पत्त्या सह चौकशी करण्यात यावी. शाळा तपासणी वाहन टेंडरच्या मालकाचे नाव, कोटेशन, वाहन व ड्रायव्हरची सर्व कागदपत्रे, पेमेंटची चौकशी करण्यात यावी. आरोग्य शिबीराच्या भोजनाचे ५१ हजार रुपये बील जिल्हा शल्य चिकित्सकांकडे मंजूर करण्यासाठी पाठवले आहे. उपजिल्हा रुग्णालयातील औषधे बाहेरील खासगी क्लिनीकमध्ये वैद्यकीय अधिक्षकांनी धाड टाकून पकडली होती. त्याची कोणत्याही कायदेशीर कारवाई केली नाही त्या संदर्भात चौकशी करण्यात यावी. उपचार करण्यास हालगर्जिपणामुळे एका आदिवासी महिलेचा डिलेवरी दरम्यान मृत्यू झाला त्याची चौकशी करण्यात यावी आदी मागण्या त्यांनी केल्या आहेत.

## पेपरफुटीमुळे महाराष्ट्राची देशभर बदनामी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यात नीट, टीईटी अशा महत्त्वाच्या परीक्षांमध्ये वारंवार पेपरफुटीच्या घटना घडत असल्याने राज्याची देशभर बदनामी होत असून लाखो विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्याची टीका करत काँग्रेसच्या विजय वडेट्टीवार यांनी सरकारला चांगलेच धारेवर धरले. मात्र सरकार समाधान कारक उत्तर देऊ शकले नाही त्यामुळे विरोधकांनी सभात्याग केला. विधान सभेचे कामकाज सुरू झाल्यावर विरोधकांनी स्थगन मांडण्याची विनंती केली. त्यावेळी ते म्हणाले की, लाखो परीक्षार्थी वर्षानुवर्षे मेहनत घेऊन परीक्षेची तयारी करतात. मात्र, पेपरफुटीच्या घटनांमुळे त्यांच्या कष्टांवर पाणी फिरत आहे. परीक्षा पारदर्शक पद्धतीने घेण्यात सरकार वारंवार अपयशी का ठरत आहे, याचे उत्तर सरकारने महाराष्ट्राला द्यावे. अशी भूमिका वडेट्टीवार यांनी मांडली.

टीईटी परीक्षा पेपरफुटी प्रकरणातील धागेदोरे, पेपर तयार करणाऱ्या संस्था, संबंधित कंपन्या आणि या प्रकरणामागील संपूर्ण साखळीची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. तीन आरोपींना अटक झाली असली तरी त्यांचे दुसऱ्या राज्यांशी असलेले संबंधही समोर येत आहेत. त्यामुळे या संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

## कळंबोलीत वटपौर्णिमा उत्साहात साजरी

**कळंबोली :** वटपौर्णिमा हा सण महिलांनी मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा केला. कळंबोलीच्या विविध सेक्टर मधील वडाच्या झाडांजवळ सकाळपासूनच सुवासिनी महिलांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. महिलांनी पारंपरिक दागिने परिधान करून वडाच्या वृक्षाची विधिवत पूजा केली. वडाच्या झाडाला दोरा गुंडाळून पतीच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना करण्यात आली. यावेळी महिलांनी एकमेकींना वटपौर्णिमेच्या शुभेच्छा देत सणाचा आनंद लुटला. विविध सोसायट्या, मंदिर परिसर आणि सार्वजनिक ठिकाणी धार्मिक वातावरण निर्माण झाले होते.

## विमानतळाबाहेर टॅक्सीचालकाची दादागिरी

**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।**



मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाबाहेर प्रवाशांना धमकावत मनमानी पद्धतीने जादा भाडे उकळणाऱ्या टॅक्सीचालकावर सहार पोलिसांनी कठोर कारवाई करत त्याला अटक केली आहे. विमानतळ परिसरात प्रवाशांची फसवणूक आणि दादागिरी करणाऱ्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेदरम्यान ही कारवाई करण्यात आली. या घटनेमुळे विमानतळाबाहेरील काही बेशिस्त टॅक्सीचालकांच्या कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि.२५ जून रोजी वारीस अली सयुद्दीन शेख (४९) हा टॅक्सीचालक मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाबाहेर प्रवाशांच्या शोधात उभा होता. त्यावेळी साध्या वेशातील पोलीस अधिकारी आणि कर्मचारी प्रवाशांच्या भूमिकेत त्याच्याकडे गेले. बोरीवलीपर्यंत जाण्यासाठी चालकाने सुरुवातीला ५५० रुपये भाडे निश्‍चित केले. त्यानंतर प्रवाशांना टॅक्सीत बसवून प्रवास सुरू झाला. मात्र, काही अंतर पार केल्यानंतर चालकाचा सूर अचानक बदलला. ठरलेल्या भाड्याऐवजी त्याने थेट ८०० रुपयांची मागणी केली. प्रवाशांनी वाढीव भाड्याबाबत विचारणा करत विरोध दर्शविल्यावर चालकाने आक्रमक भूमिका घेत त्यांना धमकावण्यास सुरुवात केली. ‘जेवढे सांगतो, तेवढे पैसे द्यावे लागतील’, अशा स्वरूपाची दादागिरी करत त्याने प्रवाशांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. चालकाची दादागिरी सुरू असतानाच साध्या वेशातील पोलिसांनी आपली ओळख उघड केली आणि त्याला तात्काळ ताब्यात घेतले. या प्रकारामुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली आहे. त्याच्याविरोधात सहार पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, त्याची टॅक्सी जप्त करण्यात आली आहे. याशिवाय संबंधित चालकाचा परवाना निलंबित करण्याची प्रक्रियादेखील राबविण्यात आली आहे.

### सहारा पोलिसांकडून कठोर कारवाई

## महावितरणचे तक्रार निवारण शिबीर

**कल्याण :** महावितरणच्या उल्हासनगर-२ विभागाच्या वतीने वीज ग्राहकांसाठी तक्रार निवारण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ५० वीज ग्राहकांनी हजेरी लावली. वीज देयकासोबतच खराब वीज वाहिन्या, नादुरुस्त मीटर आदी बाबत वीज ग्राहकांनी केलेल्या तक्रारींचे निराकरण करण्यात आले. उल्हासनगर उपविभाग क्रमांक ४ आणि ५ येथील ग्राहक यावेळी उपस्थित होते. यावेळी उपस्थित वीज ग्राहकांना स्मार्ट मीटर संदर्भात माहिती देण्यात आली. तसेच त्यांच्या मनातील शंका निरसन करण्यात आली.

**ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी यशोगाथा | आयआयटी प्रवेशसाठी पात्रता संपादन**

# युगंधर गांगणचे जेईई मेनमध्ये यश

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही जागतिक दर्जाची क्षमता दडलेली असते, याची प्रचिती पुन्हा एकदा निजामपूर येथील युगंधर शशिकांत गांगण याने आपल्या उल्लेखनीय यशा-तून दिली आहे. मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या सामान्य कुटुंबातील या विद्यार्थ्याने राष्ट्रीय स्तरावरील अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या जेईई ॲडव्हान्सड परीक्षेत यश मिळवत भारतीय तंत्रज्ञान संस्थांमध्ये आयआयटी प्रवेशासाठी पात्रता संपादन केली आहे. या अभिमानास्पद यशाबद्दल निजामपूर विभाग शिक्षण प्रसारक मंडळाने विशेष अभिनंदनाचा ठराव एक मताने मंजूर करून युगंधरचा हृदय सत्कार केला. युगंधरच्या या यशामागे त्याचे वडील शशिकांत गांगण, आई गीता गांगण, शिक्षकवृंद तसेच विद्यालयाचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



निजामपूर विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या सभागृहात सोमवारी (दि.२९) जून रोजी संस्थेचे अध्यक्ष दत्तू पवार यांच्या अध्यक्षते खाली पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. यावेळी अध्यक्ष पवार यांच्या हस्ते युगंधर गांगण याचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्याचे यश प्रेरणादायी असल्याचे मत संस्थेचे अध्यक्ष पवार यांनी व्यक्त करीत कठोर परिश्रम, आत्मविश्वास मिळाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये यशस्वी होऊ शकतात, हे युगंधरने आपल्या कर्तृत्वातून दाखवून दिल्याचे गौरवोद्गार काढले. सत्कार सोहळ्याला हमजा अ. जालगांवकर, दत्ताराम नाडकर, सुधीर पवार, दिगंबर जोशी, संदीप मोदी, रहिमत परदेशी, नितीन बडे, रसिक मेथा, गणेश पवार, हुकुमचंद जोशी, संपदा महाळुंगे, हुकुमचंद जोशी, संपदा महाळुंगे, गणेश नाडकर, रविकांत अडविलकर, महेंद्र नाडकर, रमेश नाडकर, अशोक नाडकर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडक

## प्राजक्ताची अमेरिकन सैन्यात भरारी

**दापोली :** रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्याच्या प्राजक्ता (सारा) भांबुरे-बोंगाळे यांनी अमेरिकन सैन्यात भरती होऊन ऐतिहासिक कामगिरी केली आहे. अमेरिकन सैन्यात दाखल होणाऱ्या त्या पहिल्या मराठी महिला ठरल्या आहेत. या यशामुळे दापोली, कोकणसह संपूर्ण महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. अमेरिकन लष्कराचे अत्यंत कठोर प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करत जिद्द, मेहनत कर्तृत्वाची जागतिक स्तरावर छाप उमटवली आहे. लहानपणापासूनच शिस्तबद्ध जीवन आणि सैन्यदलाविषयी आकर्षण असलेल्या प्राजक्ता यांनी सैनिक होण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. त्या स्वप्नाच्या पूर्ततेसाठी त्यांनी सातत्याने शारीरिक तंदुरुस्ती, शैक्षणिक प्रगती आणि कठोर प्रशिक्षणावर भर दिला. अनेक आव्हानांचा सामना करत त्यांनी अमेरिकन सैन्याच्या निवड प्रक्रियेत यश मिळवले आणि त्यानंतरचे कठीण प्रशिक्षणही यशस्वीरीत्या पूर्ण केले. सध्या प्राजक्ता अमेरिकन सैन्याच्या मेडिकल विभागात कार्यरत आहेत. प्रशिक्षणादरम्यान त्यांनी उत्कृष्ट नेमबाजीचे कौशल्य सिद्ध करत प्रतिष्ठेचे मार्क्समन शिप पदक पटकावले. प्राजक्ताचा प्रवास केवळ सैन्य क्षेत्रापुरता मर्यादित राहिलेला नाही. त्यांनी यापूर्वी मॉडेलिंग क्षेत्रातही छाप सोडली आहे. त्यांच्या या अभूतपूर्व यशामुळे युवक-युवतींना मोठी प्रेरणा मिळाली असून, आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठी युवाशक्तीचा ठसा उमटविणाऱ्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## रविंद्र पारखे यांनी पदभार स्वीकारला

**नागोठणे :** जिल्ह्यातील मध्यवर्ती आणि महत्वाचे पोलीस ठाणे असलेल्या नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून सहाय्यक पोलिस निरीक्षक रविंद्र पारखे यांनी पदभार स्वीकारला. यावेळी नागोठणे पोलीस ठाण्यातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागोठणे पोलीस ठाण्याचे याआधीचे प्रभारी अधिकारी, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांची अलिबाग येथील पोलीस मुख्यालयात बदली झाल्याने याआधी म्हसळा पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले सपोनि पारखे यांनी नागोठणे पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारल्याने नागोठण्यातील प्रमुख पत्रकार संघटना असलेल्या नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी सपोनि पारखे यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. याचबरोबर नागोठणे शहरातील मान्यवरांनी व विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक पारखे त्यांना नागोठणे पोलीस ठाण्यातील त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, सहाय्यक पोलीस निरीक्षक पारखे यांच्या कारकिर्दीत नागोठणे शहर व परिसरात कायदा सुव्यवस्था राखण्यात मदत होईल अशी अपेक्षा नागोठण्यातील नागरिकांतून व्यक्त करण्यात येत आहे.





## बेणसेत भक्तीचा सुंदर संगम

**नागोठणे :** बेणसे गावातील हिंदू संमेलनात नागोठण्यातील कुंभार आळी येथील प्रफुल्ल नागोठणेकर यांनी विनोद आणि भक्तीचा सुंदर संगम साधला. त्यांनी हनुमान मंदिराच्या समोर बसून हनुमंताचे गीत गाण्याची विनोदी कोटी केली. जर हनुमंताचे गीत घेतले नाही तर हनुमानजी पाठीत गदा घालतील! या लाडिक विनोदावर प्रेक्षकांनी चांगलीच दाद दिली. त्यानंतर लगेचच वातावरण भक्तीभावाने भारून गेले आणि प्रफुल्ल यांनी सुरू केलेले अंजलीच्या सुता तुला रामच वरदानं या सुरेल स्वरांनी परिसर गुंजू लागले. हे गीत सुरू असतानाच, त्याच क्षणी काही बालक मंदिरासमोर येऊन नाचू लागले. त्यांच्या निरागस हालचालींमध्ये जणू बाल हनुमानच अवतरले आहेत असा भास झाला. प्रेक्षक विस्मयाने भारावून गेले. प्रफुल्ल बुवांच्या गीताने आणि बालकांच्या नृत्याने साक्षात हनुमान भक्तीचं जिवंत दर्शन घडविले गेल्याने उपस्थितांनी गाण्याला भरभरून दाद दिली.



## स्मृतिप्रीत्यर्थ स्मशानभूमीवर वृक्षारोपण

**खांब :** रोहा तालुक्यातील तळवलीतर्फे अष्टमी या गावचे सरपंच रविंद्र मरवडे व युवा सामाजिक कार्यकर्ते योगेश मरवडे यांच्या मातोश्री सुनीता रामचंद्र मरवडे यांच्या निधनानंतर त्यांच्या अस्थीच्या राखेचे विसर्जन न करता ती राख रोपांवर अर्पण करून वृक्षारोपण करण्याचा संकल्प करण्यात आला होता. या संकल्पानुसार वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न करण्यात आला. सुनीता आई यांनी त्यांच्या आयुष्यात मानवतेची, सेवाभावाची आणि निसर्गप्रेमाची जोपासना केली होती. त्यांच्या याच विचारांचा वारसा जपत परिवाराने पर्यावरणपूरक निर्णय घेत समाजासमोर एक वेगळा आदर्श निर्माण केला.फ्माणूस जरी जगातून निघून गेला, तरी त्याच्या स्मृती वृक्षांच्या रूपाने कायम जिवंत राहाव्यात, या उदात्त भावनेतून हा संकल्प साकारण्यात आला. या वृक्षांमुळे पर्यावरण संवर्धनास हातभार लागणार असून, पुढील पिढ्यांनाही निसर्गप्रेमाचा मौल्यवान संदेश मिळणार आहे. आजच्या काळात पर्यावरणाचे संतुलन राखणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. अशा वेळी सुनीता यांच्या परिवाराने घेतलेला हा निर्णय केवळ कौतुकास्पद नसून समाजासाठी प्रेरणादायी आणि अनुकरणीय ठरत आहे. दुःखालाही समाजहिताचे रूप देत त्यांनी निसर्गसंवर्धनाचा संदेश दिला आहे. त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून मनःपूर्वक स्वागत आणि अभिनंदन होत आहे.

## महाविद्यालयात योगासनांची प्रात्यक्षिके

**म्हसळा :** कोकण उन्नती मित्र मंडळ संचलित बॅरिस्टर ए.आर. अंतुले संस्थापित वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय तसेच विज्ञान महाविद्यालयात आयोजित योग कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी प्राचार्य टेकळे यांनी महर्षी पतंजली यांनी जगाला दिलेल्या योगविद्येचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध योगप्रात्यक्षिकांमध्ये सहभाग नोंदविला. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातर्फे आयोजित कार्यक्रमात प्रा.रायप्पा माशाळे यांनी योगाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी ताडासन, वृक्षासन, पश्चिमोत्तानासन, वक्रासन, गोमुखासन, वज्रासन, हलासन, सर्वांगासन, शीर्षासन आदी विविध योगासनांची प्रात्यक्षिके करून आरोग्यदायी फायदे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

# ताजी मच्छी खाणाऱ्या खवय्यांचा हिरमोड

## यंत्रचलित नौकांना १५ ऑगस्टपर्यंत बंदी; माशांना प्रजननासाठी पुरेसा कालावधी

**। पाली । प्रतिनिधी ।**

मासे खाणाऱ्या खवय्यांसाठी एक निराशाजनक तर, निसर्ग आणि मच्छीमारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. राज्यातील पावसाळी मासेमारी बंदीच्या कालावधीत राज्य शासनाने मोठी वाढ केली असून, आता ही बंदी १५ ऑगस्टपर्यंत लागू राहणार आहे. राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी विधानसभेत एका निवेदनाद्वारे ही महत्त्वपूर्ण घोषणा केली.



या निर्णयामुळे बाजारात ताजी मासळी येण्यासाठी खवय्यांना आता आणखी १५ दिवस वाट पाहावी लागणार आहे. यापूर्वी राज्याच्या सागरी हद्दीत १ जून ते ३१ जुलै या ६१ दिवसांच्या कालावधीत यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौकांना बंदी घालण्यात येत होती. मात्र, आता त्यात बदल करून हा कालावधी १५ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात आला आहे. विविध मच्छीमार सहकारी संस्थांकडून ही बंदी वाढवण्याची सातत्याने मागणी होत होती. यावर जिल्हा समिती आणि राज्य सल्लागार समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासनाने हा निर्णय घेतला आहे.

माशांना प्रजननासाठी पुरेसा वेळ मिळावा आणि भविष्यातील पिढ्यांसाठी मत्स्यसंपदा सुरक्षित राहावी.लहान माशांचे संरक्षण: मासेमारी हंगामाच्या सुरुवातीलाच जाळ्यांमध्ये अडकणाऱ्या लहान माशांची (पिल्लांची) शिकार रोखणे. जीवित आणि वित्तहानी टाळणे: पावसाळ्याच्या सुरुवातीला येणारे वादळी वारे, चक्रीवादळे, अवकाळी पाऊस आणि खराब हवामानामुळे समुद्रात मच्छीमारांच्या जिवावर बेतू नये यासाठी सुरक्षेचा उपाय. राज्यात मासेमारीवर बंदी असताना अनेकदा परराज्यातील नौका महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर येऊन घुसखोरी करतात. यावर शासनाने कडक भूमिका घेतली आहे. बंदीच्या काळात इतर राज्यांतील कोणत्याही मासेमारी नौकांनी महाराष्ट्राच्या जलधी क्षेत्रात येऊन अनधिकृत मासेमारी केल्यास, त्यांच्याविरुद्ध मत्स्य विभागाकडून अतिशय कठोर कारवाई करण्यात येईल, असा सज्जड दमही मंत्री नितेश राणे यांनी दिला आहे.

परिणामी, पावसाळी मासेमारी बंदी १५ ऑगस्ट पर्यंत करण्याचा जोर सर्व पारंपारिक मच्छीमारांनी धरला आहे. ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या दोन आठवड्यात वादळी वारे मोठ्या प्रमाणात होत असतात ज्यामुळे समुद्र खवळलेला असतो. त्यामुळे मच्छिमारांची जीवितहानी तसेच नौकांचे नुकसान होण्याची शक्यता बळावते. म्हणूनच पावसाळी मासेमारी बंदी कालावधी १५ ऑगस्ट पर्यंत करण्याची मागणी उपस्थित मच्छिमारांकडून करण्यात आली.

> वाढीव बंदीमुळे मत्स्यसाठ्याचे जतन व संवर्धन होण्यास मोठी मदत होईल, तसेच मच्छीमारांची सुरक्षाही अबाधित राहील.
>
> **–नितेश राणे,**
> मत्स्यव्यवसाय मंत्री,
> महाराष्ट्र राज्य.

शासनाच्या या निर्णयामुळे समुद्राच्या पर्यावरणाला नक्कीच फायदा होईल, मात्र, ताज्या मासळीची आतुरतेने वाट पाहणाऱ्या खवय्यांचा सध्या तरी हिरमोड झाला आहे.

---

# अलिबाग ज्येष्ठ नागरिक संस्थेची सभा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग ज्येष्ठ नागरिक संस्थेची त्रैमासिक सभा रविवारी (दि.२८) रोजी जनरल अरुण कुमार वैद्य हायस्कूलच्या सभागृहात दुपारी २-३० वाजता आयोजित करण्याचा आली होती. यावेळी अलिबागमधील सनदी लेखापाल संजय राऊत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी सध्या व्यवहारांमध्ये फसवणुकीचे प्रकार वाढले असून सायबर गुन्ह्यांची प्रकरणे ही वाढत असून त्यासाठी जेष्ठांनी आपल्या मोबाईलचा वापर करताना कसे सावध राहावे याबाबत मार्गदर्शन केले.



यावेळी संस्थेच्या ज्या सभासदांनी आपल्या वयाची ९० वर्षे ८० वर्षे व ७५ वर्षे पूर्ण केली आहेत, अशा सभासदांचे अभिष्टचिंतन करण्याचा आले.

त्यात विजयकुमार शिंदे, अनंत पाटील, सखाराम पाटील, दत्ताराम म्हात्रे, सुनीता सुतार व सुषमा सोमण यांचा संस्थेतर्फे सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष प्रफुल्ल राऊत, उपाध्यक्ष चारुशीला कोरडे, सचिव नंदू तळकर, सहसचिव मेघना कुलकर्णी व कार्यकारणी सदस्य आरके घरत, पुरुषोत्तम साठे, दिलीप शिंदे, राजाराम भगत, हेमंत राऊत, के. डी. पाटील, सुरेखा कोलते, विजया म्हात्रे, प्रतिभा पाठक, मिलिंद सुळे, तसेच सर्वश्री द्वा वा. नाईक, शरद कोरडे, कुसुम पाटील, शुभांगी आंब्रे हे सदस्य उपस्थित होते.

# शैक्षणिक साहित्य वाटप

**खांब** : युवा आधार संघटनेने पुन्हा एकदा सामाजिक बांधिलकीची प्रचीती दिली. संघटनेचे कार्याध्यक्ष चेतन गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप घट कांबळे वसतीगृह रोहा मोहल्ला येथे करण्यात आले. यावेळी अहमद दर्जी, महेंद्र गुजर, पुर्वा मोहिते, जितेंद्र गायकवाड, सौरभ चव्हाण, संतोष खेरटकर, उस्मान मोरबेकर, विलास कांबळे, विश्वनाथ जाधव, महेश तुपकर, यश फुलारे, संदेश गायकवाड, चेतन गायकवाड, सुमित आगळे, किशोर कान्हेकर, प्रफुल्ल कांबळे,महेंद्र थिटे, निलेश शेडगे, कोमल गायकवाड, अदिती वाटवे, अमित पेणकर, अभिषेक सानप आदी उपस्थित होते.

# केरळमधून चोरीस गेलेली दुचाकी हस्तगत

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहर वाहतूक शाखेच्या सतर्कतेमुळे केरळ राज्यातून चोरीस गेलेली दुचाकी हस्तगत करण्यात यश आले आहे. पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भा. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवार, दि. २९ जून २०२६ रोजी पोलीस हवालदार ६४ महेंद्रसिंग राजपूत व पोलीस नाईक २६९५ काळे हे नवीन पनवेल परिसरात क्रेन व्हॅनद्वारे गस्त घालत होते. त्यावेळी पनवेल रेल्वे स्थानकाच्या पूर्व बाजूस नो पार्किंगमध्ये उभी असलेली केएल ६१ ई ४६२४ क्रमांकाची मोटारसायकल आढळून आली.

चौकशीदरम्यान संबंधित मोटारसायकल केरळ राज्यातील त्रिशूर पोलीस ठाणे हद्दीतून चोरीस गेल्याचे समोर आले. (दि.१३) जून रोजी या चोरीप्रकरणी गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर त्रिशूर पोलीस ठाण्याशी संपर्क साधून संपूर्ण माहिती देण्यात आली. संबंधित वाहन नियमानुसार ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी आवश्यक प्रक्रिया सुरू करण्यात आली. पनवेल शहर वाहतूक शाखेच्या सतर्कतेमुळे आंतरराज्य चोरीस गेलेली दुचाकी शोधण्यात यश आल्याने नागरिकांकडून या कार्यवाहीचे कौतुक करण्यात येत आहे.

---



# रामजी घरत यांची जयंती साजरी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यामधील आवास येथील कुलाबा जिल्हा लोकल बोर्डाचे पहिले उपाध्यक्ष, तपस्वी रामजी लक्ष्मण घरत यांची १७१ वी जयंती पाठारे क्षत्रिय अष्टागर समाज झिराड या संस्थेचे माजी अध्यक्ष श्रीरंग घरत यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन साजरी करण्यांत आली.

तसेच अलिबागमध्ये सार्वजनिक वाचनालयासमोर या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या प्रसंगी नागेश कुलकर्णी, चारुलता कोरडे, द्वारकानाथ नाईक, आर. के. घरत, नंदू तळकर, मोहन पाटील, विकास पाटील, नवीनचंद्र राऊत, रजिता माळवी, बळवंत वालेकर, हेमंत राऊत, हरिचंद्र सानकर, अरुण राऊत, प्रा. पंकज घरत, हेमकांत सोनार, प्रणिता वर्तक आदींची उपस्थिती होती.

# अंकुरलेल्या पिकांना पावसाचा दिलासा

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

शेतकऱ्यांनी पावसाच्या आगमनानंतर खरीप हंगामातील पेरणीला सुरुवात केली असून, शेतात पेरलेल्या बियाण्यांना चांगला अंकुर फुटला आहे. मात्र, दोन दिवसांपूर्वी बरसलेला पाऊस अचानक थांबल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले होते. अंकुरलेल्या पिकांना पुढील वाढीसाठी पावसाची अत्यंत गरज असताना पाऊस गायब झाल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली होती.



दरम्यान, पुन्हा एकदा पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या पावसामुळे शेतातील पिकांना नवसंजीवनी मिळण्याची आशा निर्माण झाली असून, शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.

सध्या पिकांच्या वाढीसाठी नियमित आणि समाधानकारक पावसाची आवश्यकता आहे. पाऊस अधूनमधून पडून पुन्हा खंड पडत असल्याने शेतकरी मोठ्या संकटाचा सामना करत आहेत.

यामुळे यंदा पावसाने सातत्याने आणि जोरदार बरसून खरीप हंगामाला बळ द्यावे, तसेच शेतकऱ्यांच्या कष्टाचे चीज व्हावे, अशी प्रार्थना बळीराजा वरुणराजाकडे करत आहे.

तालुक्यात औद्योगिक कारणांचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरले असले तरी सुद्धा, शेतकरी मोठया प्रमाणात शेती करीत आहे. गुरांसाठी वैरण तसेच धान्याची कमतरता पडू नये यासाठी आजही तालुक्यातील शेतकरी शेती करण्याकडे भर देत आहे.

---

# दुर्मिळ फळां-फुलांनी वेधले भाविकांचे लक्ष

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलमधील प्राचीन खान्देश्वर मंदिराबाहेरील कॅननबॉल अर्थात नागलिंगम वृक्ष सध्या बहरला आहे. त्यावरील आकर्षक फुले आणि गोलाकार फळांनी भाविकांसह निसर्गप्रेमींचे लक्ष वेधून घेतले आहे. मंदिरात दर्शनासाठी येणारे अनेक भाविक या दुर्मिळ वृक्षाचे दर्शन घेत असून त्याच्यासोबत छायाचित्रे काढण्याचा आनंद घेत आहेत.

नागलिंगम वृक्षाचे शास्त्रीय नाव Couroupita guianensis असून तो मूळचा दक्षिण अमेरिकेतील उष्णकटिबंधीय प्रदेशातील आहे. भारतात हा वृक्ष मुख्यतः मंदिर परिसर, उद्याने आणि वनस्पती उद्यानांमध्ये आढळतो. त्याची सर्वात



मोठी वैशिष्ट्ये म्हणजे त्याची फुले आणि फळे थेट खोडावर येतात. वनस्पतीशास्त्रात या वैशिष्ट्याला कॉलिफ्लोरी असे म्हटले जाते.

या वृक्षाची फुले गुलाबी, केशरी आणि पिवळ्या रंगांची असून त्यातून मोहक सुगंध दरवळतो. फुलाच्या मध्यभागी असलेली रचना शिवलिंग आणि नागफण्यासारखी दिसत असल्याने भारतीय संस्कृतीत या वृक्षाला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे शिवमंदिरांच्या परिसरात हा वृक्ष आवर्जून लावला जातो.

कॅननबॉल ट्री हे नाव या वृक्षाच्या फळांवरून पडले आहे. फळे आकाराने मोठी, गोलाकार आणि तपकिरी रंगाची असून ती जुन्या काळातील तोफेच्या गोळ्यांसारखी दिसतात. प्रत्येक फळाचे वजन काही किलोपर्यंत असू शकते. पिकल्यावर ही फळे जमिनीवर पडतात आणि त्यातील गराला तीव्र वास येतो.

वनस्पती तज्ज्ञांच्या मते, नागलिंगम वृक्ष पर्यावरणीय दृष्ट्याही महत्त्वाचा आहे. त्याची फुले मधमाश्या आणि विविध परागीभवन करणाऱ्या कीटकांना आकर्षित करतात. तसेच काही पारंपरिक औषधी पद्धतींमध्ये या वृक्षाची पाने, फुले आणि साल यांचा वापर केला जातो. संशोधनामध्ये या वृक्षामध्ये जंतुनाशक आणि दाहशामक गुणधर्म असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

खान्देश्वर मंदिर परिसरातील हा बहरलेला नागलिंगम वृक्ष धार्मिक श्रद्धा, जैवविविधता आणि निसर्गसौंदर्य यांचा सुंदर संगम घडवून आणत आहे. मंदिर परिसरात येणाऱ्या भाविकांना हा दुर्मिळ वृक्ष निसर्गाच्या अद्भुत किमयेची अनुभूती देत आहे.

# खांदा वसाहत सेक्टर ६-परिसरात अवजड वाहनांचे पार्किंग

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

पनवेलमधील खांदा वसाहत सेक्टर ६ परिसरात पुन्हा एकदा रस्त्याच्या दुतर्फा अवजड वाहने पार्क करून ठेवली जात असल्याने वाहतुकीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. या रस्त्यालगत शाळा असल्याने विद्यार्थ्यांना तसेच पालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंना ट्रक, कंटेनर आणि इतर अवजड वाहने उभी राहत असल्यामुळे रस्त्याची रुंदी कमी झाली आहे. परिणामी शाळेत येणाऱ्या-जाणाऱ्या विद्यार्थ्यांना वाहनांच्या गर्दीतून मार्ग काढावा लागत आहे. शाळा सुटण्याच्या आणि सुरू होण्याच्या वेळेत वाहतूक कोंडीही वारंवार होत आहे. स्थानिक रहिवाशांनी यापूर्वीही या समस्येकडे संबंधित प्रशासन आणि वाहतूक विभागाचे लक्ष वेधले होते. काही काळ कारवाई झाल्यानंतर पुन्हा अवजड वाहनांचे बेकायदा पार्किंग सुरू झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

या परिसरात कायमस्वरूपी उपाययोजना करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

---

**जोरदार सरींमुळे नागरिकांची तारांबळ** **प्रवाशांची बसमध्ये चढ-उतार करताना कसरत**

# सायन-पनवेल महामार्ग जलमय

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

अनेक दिवसांच्या उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना अखेर दिलासा मिळाला असून, सोमवारी रात्रीपासून पावसाने दमदार हजेरी लावली. मुसळधार पावसामुळे सायन-पनवेल महामार्गावरील अनेक ठिकाणी पाणी साचल्याचे चित्र पाहायला मिळाले. विशेषतः बस थांब्यांसमोर पाणी साचल्याने प्रवाशांना बसमध्ये चढ-उतार करताना तसेच वाहने पकडण्यासाठी मोठी कसरत करावी लागली. रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे वाहनांच्या वेगावरही परिणाम झाला आणि काही ठिकाणी वाहतूक संथ गतीने सुरू होती. पावसाच्या जोरदार सरींमुळे नागरिकांची तारांबळ उडाली, तर उष्म्याने त्रस्त झालेल्यांना मात्र या पावसाने मोठा दिलासा मिळाला. हवामान खात्याने पुढील काही दिवसही जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केल्याने नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.



**हवामान विभागाचा इशारा**

मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे. या भागांमध्ये ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मुसळधार पावसाचा जोर कायम राहिल्यास येत्या काळात आणखी अडचणी निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

विशेषतः नवी मुंबईतील अनेक भागांमध्ये पाणी साचल्याने वाहतुकीवर गंभीर परिणाम झाला असून सायन-पनवेल महामार्गावरील परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. जुईनगर रेल्वे स्थानकाजवळ मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.

सायन-पनवेल महामार्गावर पाणी साचल्यामुळे वाहतूक संथ झाली. त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण झाली. या कोंडीचा फटका दैनंदिन प्रवाशांसह रुग्णवाहिकेलाही बसला असून अत्यावश्यक सेवांनाही अडथळ्यांचा सामना करावा लागला.

या पावसामुळे कार्यालयीन वेळेत मोठ्या प्रमाणात प्रवाशांची गैरसोय झाली. रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहने अत्यंत संथ गतीने पुढे सरकत होती. अनेक कार्यालयीन कर्मचारी वाहतूक कोंडीत अडकून पडल्याने त्यांच्या प्रवासात मोठा विलंब झाला. सलग दुसऱ्या आठवड्यात लाखो प्रवाशांना उशिरा धावणाऱ्या रेल्वे सेवेमुळे अडचणींचा सामना करावा लागला.

---

# निवडक



## लायन्स इंटरनॅशनलच्या अधिवेशनासाठी प्रस्थान

**अलिबाग** : लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३१ -४ चे नवनिर्वाचित प्रांतपाल प्रवीण सरनाईक, प्रथम महिला डिस्ट्रिक्ट ऑबझीलरी श्रुती सरनाईक तसेच डिस्ट्रिक्टमधील एकूण २०४ लायन्स सदस्य लायन्स इंटरनॅशनलच्या १०८ व्या आंतरराष्ट्रीय अधिवेशनासाठी हाँगकाँगला रवाना होत आहेत. या अधिवेशनात अलिबाग व जिल्ह्यातील तब्बल ७० सदस्य सहभागी होणार आहे. जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब मानली जात आहे. ३ ते ७ जुलै या कालावधीत हाँगकाँग येथे होणाऱ्या या जागतिक अधिवेशनात २०० हून अधिक देशांतील लायन्स प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. तसेच जगभरातील ७५० हून अधिक डिस्ट्रिक्ट गव्हर्नर्स, भारतातील ८५ डिस्ट्रिक्टचे प्रांतपाल आणि ३,००० पेक्षा अधिक भारतीय लायन्स सदस्य या अधिवेशनाला उपस्थित राहणार आहेत. सेवा, नेतृत्व, सदस्यवाढ, सामाजिक उपक्रम या विषयांवर चर्चा होणार आहे. अधिवेशनादरम्यान सरनाईक यांच्या नेतृत्वाखाली डिस्ट्रिक्ट ३२३१ -४ चे प्रतिनिधी विविध आंतरराष्ट्रीय बैठका, प्रशिक्षण सत्रे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे, २०१३ नंतर प्रथमच अलिबाग व जिल्ह्याला लायन्स इंटरनॅशनलच्या डिस्ट्रिक्ट गव्हर्नरपदाचा मान मिळाला आहे. या पार्श्वभूमीवर संपूर्ण अलिबाग व जिल्ह्यातील लायन्स सदस्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर जिल्ह्याचे प्रभावी प्रतिनिधित्व करण्यासाठी सर्व सदस्य रवाना झाले आहेत.

## श्रीवर्धन शहरात विजेचा खेळ खंडोबा

**श्रीवर्धन** : शहरासह संपूर्ण तालुक्यामध्ये विजेचा खेळ खंडोबा सुरू असून, वारंवार वीजपुरवठा खंडित करण्यात येत आहे. महावितरणने पावसाळ्यापूर्वी अनेक वेळा संपूर्ण दिवसभर वीज पुरवठा बंद ठेवून देखभाल व दुरुस्तीची कामे केली होती. परंतु, एवढ्या मोठ्या प्रमाणावर देखभाल व दुरुस्तीची कामे करून सुद्धा पावसाळा सुरू झाल्यानंतर दरवर्षीप्रमाणे महावितरणच्या विजेचा खेळ खंडोबा सुरू झाल्याचे पाहायला मिळत आहे. शहरामध्ये सतत कोणत्या ना कोणत्या




भागामध्ये वीज वाहकतारा तुटणे, कंडक्टर तुटणे यासारखे प्रकार घडत आहेत. दोन दिवसापूर्वी चौकर पाखाडी येथून दांडे परिसराकडे जाणाऱ्या भूमिगत उच्च दाबाच्या विजवाहिन्या जळाल्यामुळे त्या ठिकाणचा वीज पुरवठा जवळजवळ दीड दिवस खंडित होता. वारंवार खंडित होत असलेला वीज पुरवठा त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. महावितरणाकडून बिले वसुली करण्यासाठी धडक मोहीम राबविली जाते. आता नवीन स्मार्ट मीटर बसल्यामुळे वीज बिल भरणा वेळेवर न केल्यास वीज पुरवठा आपोआप बंद होतो. मात्र, वसुलीसाठी एवढे सगळे पर्याय महावितरणकडे उपलब्ध असताना ग्राहकांना मात्र सुरळीत वीज पुरवठा का पुरविला जात नाही? हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## स्मार्ट मीटरचा फटका थेट बँकेलाच

**उरण** : स्मार्ट मीटरच्या अंमलबजावणीबाबत राज्यभरात चर्चा सुरू असतानाच उरणमधील राष्ट्रीयीकृत बँक ऑफ बडोदा शाखेला त्याचा फटका बसल्याचा धक्कादायक प्रकार सोमवारी समोर आला. वीजपुरवठा खंडित झाल्याने बँकेचे दिवसभर सर्व व्यवहार ठप्प राहिले आणि शेकडो ग्राहकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले. सलग तीन दिवसांच्या सुट्टीनंतर बँक सुरू झाल्याने सकाळपासूनच ग्राहकांनी व्यवहारासाठी मोठी गर्दी केली होती. मात्र, बँकेत वीज नसल्याने संगणकीय प्रणाली पूर्णपणे बंद पडली. रोकड व्यवहार, धनादेश, पासबुक अपडेट, पैसे जमा-उचल आणि इतर सर्व सेवा ठप्प झाल्याने ग्राहकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागली. याबाबत बँकेच्या कर्मचाऱ्यांकडे विचारणा केली असता, तपासणीदरम्यान बँकेला अदानीचा स्मार्ट मीटर बसविण्यात आल्याचे निदर्शनास आले. विशेष म्हणजे, मीटर बसविण्याबाबत बँकेला कोणतीही पूर्वसूचना देण्यात आली नसल्याचा दावा कर्मचाऱ्यांनी केला. तसेच एक वीजबिल थकीत असल्यामुळे वीजपुरवठा खंडित करण्यात आल्याचेही समोर आले. ही बाब लक्षात येताच बँक व्यवस्थापकांनी तातडीने पिरकोन येथील शाखेत जाऊन थकीत वीजबिल भरून वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी धावपळ केली. अत्यावश्यक सेवांनाही अशा प्रकारे फटका बसत असेल, तर सामान्य ग्राहकांचे काय, असा सवाल उपस्थित होत असून, दिवसभर मनस्ताप सहन करावा लागलेल्या ग्राहकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

## पनवेल बाजारात रानभाज्यांचे आगमन

**खांदा कॉलनी** : पावसाळ्याची चाहूल लागताच पनवेल तालुक्यातील बाजारपेठांमध्ये विविध रानभाज्यांचे आगमन सुरू झाले आहे. शेवळ, पेठारी, भोकर, करांदे, हलगुंड, कोळी यांसारख्या



पारंपरिक रानभाज्या विक्रीसाठी बाजारात दाखल झाल्या असून त्यांना नागरिकांकडून चांगली मागणी आहे. मात्र यंदा कधी ऊन तर कधी मुसळधार पाऊस अशा बदलत्या हवामानाचा परिणाम रानभाज्यांच्या उपलब्धतेवर झाला आहे. त्यामुळे बाजारात आवक कमी असून दरही गेल्या वर्षांच्या तुलनेत वाढले आहेत. महागाईमुळे अनेक ग्राहकांना इच्छेनुसार रानभाज्यांची खरेदी करता येत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. रानभाज्या आरोग्यासाठी पोषक आणि औषधी गुणधर्मांनी युक्त असल्याने पावसाळ्यात त्यांची विशेष मागणी असते.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **ऑफिस स्टाफ आवश्यक,** Tanna Consultancy शॉप नं. १ शारदा CHS. महावीर चौक, बेल्जियन वॅफल समोर,अलिबाग, जि. रायगड ऑफिस स्टाफची आवश्यकता. संपर्क : ९९२३७५०५४९, ९१५०७१७०३८
- **प्रशस्त ३००० चौरस फूट खुला** हॉल ऑफिशिअल कामासाठी भाडेतत्त्वावर देणे आहे. गरजूनी संपर्क करावा. संपर्क – ९२२६३७९८४४ / ९८२३९२७२८८
- **किहीम बिच येथे जागा विकणे आहे.** संपर्क : ९४०३५६१४८१, ८१४९२४९९४७
- **वॉन्टेड :-** अलिबागमधील दवाखान्यामध्ये वृद्ध महिलेला सकाळी दहा ते बारा वाजेपर्यंत काळजीवाहू सेविका भेटा किंवा पगाराचे अपेक्षासह लिहा. सुधाकर रानवडे, अन्नपूर्णावाडी, हरिष बेकरीजवळ चेंढरे.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
| RGD/016/2026-2028
१९३७-२०२६ वर्ष ९०
www.krushival.in
बुधवार, दि. १ जुलै, २०२६


# ‘आधार केंद्र आपल्या दारी’

**तळा :** रायगड डाक विभाग अधिक्षक अलिबाग यांच्या संकल्पनेतून तळा शहरात ‘आधार केंद्र आपल्या दारी’ उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन शहरातील मेकडे सभागृहात करण्यात आले होते. या उपक्रमामध्ये तळा सब पोस्ट ऑफिस अंतर्गत सर्व शाखा डाक घरातील कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्षात सहभाग घेऊन आलेल्या नागरिकांना पोस्ट खात्याच्या विविध सेवा व उपक्रमाबद्दल माहिती दिली. तसेच, रुपये एक लक्षचे लाडकी बहीण योजनेच्या रक्कमेचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचा ४६ नागरिकांनी लाभ घेतला. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी माणगाव उप विभागीय डाक निरीक्षक गोविंद कदम व सब पोस्ट मास्तर केशव मनवल यांसह ऑपरेटर रवि राठोड, विनोद कोंडे तसेच तळा एस.ओ.अंतर्गत असलेल्या कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे अबीटघर व तळवली, तालुका-मुरुड, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या जमीन मिळकती, जमिनीचे विद्यमान मालक यांस कडुन कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार रु.पै. | विद्यमान मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| अबीटघर | १६ | १-२२-०० पो.ख.०-२५-०० एकूण ०-१४७-०० | ०.६९ | आमीना अहमद घारे अमीर अहमद घारे |
| अबीटघर | १७/१ | ०-८६-०० पो.ख.०-३१-०० एकूण १-१७-०० | ०.६९ | आमीना अहमद घारे अमीर अहमद घारे |
| अबीटघर | १९ | ०-२४-०० पो.ख.०-००-०० एकूण०-२४-०० | ०.३१ | अमिना अहमद घारे |
| अबीटघर | २५ | ०-५२-०० पो.ख.०-०५-०० एकूण ०-५७-०० | ०.७१ | अमिना अहमद घारे |
| तळवली | १३२ | ०-२२-०० पो.ख.०-००-०० एकूण ०-२२-०० | ०.३१ | अमिना अहमद घारे |
| तळवली | १३३ | ०-४३-०० पो.ख.०-०२-०० एकूण ०-४५-०० | ०.६९ | अमिना अहमद घारे |

वरील वर्णनाची जमीन मिळकत ही निर्वेध असल्याचा निर्वाळा त्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांनी दिला असून गावचे गाव नमुना न. सातबारापत्रकी ही त्यांचे नावे मालक म्हणुन दाखल आहे. तरीही सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत वरील मिळकतीबाबत कुणाचाही विक्री, दान, गहाण, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारस हक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट अगर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्याबद्दलची लेखी हरकत, संबंधितांनी खाली सही करणार यांचेकडे योग्य त्या कागदोपत्री पुरव्यासाहित द्यावी. विहित मुदतीत लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून सदरील व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचे अशील यांचेवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्व लोकांनी नोंद घ्यावी.

दिनांक :- ३०/०६/२०२६
अलिबाग

**ॲड. मसीर अ.घोले**
१७, अलिबाग कमर्शियल कॉम्प्लेक्स,
चेंढरे, अलिबाग, ४०२ २०१.

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) फैजल मोमेन आणि २) अमिना मोमेन यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/ संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह क्काड्रा लीगल वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

अनुसूची
(मिळकतीचे वर्णन )

नोंदणीकृत जिल्हा - रायगड व उप-जिल्हा - अलिबाग, यांचे कार्यक्षेत्र मधील गाव- नागाव, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित बिन शेती जमीन भूमापन क्रमांक व उपविभाग १९९२/३, एकूण क्षेत्र २४१५ चौ. मी. आणि भूमापन क्रमांक व उपविभाग १९९२ ५, एकूण क्षेत्र १३४० चौ. मी. या दोन्ही भूमापन क्रमांक व उपविभागांचे मिळून एकूण एकत्रित क्षेत्र ३७५५ चौ. मी. धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग, हक्क व हितसंबंधांसह.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०१/०७/२०२६
**क्काड्रा लीगल**
**वकील आणि सॉलिसिटर्स**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव भागीदार**

## मुंबई उच्च न्यायालयाच्या कार्यकक्षेअंतर्गत मृत्यूपत्रविषयक व अमृत्यूपत्रीय न्यायाधिकरण याचिका क्रमांक ४८३४/ २०२५

मृत्यूपत्रविषयक व अमृत्यूपत्रीय न्यायाधिकरणाच्या पत्राकरिता याचिका दि.०४ फेब्रुवारी, २०२३ चंद्रकांत पांडुरंग जोशी, हिंदू, पेशा : निवृत्त, भारतीय नागरिक

यांच्या नावे इच्छापत्रासहित प्रबंधपत्राकरिता याचिका, ज्यांचे मृत्यूच्या वेळी निवासाचे ठिकाण - घर क्र. ३५९, रांजणकर दळवी, नवखार, सारळ, राजगढ, महाराष्ट्र - ४१२८०५ असे होते ... मयत धनश्री विशाळ दुधाणे, वय ४१ वर्षे, पेशा : गृहिणी, हिंदू, मुंबई येथील भारतीय नागरिक, पत्ता : पोस्ट खिंगार, तालुका महाबळेश्वर, खेंगार सातारा, महाराष्ट्र - ४१२ ८०५, वरील नामित मयत व्यक्तीच्या इच्छापत्राअंतर्गत एकमेव वारसदार.

प्रति, उद्धरण
राजेश चंद्रकांत जोशी, राहणार : खोली क्र.. १११, इमारत क्र. ३१, न्यू पीएमजीपी म्हाडा कॉलनी, नवघर पोलीस स्टेशनजवळ, मुलुंड (पूर्व) - ४०० ०८१. वरील नामित मयत व्यक्तीच्या संपत्तीमध्ये कोणतेही हितसंबंध असल्याचा तुमचा दावा असल्यास तुम्ही इच्छापत्रासमवेत संलग्न प्रबंधपत्राच्या मंजुरीपूर्वी येऊन प्रक्रिया पाहावी. इच्छापत्राशी संलग्न प्रबंधपत्रास तुम्हाला विरोध दर्शवावयाचा असल्यास तुम्ही तुमचा विरोध सदर उद्धरण तुम्हाला जारी झाल्याच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत प्रोथोनोटरी व सीनियर मास्टर यांच्याकडे दाखल करावी.

तुम्हाला सूचित करण्यात येत आहे की, पात्रता अर्हतेनुसार राज्य विधि सेवा प्राधिकारी, उच्च न्यायालय, विधि सेवा समिती जिल्हा विधि सेवा व तालुकास्तरीय सेवा समितीच्या नि:शुल्क सेवा तुमच्यासाठी उपलब्ध आहेत व तुम्ही पात्र असल्यास व नि:शुल्क विधि सेवा प्राप्त करू इच्छित असल्यास, तुम्ही वरील विधि सेवा प्राधिकारी/समित्यांशी संपर्क साधू शकता.

**साक्षीदार : श्री. रवींद्र व्ही. घुगे** कार्यरत मुख्य न्यायाधीश मुंबई येथील, वरील निर्देशित.
दिनांक : १७ जून, २०२६
प्रोथोनोटरी व सीनियर मास्टरकरिता
**(शिक्का)** सही/-
सीलर
दि.१८ जून, २०२६
**वागळे कल्याणी राजीव**
**याचिककर्त्यांचे वकील**


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालय, ता.पेण. जि.रायगड**

दूरध्वनी क्रमांक : ०२१४३-२५२०३६, Email id - tahasilpen@gmail.com
महसूल शाखा-क्र. फौजदारी/कात-४/जन्म दाखला/५९/२०२६ दिनांक :-२९/०६/२०२६

**जाहिरनामा**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

बळीराम रामदास घरत, अर्जदार
रा. तरणखोप, ता. पेण, जि. रायगड.
विरुद्ध
ग्रामपंचायत जोहे, सामनेवाला
ता. पेण, जि. रायगड.

या जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा संदिप बळीराम घरत याचा जन्म दिनांक ०९/०६/१९७७ रोजी मौजे डावरे, ता. पेण, जि. रायगड येथे झाला असून त्याच्या जन्माची नोंद ग्राम पंचायत जोहे, ता. पेण, जि. रायगड यांचेकडे झालेली नसल्याने जन्म नोंद घालणेसाठी या कार्यालयांत अर्ज दाखल केला आहे. तरी या अर्जाची चौकशी तात्काळ करावयाची असल्याने याकामी जर अर्जदार यांच्या मुलाच्या जन्माची नोंद घालण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १५ दिवसांत कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालयांत समक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडावे. कोणाचेही काही म्हणणे किंवा आक्षेप या कार्यालयांत मुदतीत प्राप्त न झाल्यास अर्जावर उपलब्ध पुरावे, कागदपत्र विचारात घेऊन अर्जदार यांना उशिरा जन्म नोंद दाखला देणेबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही /-
**(तानाजी शेजाळ)**
**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी पेण**

## तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण, कर्जत यांचे न्यायालयात

**पत्ता : प्रशासकिय भवन, पहिला मजला, पोलिस मैदानाजवळ, कर्जत, ता. कर्जत जि.रायगड- ४१० २०१.**
**३२ग दावा क्रमांक : टेनन्सी / एसआर /४५-२०२५**

१.काळुराम गणपत गायकवाड (मयत) वारस, १.१ श्रीम. गंगाबाई काळुराम गायकवाड, रा. डिकसळ ता. कर्जत जि. रायगड, १.२ सुरेखा प्रकाश मागाडे, रा. शिवाय नगर, सिताराम नगर, सेक्टर ३२, विर सावकर चौक, उल्हासनगर ४, ता. अंबरनाथ, जि. ठाणे, १.३ रोहीणी संदीप तायडे, रा. नेरळ ता. कर्जत जि. रायगड, १.४ रेखा जाधव, रा.गायकवाड पाडा नं. ३, सेक्शन ३६, रुम नं. ५६/४४७३, उल्हासनगर ५, १.५ मनिषा सुनिल जाधव, रा. कोषाणे ता. कर्जत जि. रायगड. १.६ सुवर्णा नरेश खंडागळे, रा. डोणवत, ता. खालापुर जि. रायगड, १.७ समाधान काळुराम गायकवाड, रा. डिकसळ ता. कर्जत जि. रायगड १.८ समिर काळुराम गायकवाड, रा. डिकसळ ता. कर्जत जि.रायगड, २. **किसन गणपत गायकवाड (मयत) वारस**, २.१ सुमन किसन गायकवाड, २.२ प्रशांत किसन गायकवाड, २.३ प्रितम किसन गायकवाड, तिघेही रा. रूम नं. १७, सागर दर्शन चाळ, मीठबंदर रोड, रसिका डेकोरेटर्स जवळ,चेंदनी कोळीवाडा, ठाणे ४०० ६०३. २.४ प्रतिमा प्रविण कांबळे, रा.वासरंग, बौध्दवाडा, खोपोली पावर हाऊस, ता. खालापुर जि.रायगड, ३.श्री. जानु गणपत गायकवाड (मयत) वारस, ३.१ उत्तम जानु गायकवाड, रा. डिकसळ ता. कर्जत जि.रायगड, ४. ताराबाई गणपत गायकवाड मयत वारस. ४.१ रंजना रविंद्र आढाव, रा. बी.एम.जी. बिल्डींग, रुम नं. ८, बी. जी. खेर मार्ग, हंगी गार्डन जवळ, मलबार हिल, मुंबई ४०० ००६. ४.२ वंदना सुरेश जाधव, रा. बी. आर. आंबेडकर नगर, बदलापुर पाईप लाईन रोड, झेड.पी. मराठी शाळेजवळ, हेदुटने गाव, डोंबिवली पूर्व, कल्याण, ठाणे, ४.३ अर्चना चंद्रकांत गरुड, रा. ००५/अ बिंग, वर्धवान अंतर्म बिल्डींग, पवार कॉम्पेक्स जवळ, बेलवली, बदलापुर, ता. अंबरनाथ, जि. ठाणे, ४.४ दिपक गजानन ओव्हाळ, ४.५. राजेश गजानन ओव्हाळ ४.६ रत्नदिप गजानन ओव्हाळ नं. ४.४ ते ४ ते ४.६. रा. श्रीसदगुरु कृपाचाळ नं. ५, विनायक गार्डन समोर, मांडे कल्याण, टिटवाळा, कल्याण, ठाणे. **...अर्जदार**

**विरुध्द** १.श्री. दत्तात्रेय बाबाजी सामंत. १.२ श्री. विठ्ठलराव बाबजी आगरी, ३.श्री. शांताराम केशवराव रेंगे, ४.श्री. मारुती दाजीबा भिंडे, ५.श्री. मनोहर दत्तात्रेय नावर, ६.श्री. देवराव आनंदराव सागळे, ७.श्री. नाना लक्ष्मण कामटे, रा. डिकसळ ता. कर्जत जि. रायगड .

तमाम जनतेस तसेच सामनेवाले / प्रतिवादी यांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मौजे डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड या जमिन मिळकती संदर्भात ३२ग अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक २९/१२/२०२५ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दिनांक **१६/०७/२०२६** रोजी सकाळी ११.३० वाजता तहसिल कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींनी सुनावणीच्या दिवशी तहसिलदार तथा शेतजमिन यांचे न्यायालयात समक्ष आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही यांची नोंद घ्यावी. **...सामनेवाले**

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| तालुका | गावाचे नाव | गट नं./स.नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|---|
| कर्जत | डिकसळ | ७/५ | ०-३०-६० | १-९४ |

सदरची जाहीर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.
**ठिकाण : कर्जत, दिनांक : २५/०६/२६**
**तहसिलदार तथा**
**शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत**

## तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण, कर्जत यांचे न्यायालयात

**पत्ता : प्रशासकिय भवन, पहिला मजला, पोलिस मैदानाजवळ, कर्जत, ता. कर्जत जि.रायगड- 4102019.**
**३२ग दावा क्रमांक : टेनन्सी / एसआर /४६-२०२५**

**१.काळुराम गणपत गायकवाड (मयत) वारस**, १.१ श्रीम. गंगाबाई काळुराम गायकवाड, रा. डिकसळ, ता. कर्जत जि. रायगड, १.२ सुरेखा प्रकाश मागाडे, रा. शिवाय नगर, सिताराम नगर, सेक्टर ३२, विर सावकर चौक, उल्हासनगर ४, ता. अंबरनाथ, जि. ठाणे, १.३ रोहीणी संदीप तायडे, रा. नेरळ ता. कर्जत जि. रायगड, १.४ रेखा जाधव, रा.गायकवाड पाडा नं. ३, सेक्शन ३६, रुम नं. ५६/४४७३, उल्हासनगर ५, १.५ मनिषा सुनिल जाधव, रा. कोषाणे ता. कर्जत जि. रायगड १.६ सुवर्णा नरेश खंडागळे, रा. डोणवत ता. खालापुर जि. रायगड, १.७ समाधान काळुराम गायकवाड, रा. डिकसळ ता. कर्जत जि. रायगड १.८ समिर काळुराम गायकवाड, रा. डिकसळ ता. कर्जत जि.रायगड, २. **किसन गणपत गायकवाड (मयत) वारस**, २.१ सुमन किसन गायकवाड, २.२ प्रशांत किसन गायकवाड, २.३ प्रितम किसन गायकवाड, तिघेही रा. रूम नं. १७, सागर दर्शन चाळ,मीठबंदर रोड, रसिका डेकोरेटर्स जवळ,चेंदनी कोळीवाडा, ठाणे ४०० ६०३. २.४ प्रतिमा प्रविण कांबळे, रा.वासरंग, बौध्दवाडा, खोपोली पावर हाऊस,ता. खालापुर जि.रायगड, **३. श्री. जानु गणपत गायकवाड (मयत) वारस**, ३.१ उत्तम जानु गायकवाड, रा. डिकसळ ता. कर्जत जि.रायगड, ४. **ताराबाई गणपत गायकवाड मयत वारस**. ४.१ रंजना रविंद्र आढाव, रा. बी. एम. जी. बिल्डींग, रुम नं. ८, बी. जी. खेर मार्ग, हंगीग गार्डन जवळ, मलबार हिल मुंबई ४०० ००६. ४.२ वंदना सुरेश जाधव, रा. बी. आर. आंबेडकर नगर, बदलापुर पाईप लाईन रोड, झेड.पी. मराठी शाळेजवळ, हेदुटने गाव, डोंबिवली पूर्व, कल्याण, ठाणे, ४.३ अर्चना चंद्रकांत गरुड, रा. ००५/अ. बिंग, वर्धवान अंतम बिल्डींग, पवार कॉम्पेक्स जवळ, बेलवली, बदलापुर, ता. अंबरनाथ, जि. ठाणे, ४.४ दिपक गजानन ओव्हाळ, ४.५. राजेश गजानन ओव्हाळ ४.६ रत्नदिप गजानन ओव्हाळ नं. ४.४ ते ४ ते ४.६. रा. श्री सदगुरु कृपाचाळ नं. ५, विनायक गार्डन समोर, मांडे कल्याण, टिटवाळा, कल्याण, ठाणे **...अर्जदार**

**विरुध्द** १. श्री. लक्ष्मण गोपाळ मेंहदळे, २. रामचंद्र हरी मेंहदळे, ३. श्री. शंकर हरी मेंहदळे, ४. श्री. विनायक हरी मेंहदळे, रा. डिकसळ, ता. कर्जत जि. रायगड **...सामनेवाले**

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मौजे डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड या जमिन मिळकती संदर्भात ३२ग अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक २९/१२/२०२५ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दिनांक **१६/०७/२०२६** रोजी सकाळी ११.३० वाजता तहसिल कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे. सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींनी सुनावणीच्या दिवशी तहसिलदार तथा शेतजमिन यांचे न्यायालयात समक्ष आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| तालुका | गावाचे नाव | गट नं./स.नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|---|
| कर्जत | डिकसळ | ७६/३ | ०-१६-४० | १-७५ |

सदरची जाहीर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.
**ठिकाण : कर्जत,**
**दिनांक : २५/०६/२६**
**तहसिलदार तथा**
**शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत**


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| **Tend-16/26-27 7000040527** | Work of supply & installation of Energy Data acquisition and automatic log sheet generation with real time data monitoring and trending system for all make MFM and ABT meters at various substations under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee- Rs. 5000/-+ GST** | Rs. 122.44 Lakhs |

EMD minimum Rs. 5000/- or 1% of estimated cost. **Submission of bids from 29.06.2026 to 14.07.2026 at 11:00 hrs, Opening date:- 14.07.2026 @ 11:30 Hrs. for each tender**. For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** The Executive Engineer (Admin) Mob. No. 8412050202 E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे आसे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. रमेश काशिनाथ शिंदे यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| २ | १ ब | ०-१६-०० | २=५७ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक ३०/०६/२०२६

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे जाहीर करण्यात येते की,

मौजे आंदोशी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील भूमापन क्र व उपविभाग २२२ एकूण क्षेत्र ०-७३-३० आकारणी १२.५० रू.पै. या वर्णनाच्या मिळकतीमधील श्रीमती सुनंदा नारायण पाटील, श्रीमती राजश्री देवानंद चेरकर व श्रीमती तन्वी हेमंत पाटील यांच्या अविभाजित हिश्याच्या एकूण क्षेत्र ०-४१-२० हे. आर आकारणी ५.३७ रू.पै. या मिळकतीपैकी ०-१५-१० हे.आर इतके क्षेत्र त्यांचेकडून खरेदी घेण्याबाबत माझे अशिलांनी चर्चा सुरू केली आहे.

त्यामुळे वरील वर्णनाच्या मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक किंवा प्राधिकरणाचा कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क, वारसा हक्क, सहमालकी, ताबा, गहाण, तारण, बोजा, करार, खरेदीचा हक्क, न्यायालयीन वाद, स्थगिती आदेश, लिन, चार्ज अथवा इतर कोणताही दावा किंवा हरकत असल्यास त्यांनी या जाहीर नोटीसच्या प्रसिद्धीपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत त्यासंबंधीचे सर्व मूळ कागदपत्रांच्या प्रतींसह खाली सही करणार यांच्याकडे लेखी हरकत सादर करावी.

निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास, सदरच्या मिळकती सर्व प्रकारच्या दाव्यांपासून मुक्त आणि त्यांचे टायटल क्लिअर व मार्केटेबल आहे असे समजून विक्री व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकती, दावे किंवा आक्षेपांची दखल घेतली जाणार नाही व त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित दावेदाराची राहील.

स्थळ : अलिबाग
दिनांक : ०१/०७/२०२६

सही / -
**(ॲड. राकेश पुंडलिक लाडे)**
श्रीकृपा, भाऊसाहेब लेले चौक,
जुन्या नगरपालिकेसमोर,
अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या मिळकती श्री मोहन विश्राम गुजर यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे पोसरी, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकती**

| अनु क्र. | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १. | २६/२ | ०-०६-६० | ०-४५ |
| २. | २६/५ | ०-२१-२० | २-०० |

सदर मिळकतींबाबत कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान, बक्षीस, लिज, लिन, वारस हक्क, पोटगी, ताबा, वहिवाट, हवाला, मृत्युपत्र, साठेकरार, खरेदीखत, मेन्टेनन्स मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क, हितसंबंध अथवा हरकत असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतींमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतींचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

ठिकाण :- कर्जत
तारीख :- १ जुलै २०२६.

सही/-
**ॲड. तारा रमेश देशमुख.**
रा.धापया मंदिर रोड कर्जत,
ता.कर्जत, जि.रायगड.
मोबा. ९३७२४२७८९०.
७२७६६०२३२५.

## जाहीर नोटीस

निशानी नं. १४ वादीचे वकिल - ॲड. महेश एस. म्हात्रे
प्रोसेस जमा दिवाणी चौ. अर्ज क्र. २०/२०२६

अलिबाग येथील मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात

हरी जाखु पाटील मयत तर्फे वारस ... अर्जदार
विरुद्ध
कमळाकर शंकर पवार, वगैरे ...सामनेवाला

प्रति,
सामनेवाला नं. २) विष्णु प्रसाद ढपाल,
रा. सी ३१, पथ क्रमांक १६,
वागळे इंडस्ट्रियल इस्टेट,
ठाणे (पश्चिम) ४००६०४
यांसी,

या जाहीर नोटीसने तुम्हांस कळविण्यात येते की,

अर्जदार हरी जाखु पाटील मयत तर्फे वारस यांनी अलिबाग येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात दिवाणी चौ. अर्ज नं. २०/२०२६ चा अर्ज स्पेशल दिवाणी मुकदमा नं.८४/२००९ पुन्हा फौलावर घेण्याकरिता दाखल केला आहे. सदर केसचा तुम्हास समन्स काढले असता तुम्ही सदरच्या पत्त्यावर सापडले नाहीत. या कारणाने परत आले आहेत. सबब मे. कोर्टाने तुम्हांस जाहिर नोटीसीद्वारे समन्स काढण्याचा आदेश केला आहे.

तरी तुम्हांस कळविण्यात येते की, दिनांक २४/०७/२०२६ रोजी तुम्ही मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अलिबाग मा. उगले साहेब यांच्या न्यायालयात सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीला मार्फत हजर होवुन तुमचे म्हणणे व कागदपत्रे दाखल करावीत. जर तुम्ही वरील तारखेस व वेळेत मा. न्यायालयात हजर राहिला नाहित तर मा. कोर्ट तुमच्या विरुद्ध हुकुम करुन तुमच्या गैरहजेरीत अर्जदाराचे अर्जाचे कामकाज चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटीस माझ्या सहीनीशी व मा. कोर्टाच्या शिक्यानिशी आज रोजी दिली.

अलिबाग
ता.२९/०६/२०२६

**क. लिपिक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अलिबाग रायगड

कोर्टाचा शिक्का

**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अलिबाग रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णनाच्या भातशेती मिळकती, मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन सर्व हक्कांगासह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १) वाघोलीवाडी, ता. अलिबाग, जि. रायगड | १ | ०-७४-४० पो.ख. ०-०५-७० एकुण ०-८०-१० | १२.९३ | बाळु महादु बोडखे व संदीप बाळु बोडखे |
| सदरहु मिळकतीपैकी क्षेत्र ०-५४-४० हे.आर, पो. ख. ०-०५-७० हे.आर. एकुण क्षेत्र ०-६०-१० हे. आर. आकार १२.९३ रू. पैसे. | | | | |
| २) वाघोलीवाडी, ता. अलिबाग, जि. रायगड | १ | ०-७४-४० पो.ख. ०-०५-७० एकुण ०-८०-१० | १२.९३ | संदीप बाळु बोडखे |
| सदर मिळकतीपैकी एकुण क्षेत्र ०-२०-०० हे. आर. आकार ४.७६ रू. पैसे. | | | | |
| ३) वाघोलीवाडी, ता. अलिबाग, जि. रायगड | २५८/२ | ०-६६-०० पो.ख. ०-१३-०० एकुण ०-७९-०० | १.२६ | संदीप बाळु बोडखे |
| या मिळकतीपैकी अविभक्त हिश्याचे क्षेत्र. | | | | |

सदरहू भातशेती मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख : ३०/०६/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील श्री. पंढरीनाथ म्हात्रे मोबा. नं. ९९३०९५५६२१ खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दिनेश वामन वेटा व रविंद्र कृष्णा वेटा, रा. कोपरखैरणे, यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - नवघर, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|
| १६९ | १-२५-०० | ०.५३ |
| पैकी मिळकत मालकाचे ०-२०-०० हे. आर मधील अविभक्त हिस्सा | | |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्कींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ३०/०६/२०२६

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र.१५२५/२०२६

श्रीम.मयुरी संजय यादव, रा.पेढारमाळ पो.घोटवडे अर्जदार
ता.सुधागड, जि.रायगड
विरूद्ध
ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत घोटवडे सामनेवाले
ता.सुधागड, जि.रायगड

जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३(३) प्रमाणे जन्म-मृत्यूबाबत तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, श्रीम.मयुरी संजय यादव (लग्नापूर्वीचे नाव गंगु डुबा वाक) रा.पेंढारमाळ, घोटवडे ता.सुधागड जि.रायगड यांनी त्यांचे स्वतःचा जन्म दिनांक ०८/०६/१९९३ रोजी मौजे पेंढारमाळ पो.घोटवडे ता.सुधागड जि.रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करून त्यांच्या (लग्नापूर्वीचे नाव गंगु डुबा वाक या नावाने) जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर मयुरी संजय यादव उर्फ गंगु डुबा वाक यांच्या जन्म नोंदीचा तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करण्यात येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण : सुधागड पाली
दिनांक : २४/०६/२०२६

सही/-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३६/६ | एकूण क्षेत्र ०-४९-०० हे.आर | ०.४४ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :-०१/०७/२०२६

सही
**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ता:- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे ताडाचा कोठा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत ही कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे, त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

| मालकाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| मुमताज रज्जाक आवसेकर (खाते नं.११) | १/१/क | एकुण ०.२१.० | २.८२ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवुन माझी खात्री पटवुन द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ३०/०६/२०२६

सही /-
**ॲड. पुनम गणेश म्हात्रे - पाटील**
श्री. स्वामी ऑटोमोबाईल, डी.के.टी.
स्कुल समोर, कुरुळ बायपास रोड, चेंढरे,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो. ८०८७३८२६४४, ७७२०९६३९३९

# निवडक

## यानिक सिनरची सलामीला शर्थ



**लंडन :** फ्रेंच ओपन या मागील टेनिस ग्रँडस्लॅममध्ये दुसऱ्या फेरीत पराभूत झालेल्या यानिक सिनर या इटलीच्या अव्वल मानांकित टेनिसपटूला विम्बल्डन या मानाच्या स्पर्धेतही पुरुष एकेरीमध्ये पहिल्याच फेरीत विजयासाठी कडवी झुंज द्यावी लागली. गतविजेत्या यानिक सिनर याने पाच सेटच्या झुंजीनंतर सर्बीयाच्या मिओमीर केकमॅनोविच याच्यावर विजय साकारला. यानिक सिनर याने तीन तास व ३० मिनिटांमध्ये प्रतिस्पर्धी खेळाडूवर मात केली. फ्रेंच ओपनप्रमाणे विम्बल्डनमध्येही यानिक सिनरला पराभवाचा धक्का बसतो की काय, असे वाटू लागले होते. मिओमीर केकमॅनोविच याने पहिला सेट आपल्या नावावर केला. त्यानंतर यानिक सिनर याने दुसरा सेट जिंकत बरोबरी साधली, मात्र सर्बियाच्या टेनिसपटूने टायब्रेकमध्ये छान खेळ करीत तिसरा सेट ७-६ असा आपल्या नावावर केला. यामुळे यानिक सिनरवर दबाव वाढला. तरीही त्याने आपला खेळ उंचावला. शिवाय पुढील दोन सेटमध्ये ६-२, ६-३ अशी बाजी मारली. अमेरिकेच्या मायकेल झेंग याने २६व्या मानांकित कॅमेरुन नोरीला पराभवाचा धक्का दिला. मायकेल झेंग याने चार तास व एक मिनिटाच्या संघर्षानंतर हा विजय साकारला. मायकेल झेंग याने पहिला सेट ६-७ असा गमावल्यानंतर पाच सेटमध्ये विजयाला गवसणी घातली. मायकेल झेंग याने दुसरा सेट ६-२ असा जिंकला.

## नेमारची फुटबॉल मैदानापलीकडची माणुसकी!

**नवी दिल्ली :** ब्राझिलचा स्टार फुटबॉलपटू नेमार ज्युनियरने मैदानातील खेळाबाहेर जाऊन त्याच्यातील माणुसकीची प्रचिती पुन्हा एकदा दिली आहे. त्याने नुकतेच व्हेनेझुएला देशात झालेल्या भीषण भूकंपानंतर मदतीचा हात पुढे केला आहे. हेनेझुएलामध्ये काही मिनिटांच्या अंतरात दोन भीषण भूकंप झाले होते. त्यामुळे मोठी जीवितहानी झाली. त्यामुळे भूकंपग्रस्तांसाठी नेमारने मदतीचा हात दिला आहे. बुधवारी संध्याकाळी व्हेनेझुएलाची राजधानी कॅराकससह अनेक ठिकाणी भूकंपाचे धक्के बसले होते. यूएस जिओलॉजिकल सर्वेनुसार पहिला भूकंप ७.१ तीव्रतेचा आणि दुसरा भूकंप ७.५ तीव्रतेचा होता. हे दोन्ही भूकंप काही वेळेच्या अंतरातच झाले. त्यामुळे अनेक मोठ्या इमारतीही कोसळल्या आणि सर्वत्र धूळीचे लोट दिसत होते. या भीषण भूकंपामध्ये १४०० पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला असून ३२३८ हून अधिक जण जखमी झाले आहेत. तसेच रिपोर्ट्सनुसार ३१०० अधिक कुटुंब विस्थापित झाली आहेत. त्यामुळे अनेक मानवतावादी संस्था आणि सरकारांनी मदत पुरवण्यासाठी पुढाकार घेतला आहे. नेमारने व्हेनेझुएलामध्ये झालेल्या भूकंपग्रस्तांसाठी कथितरित्या २,५०,००० अमेरिकन डॉलर्सची देणगी दिली आहे. नेमारच्या देणगीतून आपत्तीग्रस्त हजारो कुटुंबांना अन्न, स्वच्छ पिण्याचे पाणी, तात्पुरता निवारा आणि इतर आपत्कालीन मदतीसह अत्यावश्यक वस्तू पुरवण्यास मदत होईल.



## जर्मनी फुटबॉल वर्ल्ड कपमधून बाहेर

**नवी दिल्ली :** फुटबॉल विश्वचषकात मंगळवारी एक मोठा उलटफेर पाहायला मिळाला. जेव्हा पॅराग्वेने चार वेळा विश्वविजेत्या जर्मनीला पेनल्टी शूटआउटमध्ये ४-३ ने हरवून बाहेर केले. दुसरीकडे, ५ वेळा विश्वविजेत्या ब्राझीलने एका रोमांचक सामन्यात जपानला २-१ ने हरवत प्री-क्वार्टर फायनलमध्ये स्थान मिळवले. संघ २० व्यांदा राउंड ऑफ १६ मध्ये पोहोचला आहे. ब्राझील आता राउंड ऑफ-१६ मध्ये आयव्हरी कोस्ट किंवा नॉर्वेशी भिडेल, तर पॅराग्वेचा सामना फ्रान्स आणि स्वीडनच्या विजेत्याशी होईल.फॉक्सबोरोमध्ये फिफा क्रमवारीत ३४ व्या क्रमांकावर असलेल्या पॅराग्वे संघाने राउंड ऑफ ३२ मध्ये १२ व्या क्रमांकावर असलेल्या जर्मनीला कडवी झुंज दिली. निर्धारित वेळेनंतर आणि इंजरी वेळेनंतर स्कोअर १-१ च्या बरोबरीत राहिला.पेनल्टी शूटआउटमध्ये जोस कॅनालेने पहिला सडन डेथ पेनल्टी गोल केला, तर गोलकीपर ऑरलँडो गिलने दोन महत्त्वाचे बचाव करत संघाला विजय मिळवून दिला. दुसरीकडे, ह्यूस्टनमध्ये ब्राझीलचा विजय शेवटच्या क्षणी आला. दुसऱ्या हाफमध्ये बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरलेल्या गॅब्रियल मार्टिनेलीने इंजरी टाइमच्या सहाव्या मिनिटाला गोल करून सामना संपण्यापूर्वीच संघाला विजय मिळवून दिला.

## आयर्लंडच्या प्रशिक्षकाचा राजीनामा

**नवी दिल्ली :** बेलफास्टमध्ये भारताविरूद्ध झालेल्या दोन सामन्यांच्या टी-२० मालिकेत यजमान आयर्लंड संघाने पहिल्यांदाच विजय मिळवला. भारताविरूद्ध मिळवलेला या ऐतिहासिक निर्भेळ मालिका विजय आयर्लंडच्या क्रिकेट इतिहासातील ऐतिहासिक क्षण ठरला. आपल्या घरच्याच मैदानावर टी-२० विश्वचषक विजेत्या भारताचा पराभव करणं म्हणजे आयर्लंड संघासाठी जणू सोहळा होता. संघ या विजयाचा आनंद साजरा करत असतानाच अचानक आयर्लंडच्या कोचने प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला आहे. आयर्लंडच्या पुरुष क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक हेन्रिक मलान यांनी सोमवारी आपल्या पदाचा राजीनामा जाहीर केला. गेली चार वर्षांहून अधिक काळ संघाची धुरा सांभाळल्यानंतर त्यांनी पद सोडण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे, भारताविरुद्धच्या दोन सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-० असा ऐतिहासिक विजय मिळवल्यानंतर अवघ्या एका दिवसात त्यांनी ही घोषणा केली. ४५ वर्षीय मलान यांची २०२२ मध्ये आयर्लंडच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती झाली होती. त्यांच्या कार्यकाळात आयर्लंडने सलग तीन टी-२० विश्वचषकांसाठी पात्रता मिळवली, कसोटी क्रिकेटमधील पहिले तीन विजय नोंदवले आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक नवोदित खेळाडूंना घडवण्यातही महत्त्वाची भूमिका बजावली. मलान यांचा करार २०२७ च्या सुरुवातीपर्यंत होता. मात्र, भारताविरुद्धची यशस्वी टी-२० मालिका संपल्यानंतर संघासाठी हीच योग्य वेळ असल्याचं मानत त्यांनी पद सोडण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयामुळे नव्या मुख्य प्रशिक्षकाला ऑगस्टमध्ये अफगाणिस्तानविरुद्ध होणाऱ्या एकदिवसीय मालिकेपासून काम सुरू करण्याची संधी मिळणार आहे. तसेच २०२७ च्या सुरुवातीला होणाऱ्या ५० षटकांच्या विश्वचषक पात्रता स्पर्धेच्या तयारीसाठीही पुरेसा वेळ मिळेल. अधिकृत निवेदनात मलान म्हणाले, या खेळाडूंसोबत, प्रशिक्षक मंडळासोबत आणि संपूर्ण आयरिश क्रिकेट समुदायासोबत काम करण्याची संधी मिळणं माझ्यासाठी मोठा सन्मान होता. माझ्या कुटुंबासह इथे राहण्याचा अनुभव अतिशय सुंदर होता. आयरिश क्रिकेटसोबत घालवलेला हा काळ आम्ही नेहमीच प्रेमाने आणि अभिमानाने स्मरणात ठेवू.

# भारताचे ऑलिम्पिक तिकीट पक्के



- पाकिस्तानला मोठा झटका
- लॉस अँजेलसमध्ये ऑलिम्पिकचा थरार

**| लॉस अँजेलस | वृत्तसंस्था ||**

ऑलिम्पिक स्पर्धेत २०२८ पासून क्रिकेटचा समावेश केला जाणार आहे. या क्रिकेट खेळासाठी आयसीसी आणि ऑलिम्पिक समितीकडून पात्रतेसाठी अटी जाहीर केल्या आहेत. लॉस एंजेलिसमध्ये होणाऱ्या २०२८ च्या ऑलिम्पिकसाठी पात्रता काय असणार? हे आयसीसीकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. तसेच ऑलिम्पिकमध्ये पात्र ठरण्यासाठी पात्रता फेरीचं आयोजन करण्यात येणार आहे. पात्रता फेरीमध्ये भारतीय महिला संघाने आपली दावेदारी पक्की केली आहे.

लॉस एंजेलिसमध्ये होणाऱ्या २०२८ च्या ऑलिम्पिक स्पर्धेतील क्रिकेट सामने हे टी २० फॉर्मेटने होणार आहेत. या स्पर्धेत महिला आणि पुरुषांचे ६-६ संघ सहभागी होणार आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे आशिया, आफ्रिका, युरोप आणि या खंडातील क्रिकेट संघाचा सहभाग या स्पर्धेत असणार आहे. क्रिकेटच्या कमबॅकमुळे ऑलिम्पिक स्पर्धेची क्रेझ आणखी वाढण्यास मदत होईल, असा विश्वास चाहत्यांकडून व्यक्त केला जात आहे.

**यजमान अमेरिकेला लॉटरी!**

अमेरिका या स्पर्धेची यजमान आहे. त्यामुळे या स्पर्धेत अमेरिकेच्या महिला आणि पुरुष क्रिकेट संघाला थेट प्रवेश मिळण्याची शक्यता आहे. मात्र त्यात एक अट आहे. अमेरिकेचे दोन्ही संघ ३० जून ते ३१ डिसेंबर २०२६ दरम्यान आयसीसी टी २० रँकिंगमध्ये पहिल्या १५ मध्ये असायला हवेत. दोन्ही संघ या रँकिंगमध्ये नसल्यास त्यांना थेट प्रवेश मिळणार नाही. त्या जागी सर्वोत्तम संघाला संधी देण्यात येईल.

### ४ संघ क्वालिफाय

या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी ४ महिला संघ निश्चित झाले आहेत. आयसीसी वुमन्स टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेच्या आधारावर ४ संघ ठरवण्यात आले आहेत. नियमांनुसार, ४ वेगवेगळ्या खंडातून सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या संघाची ऑलिम्पिकसाठी निवड करण्यात आली आहे. आशियातून इंडिया, ओशनियातून ऑस्ट्रेलिया, यूरोपमधून इंग्लंड आणि आफ्रिकेतून दक्षिण आफ्रिका हे ४ संघ ऑलिम्पिकसाठी थेट पात्र ठरले आहेत. पाकिस्तान पात्र ठरलेली नाही. २ संघ क्वालिफाय राउंडमधून निश्चित होतील.

### सहावा संघ कसा ठरणार?

ऑलिम्पिक स्पर्धेसाठी ६ पैकी ५ संघ हे आयसीसी क्रमवारीच्या आधारावर निश्चित होणार आहे. मात्र सहावा आणि अंतिम संघ कसा निश्चित होणार? यावर अनेक प्रश्न आहेत. ऑलिम्पिक स्पर्धेसाठी सहावा संघ निश्चित करण्यासाठी आयसीसीकडून ऑलिम्पिक क्वालिफायर स्पर्धा खेळवण्यात येणार आहे. या स्पर्धेत एकूण ८ संघांमध्ये एका जागेसाठी चुरस असणार आहे. विजेता संघ ऑलिम्पिक स्पर्धेसाठी पात्र ठरेल.

## कॅरेबियन वादळासमोर श्रीलंका पत्त्यासारखी कोसळली

### विंडीजचा एक डाव २१७ धावांनी विजय



**| सेंट जॉन्स | वृत्तसंस्था |**

दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात वेस्ट इंडीजने श्रीलंकेचा एक डाव आणि २१७ धावांच्या प्रचंड फरकाने पराभव केला आहे.

प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या श्रीलंकेचा पहिला डाव ३०८ धावांवर आटोपला. श्रीलंकेकडून कर्णधार धनंजय डिसिल्व्हाने सर्वाधिक १२० धावांची झुंजार खेळी केली, तर दिनेश चांदीमलने ५४ आणि सोनल दिनुशाने ४३ धावांचे योगदान दिले. मात्र, इतर कोणत्याही फलंदाजाला ३० धावांचा टप्पा ओलांडता आला नाही. वेस्ट इंडीजकडून गोलंदाजीत जस्टिन ग्रीव्हसने सर्वाधिक ३ बळी घेतले.

प्रत्युत्तरादाखल पहिल्या डावात फलंदाजीसाठी उतरलेल्या वेस्ट इंडीजची सुरुवात आश्वासक झाली. आमीर जंगूने ३७२ चेंडूंचा सामना करत २३३ धावांचे शानदार द्विशतक झळकावले, तर कर्णधार रोस्टन चेसने ३२४ चेंडूंत १९४ धावांची उत्कृष्ट खेळी केली. या दोघांशिवाय कॅरेबियन संघाच्या इतर कोणत्याही फलंदाजाला अर्धशतक झळकावता आले नाही. वेस्ट इंडीजने आपला पहिला डाव ९ बाद ६२६ धावांवर घोषित केला आणि पहिल्या डावाच्या आधारावर ३१८ धावांची भक्कम आघाडी घेतली.

पहिल्या डावातील ३१८ धावांची पिछाडी भरून काढण्याच्या आणि डावाने होणारा पराभव टाळण्याच्या उद्देशाने श्रीलंका संघ दुसऱ्या डावात मैदानात उतरला. मात्र, कॅरेबियन गोलंदाजांच्या भेदक माऱ्यासमोर श्रीलंकेची फलंदाजी पत्त्यांच्या बंगल्यासारखी कोसळली.

## आशियाई स्पर्धेसाठी भारतीय संघ जाहीर

**नवी दिल्ली :** आशियाई स्पर्धेसाठी बीसीसीआयने कर्णधार हरमनप्रीत कौरवर विश्वास कायम ठेवला आहे. मंधाना उपकर्णधार म्हणून कायम राहील. भाटियाला वगळण्यात आले आहे. तिच्या जागी जी. कमलिनीचा संघात समावेश करण्यात आला आहे. श्रेयंका पाटीलचा संघात समावेश करण्यात आला आहे. मंधाना, शेफाली वर्मा, जेमिमा रॉड्रिग्स आणि रिचा घोष फलंदाजीत साथ देतील. दीप्ती शर्मा, रेणुका सिंग, श्री चरणी, अरुंधती रेड्डी आणि नंदिनी शर्मा गोलंदाजीची जबाबदारी सांभाळतील.

## टी-२० रणनीतीच्या फेरविचाराची गरज

### अमोल मुजुमदार यांचे मत

**| लंडन | वृत्तसंस्था |**

भारतीय महिला संघावर टी-२० विश्वकरंडकातील साखळी फेरीतच गारद होण्याची नामुष्की ओढवली. याच पार्श्वभूमीवर भारतीय महिला संघाचे प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांनी या प्रतिष्ठेच्या स्पर्धेतील अपयशाचे खापर सुमार गोलंदाजी व गचाळ क्षेत्ररक्षणावर फोडले. तसेच भारतीय महिला संघाला आता टी-२० प्रकारात रणनीतीचा फेरविचार करावा लागणार आहे, असे स्पष्ट मतही त्यांच्याकडून या वेळी व्यक्त करण्यात आले.

भारतीय महिला संघाने पाकिस्तान, बांगलादेश व नेदरलँड्स या देशांना पराभूत केले, मात्र दक्षिण आफ्रिका व ऑस्ट्रेलिया या दोन देशांविरुद्ध त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी भारतीय महिला संघाला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या लढतीत विजय आवश्यक होता, मात्र या लढतीत पराभव झाला व उपांत्य फेरीत पोहोचण्याच्या आशा संपुष्टात आल्या. अमोल मुजुमदार स्पष्ट करतात की, टी-२० प्रकारात वेगळ्या योजनांचा विचार करावा लागणार आहे. आगामी काळात टी-२० संघाच्या संयोजनावर विशेष लक्ष द्यावे लागणार आहे.

### पॉवरप्लेमध्ये संथ फलंदाजी

अमोल मुजुमदार यांनी भारतीय फलंदाजांनी पॉवरप्लेमध्ये संथ फलंदाजी केल्याचेही सांगितले. ते म्हणाले की, पॉवरप्लेमध्ये १० ते १५ धावा आणखी व्हायला हव्या होत्या, हे मला मान्य आहे. त्यामुळे निकालामध्ये फरक पडला असता, मात्र पॉवरप्लेमध्ये आम्ही विकेट गमावले नव्हते. हेही लक्षात घेण्यासारखे आहे. धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियन संघाने छान कामगिरी केली.

## वर्ल्ड रोइंग कप — भारतीय जवानांनी रचला इतिहास



- लक्ष्य-उज्ज्वल जोडीने जिंकले सुवर्णपदक
- सुवर्णपदक जिंकणारी पहिली भारतीय जोडी ठरली

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारतीय लष्कराचे दोन जवान, लक्ष्य आणि उज्ज्वल कुमार सिंग यांनी स्वित्झर्लंडमधील लुसर्न येथे झालेल्या २०२६ वर्ल्ड रोइंग कप थ्री प्रकारात देशासाठी पहिले सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला. लाईटवेट पुरुषांच्या डबल स्कल्सच्या अंतिम फेरीत, लक्ष्य आणि उज्ज्वल कुमार सिंग या भारतीय जोडीने शानदार कामगिरी करत ६ मिनिटे २६.०९ सेकंदांची वेळ नोंदवून प्रथम क्रमांक पटकावला.

लक्ष्य आणि उज्ज्वल कुमार सिंग ही जोडी त्यांच्या पहिल्याच वर्ल्ड रोइंग कप मालिकेत देशासाठी सुवर्णपदक जिंकणारी पहिली भारतीय जोडी ठरली आहे. त्यांनी ६:२६.०९ वेळेत शर्यत पूर्ण केली. लक्ष्य आणि उज्ज्वल कुमार सिंग दोघेही भारतीय सैन्यात सैनिक असून लुसर्नमधील भारतीय तुकडीचा भाग आहेत.

जागतिक रोइंग चषकात सुवर्णपदक जिंकण्यापूर्वी भारताने तीन कांस्य पदके जिंकली होती. पहिले पदक २००९ मध्ये महिलांच्या गटात, तर दुसरे आणि तिसरे पदक २०१९ आणि २०२२ मध्ये पॅरा पेअर गटात जिंकले होते. २६ ते २८ जून दरम्यान लुसर्न येथे झालेल्या तिसऱ्या जागतिक रोइंग चषकात ४२ देशांतील ६५० हून अधिक खेळाडूंनी भाग घेतला होता आणि ही स्पर्धा या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या जागतिक रोइंग चॅम्पियनशिपच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा आहे.

## न्यूझीलंडचा मालिका विजय

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

न्यूझीलंड क्रिकेट टीमने टॉम लॅथमच्या नेतृत्वात कमाल केली आहे. न्यूझीलंडने टीम इंडियाला २ वर्षांपूर्वी भारत दौऱ्यात कसोटी मालिकेत पराभूत केलं होतं. त्यानंतर आता न्यूझीलंडने इंग्लंडला त्यांच्याच घरात लोळवलं आहे. न्यूझीलंडने तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात इंग्लंडचा १६० धावांनी धुव्वा उडवला आहे.

इंग्लंडला सामन्यातील पाचव्या आणि अंतिम दिवशी विजयासाठी १७० धावांची गरज होती. तर न्यूझीलंडला ६ विकेट्स हव्या होत्या. जो रुट याच्यासारखा अनुभवी फलंदाज असल्याने इंग्लंडला विजयाची आशा होती. न्यूझीलंडच्या नाथन स्मिथ याने एमिलियो गे आणि जो रुट या दोघांना आऊट केलं. त्यानंतर जेमी स्मिथ याने घट्ट पाय रोवले. या दोघांच्या भागीदारीमुळे इंग्लंडने दुसऱ्या सत्रापर्यंत सामना खेचला. दोघांमुळे इंग्लंडला आशा होती. मात्र या दोघांना फार वेळ टिकता आलं नाही. इंग्लंडची लंचनंतर पडझड झाली. न्यूझीलंडने इंग्लंडला २१२ धावांवर ऑलआऊट केलं.



## नेदरलँड्सचीही घरवापसी, मोरोक्कोचा शानदार विजय

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

जेतेपदाचे दावेदार असलेल्या संघांपैकी नेदरलँड्सलाही घरी परतावे लागणार आहे. मोरोक्कोने राऊंड ऑफ ३२च्या लढतीत नेदरलँड्सवर मात करत सनसनाटी विजयाची नोंद केली.

पेनल्टी शूटआऊटमध्ये तेऊन कूपमाईनर्सने नेदरलँड्ससाठी पहिला गोल केला. मोरोक्कोच्या नील आयोनायला गोल करता आला नाही. नेदरलँड्सच्या जस्टीन क्लुईव्हर्टने केलेला गोल प्रयत्न विफळ ठरला. मात्र त्यानंतर मोरोक्कोच्या राहिमीने गोलची बोहनी केली. नेदरलँड्सच्या वॉट वेघोर्स्टने गोल केला. त्याला प्रत्युत्तर देत मोरोक्कोच्या चेम्सडाईन तैबीने गोल करत बरोबरी साधली. यानंतर मात्र नेदरलँड्सचं नशीब रुसलं. क्विंटन टिंबरने केलेला गोलप्रयत्न गोलपोस्टच्या दुरून निघून गेला. मोरोक्कोच्या अचरफ हाकिमीने केलेला गोल प्रयत्नही वाया गेला.

## एव्हीसी कप व्हॉलीबॉल स्पर्धा — ओम लाडने केले उत्कृष्ट सेटिंगचे प्रदर्शन

# भारताला कांस्यपदक



**| अहमदाबाद | वृत्तसंस्था |**

व्हॉलीबॉल खेळातील सर्व्हिस, स्मॅश, ब्लॉक या उत्तम कौशल्याच्या जोरावर भारतीय वरिष्ठ संघाने अहमदाबाद येथील वीर सावरकर स्टेडियममध्ये झालेल्या एव्हीसी कप व्हॉलीबॉल स्पर्धेत कांस्यपदक पटकावून इतिहास रचला आहे. यात महाराष्ट्राचा सेटर ओम लाडने उत्कृष्ट सेटिंगचे प्रदर्शन करीत मैदान गाजविले.

आशियाई व्हॉलीबॉल कॉन्फेडरेशन कप नुकताच अहमदाबादेत पार पडला. यात आशिया खंडासह ओशियामधील ११ संघांनी सहभाग नोंदविला होता. भारताने साखळी सामन्यात ऑस्ट्रेलिया, न्यूझिलँड, कझागिस्थान व बहरीनचा एकतर्फी ३-० ने धुव्वा उडविला, तर चायनिज तायपाय संघाबरोबर अटीतटीच्या लढतीत ३-१ ने विजय मिळविला. उपांत्य फेरीच्या अटीतटीच्या सामन्यात भारतीय संघाला इंडोनेशिया संघाकडून २-३ असा पराभव पत्करावा लागला.

तृतीय क्रमांकाच्या सामन्यात भारताने बहरीनचा ३-१ असा पराभव करीत तब्बल ४० वर्षांनंतर कांस्यपदकावर कब्जा केला. भारतीय संघाची या स्पर्धेपूर्वी वर्ल्ड रँकिंग ६० वी होती. या पदकानंतर भारतीय संघाने १८ अंकांची वाढ घेत ४२व्या स्थानी झेप घेतली आहे. ४० दिवसांपूर्वीच कोच म्हणून धुरा घेतलेल्या विदेशी ड्रॅगननेही संघाला उपयुक्त कोचिंग करीत पदकाला गवसणी घालून दिली. याचीही व्हॉलीबॉल क्षेत्रातून चर्चा होत आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील पाटेगावच्या ओम वसंत लाडची पहिलीच आंतरराष्ट्रीय स्पर्धा या संघात महाराष्ट्राचा तो एकमेव खेळाडू. चायनिज तायपायविरुद्ध पहिला सेट भारताने गमाविला असता, बदली खेळाडू म्हणून आलेल्या ओमने आपली छाप सोडली. यानंतरचे सलग तीन सेट जिंकत त्याने भारताला आघाडी मिळवून दिली. त्यानंतरच्या लिग व बाद फेरीच्या सामन्यातून त्याने उत्कृष्ट खेळी केली.

ओम लाड हा व्हॉलीबॉल सेटर म्हणून खेळतो. त्याचे हायबॉलचे परफेक्शन उत्तम असून, काऊंटर व बॅकसाइडला तो उंच बॉल काढण्यात परफेक्ट आहे. ६ फूट ४ इंच उंची असलेल्या ओम पाइप अटॅक व शॉटफास्ट उत्तम खेळवितो.

उंचापुरा असल्याने त्याची ब्लॉकिंगही संघाला गुण देऊन जाते.

माझी ही पहिलीच आंतरराष्ट्रीय स्पर्धा. अंतिम सामन्यात खेळण्याचे लक्ष्य होते. मात्र थोडक्यात पराभव मिळाला. पहिल्याच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताला पदक मिळवून दिल्याचा अभिमान आहे, असे ओम लाड म्हणाला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)